# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## तृतीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (VI)

## जनरल पेपर POL ३६१ a (Gen-३) ३६१११

## पाश्चिमात्य राजकीय विचार

## Western Political Thought

## तृतीय वर्ष कला द्वितीय सत्र- VI

## राज्यशास्त्र- जून २००९

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

## तृतीय वर्ष कला द्वितीय सत्र- VI

**१) कार्ल मार्क्स**

- विरोध विकासवाद सिद्धांत
- इतिहासाचे भौतिकवादी विश्लेषण
- वर्गसंघर्ष आणि अतिरिक्त मूल्य सिद्धांत
- वर्गविहीन आणि राज्यविहीन समाज
- मूल्यमापन व परिक्षण

**२) जॉन स्टुअर्ट मिल**

- व्यक्तिगत स्वातंत्र्य- विचार व कृती स्वातंत्र्य
- स्त्री स्वातंत्र्याविषयी विचार
- प्रतिनिधिक शासन
- उपयोगितावादाचे परिक्षण
- मूल्यमापन व परिक्षण

**३) टी.एच.ग्रीन-**

- राज्यविषयक विचार, स्वरूप आणि कार्य
- व्यक्तीचे अधिकार
- व्यक्ती व समाज
- ग्रीनचे मालमत्ता, शिक्षा, युद्धविषयक विचार
- मूल्यमापन व परिक्षण

**४) हेरॉल्ड लास्की-**

- स्वातंत्र्याची संकल्पना
- हक्कांविषयी विचार
- राज्य आणि समाज
- सार्वभौमत्व
- मूल्यमापन आणि परिक्षण

## प्रकरण १ पहिले

## मार्क्सवाद

**जीवन परिचय:-** शास्त्रीय समाजाचा जनक कालमार्क्सचा जन्म ५ मे १८१८ मध्ये जर्मनीतील द्विविज येथे एका ज्यू कुटुंबात झाला. त्यांचे वडील वकील व पशियन देशभक्त होते. वयाच्या ६ व्या वर्षी वडीलांनी ज्यू धर्माचा त्याग करून ख्रिश्चन धर्म स्वीकारला. या घटनेचा त्यांच्या मनावर खूप मोठा परिणाम झाला. त्याने बॉन व बर्लिन विद्यापीठात इतिहास, न्यायशास्त्र व कायदा शास्त्राचे शिक्षण घेतले. या काळात जेनी या तरूणीसोबत विवाहबद्ध झाला. जीना विद्यापीठात एपिक्यूरसच्या भौतिकवादी तत्त्वज्ञानावर प्रबंध सादर करून पीएच.डी. पदवी मिळवली. त्यानंतर त्याच व इतर विद्यापीठात प्राध्यापक होण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या जहाल विचारांमुळे कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापकाची नोकरी मिळू शकली नाही. म्हणून तो वृत्तपत्रीय लिखानाकडे वळला. अल्पकाळात तो प्रथम श्रेणीचा वृत्तपत्रकार म्हणून ओळखला जाऊ लागला. फ्रेच जर्मन इअर बुक मध्ये संपादक मंडळाचा सदस्य म्हणूनही कार्य केले. काही काळानंतर मतभेद झाल्यामुळे राजीनामा देऊन समाजवादाचा अभ्यास करण्यासाठी तो फ्रान्समध्ये गेला. जर्मन सरकार विरोधी लेखन केल्यामुळे फ्रान्सने मार्क्सची देशातून हकालपट्टी केली. तेथून तो बेल्जियमला गेला आणि तेथे 'समाजवादाचा जाहीरनामा' हा ग्रंथ १८४८ मध्ये प्रकाशित केला. फ्रेंच राज्यक्रांतीत ही सहभाग घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. जर्मनीत गेल्यावर सरकारने त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरला पण त्यात तो निर्दोष सुटला तरी ही त्याला देशातूर हद्दपार करण्यात आले. त्यानंतर मार्क्सने उरलेले आयुष्य निर्धन इंग्लडमध्ये घालविले तेथे त्यांची फ्रेडरीक एंजल्सशी मैत्री झाली. ही मैत्री शेवटपर्यंत टिकली. एंजल्समुळे जर्मनीपुरता विचार करणारा मार्क्स इंग्लंडच्या भांडवलशाहीच्या आधारावर संपूर्ण विश्वाचा अर्थ लावण्याचा आणि त्यासाठी पर्यायी कार्यक्रम वा क्रांती विचार मांडू लागला. एंजल्सने त्याला आर्थिक व ग्रंथ लेखनास खूप मदत केली. त्यामुळे मार्क्सला एंजल्स मिळाला नसता तर तो कोरा बुद्धिवान राहिला असता असे म्हटले जाते. आयुष्याच्या अखेरपर्यंत तो ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयात संशोधनाचे कार्य करत राहिला. त्यांने सर्वप्रथम कामगार संघटना स्थापन करून कामगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. मार्क्सने The Poverty of Philosophy,The Communist Manifesto, Das Capital,Value; Price and Profit,The Critique of Political Economy, The Civil War in Fance, Class Struggle in France इ.ग्रंथ लिहीले. मार्क्सच्या विचारावर हेगेल, रिकार्डो, इंग्लंड व फ्रॉन्स मधील समाजवाद, वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य, वैयक्तिक आयुष्यातील दारिद्रय, औद्योगिक क्रांतीचा इ.चा प्रभाव दिसून येतात. या प्रभावातून विचार मांडण्याचे कार्य त्यांने केलेले आहेत. कार्ल मार्क्सचा दास कॅपिटल हा ग्रंथ साम्यवादाचे बायबल मानला जातो. संपूर्ण आयुष्यभर निष्काचन राहून आपल्या विचारांच्या प्रसारासाठी ग्रंथ लेखन सुरू ठेवले. मार्क्सच्या विचारांचा जगावर जबरदस्त प्रभाव पडलेला होता. त्यांच्या विचारांच्या आधारावर १९१७ मध्ये रशियामध्ये क्रांती झाली त्यानंतर चीन व इतर अनेक देशात क्रांती झालेली दिसते. एकेकाळी मार्क्सच्या विचारांचा जवळपास अर्ध्या जगावर प्रभाव पडलेला होता. मार्क्स इतका प्रभावशाली विचारवंत जगाच्या इतिहासात क्वचित झालेले दिसून येते.

**टिप- शास्त्रीय समाजवाद-** १९ व्या शतकात औद्योगिक क्रांतीतून भांडवलशाहीचा विकास झाला. औद्योगिक क्रांतीतून व्यक्तिस्वातंत्र्य, उत्पादनवाढ, राहणीमानाचा उच्च दर्जात वाढ इत्यादी फायदे होतील हे भविष्य रंगविण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र फायदापेक्षा तोटे अधिक झालेले होते. आर्थिक विषमता, दारिद्रय, बेकारी, खालावत जाणारे राहणीमान इत्यादी औद्योगिक क्रांतीचे तोटे दिसू लागल्यानंतर अनेक विचारवंत भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर टीका करू लागले. त्यात सिस्माडी, रॉबर्ट ओवेन, चार्लस फेरियर, प्रुधाँ इत्यादीचा समावेश होता. या विचारवंतांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोषांना दूर करण्यासाठी आपआपल्या दृष्टिकोनानुसार नवीन प्रकारची समाजरचना निर्मितीचे स्वप्ने रंगविली. ही स्वप्ने काल्पनिक आणि वास्तवला सोडून असल्यामुळे या विचारवंताना 'स्वप्नाळू समाजवादी' म्हटले जाऊ लागले. कारण त्यांनी समाजवादी समाजरचनेची उपयुक्तता पटवून देऊन सहकारी संघटना स्थापन करण्याचे आवाहन केले. त्यांनी सुचविलेली समाजरचना आणि विविध पर्याय वस्तुस्थितीपेक्षा कल्पनेवर आधारलेले होते. शास्त्रीय

भूमिकाचा त्यात अभाव होता. या समाजवाद्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून क्रमाक्रमाने स्थापन करता येईल हा विश्वास व्यक्त केला. मार्क्सच्या मते त्यांचे मार्ग निरर्थक होते. मार्क्सने अर्थशास्त्रीय आणि ऐतिहासिक भौतिकवादाच्या मदतीने भांडवलशाहीचे विश्लेषण करून समाजाचा विकास निश्चित अशा नियमानुसार होत असतो हे शास्त्रीय दृष्ट्या पटवून दिले. समाज एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत ज्या नियमानुसार जात असतो त्याच नियमानुसार भांडवलशाही नष्ट होईल. समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित होणे परिहार्य हे सिद्ध करून दाखविले. मार्क्सने शास्त्रीय नियम आणि तर्कशुद्ध पद्धतीने विचारांची मांडणी केल्यामुळे त्यांच्या समाजवादी विचारांना 'शास्त्रीय समाजवादी' असे म्हणतात. मार्क्सने समाजवादापेक्षा वेगळेपणा दाखविण्यासाठी साम्यवाद शब्दाचा स्वीकार केलेला आहे. मार्क्सने शास्त्रज्ञासारखे समाजाचे स्वरूप व त्याचा विकासाच्या मूलभूत नियमाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मानव समाजात होणारे परिवर्तन अकस्मात होत नसते. बाह्य परिस्थितीत झालेल्या विशिष्ट बदलांमुळे विशिष्ट नियमाने परिवर्तन घडत असते. मार्क्स स्वतःला आपले विचार वैज्ञानिक तथ्यावर आधारित असे वाटत असल्याने त्याने त्यास शास्त्रीय समाजवाद असे नाव दिले.

**प्र.१ ला.कार्लमार्क्सचे द्वंद्वात्मवाद वा भौतिक वादाबद्दलचे विचार स्पष्ट करा?**

मार्क्सने 'समाजवादाचा जाहीरनामा' ग्रंथात द्वंद्वात्मक वादाबद्दल विचार मांडले आहेत. हेगल या विचारवंताने सर्वप्रथम द्वंद्वात्मकवादाची संकल्पना मांडली. मानवी जीवनात सतत परिवर्तन घडून येत असते. विचार किंवा कल्पना परिवर्तन घडवून आणण्याचे काम करतात. माणसाच्या मनात एखादा विचार येतो त्याला वाद म्हणतो. या विचारात काही कमतरता निर्माण होतात म्हणून त्या विचारांच्या विरोधी दुसरा विचार काही काळानंतर निर्माण होतो त्याला प्रतिवाद म्हणतात. प्रतिवादात दोष शिरल्यानंतर नवा विचार निर्माण होतो त्याला संवाद म्हणतो. वाद आणि प्रतिवादातील संघर्षातून जो समन्वय निर्माण होतात त्यास संवाद असे म्हणतात. संवादात दोष निर्माण झाल्यानंतर त्याचे वादात रुपांतर होते. अशा प्रकारे वाद, प्रतिवाद, संवाद मार्गाने मानवी जीवनात परिवर्तन होते. हेगेलने आत्म्याच्या विकासाचा चैतन्यवादी सिद्धांत सांगितला होता. हेगेलचा द्वंद्वात्मक वादाचा सिद्धात भौतिक जगतासाठी वापरला. भौतिक वस्तूचे अस्तित्व आत्म्याच्या भावनेवर आधारलेले नसून भौतिक वस्तुंमुळेच विचार निर्माण होतात. माणसाचा बौद्धिक विकास हा भौतिक वस्तुचा परिणाम आहे. हेगेलने मांडलेला विचार मार्क्सला मान्य आहे पण मार्क्स म्हणतो "हेगेल डोक्यावर उभा होता मी त्याला पायावर उभे केले" मार्क्स द्वंद्ववाद स्वीकारतांना विचार वा कल्पनाचे महत्व नाकारता. पदार्थ किंवा भौतिक वस्तु अंतीम सत्य सांगतो. कारण वस्तु पाहुन मानवाच्या मनात विचार उत्पन्न होतात वस्तु न पाहता विचार उत्पन्न होत नाही. उदा:- पक्षी पाहिल्यानंतर मानवाला विमानाच्या कल्पना सूचली म्हणून परिवर्तन घडवून आणण्यासाठी भौतिक वस्तु हा घटक महत्वाचा आहे. मार्क्स द्वंद्ववाद स्पष्ट करण्यासाठी एंजल्स एक उदाहरण देतो. जमिनीमध्ये गव्हाचे बी पेरणे ही अवस्था म्हणजे वाद, बीचे रोपटयात रूपांतर होणे म्हणजे प्रतिवाद,रोप तयार झाल्यानंतर बी नष्ट होते म्हणजे प्रतिवाद निर्माण झाल्यानंतर वाद नष्ट होतो. रोपटयाच्या गव्हाचे नवीन दाणे येणे ही अवस्था संवाद होय. गव्हाचे दाणे पक्क झाल्यानंतर रोपटे सूकून जाणे म्हणजे संवाद होय. संवाद निर्माण झाल्यानंतर प्रतिवाद नष्ट होता. नवीन तयार झालेल्या गव्हाची बी जमिनीत पेरल्यास संवादाचे रुपांतर वादात होईल.

एंजल्स सामाजिक संदर्भात दुसरे उदाहरण देतो. प्रारंभिक अवस्थेत जमिनीवर संपूर्ण समाजाची मालकी होती या अवस्थेला वाद म्हणता येईल. त्यानंतर जमिनीवर वैयक्तिक मालकी निर्माण झाली हा प्रतिवाद होता तर औद्योगिक क्रांतीतून यंत्रयुगाचा अविष्कार झाला. जमिन कसण्यासाठी आणि यंत्र खरेदीसाठी आवश्यक भांडवलच्या अभावामुळे जमिनीवर समाजाची मालकी आणि कारखान्याचे राष्ट्रीयकरण व्हावे असा समन्वयकारी विचार निर्माण झाला त्याला संवाद मानता येईल. यातून जुनी अर्थव्यवस्था नष्ट होऊन मानवी मूल्ये जोपासणारी, वर्ग आणि राज्य नसलेली समाजव्यवस्था निर्माण होईल असे मत मांडले.अशा पद्धतीने जगाचा विकास होतो. व्यक्ती जन्माला येते, विकसित होते आणि मृत्यु पावते.

मार्क्स विकासाचे दोन प्रकार सांगतो.

**अ. मात्रात्मक/संख्यात्मकः-** एका वस्तुपासून अनेक वस्तु तयार होणे म्हणजे मात्रात्मक परिवर्तन होय. उदा. गव्हाच्या एका बी पासून अनेक गहू तयार होणे.

**ब. गुणात्मक परिवर्तन**:- एका वस्तुवर प्रक्रिया करून दुसरी वस्तु तयार करणे म्हणजे गुणात्मक परिवर्तन होय.उदा. ऊसापासून साखर तयार करणे अशा दोन मार्गाने जगात परितर्वन होते.

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाचे वैशिष्टये म्हणजे समाजात होणारे परिवर्तन एका विशिष्ट नियमाने शास्त्रशुद्ध पद्धतीने होत असते. विकास हा विशिष्ट प्रक्रियेने होत असतो. पण तो सरळ रेषेत न होता वक्राकार गतीने होतो. परिवर्तन जलद व मंदगतीनेही होऊ शकते.

**मार्क्सच्या द्वंद्वात्मकवाद सिद्धांतातील दोष-** द्वंदात्मक भौतिकवाद हा शास्त्रीय असल्याचा दावा मार्क्स करत असला तरी त्या सिद्धांतात पुढील उणिवा दिसून येतात.

१. **गूढता व संदिग्धता-** मार्क्सने द्वंद्वात्मक सिद्धांता पुष्टी मिळावी यासाठी काही नियम वा पुरावे दिलेले आहेत. परंतु भौतिक जगातील नियम मानव समाजाला लागू पडतील या खात्री नसते. त्यामुळे त्यांचा सिद्धांत संदिग्धता निर्माण करतो.
२. **आत्मतत्त्व अपेक्षित-** मार्क्स भौतिकवादी असल्याने इंद्रियजन्य पदार्भाचे अस्तित्व मान्य करतो. आत्मा इंद्रियगोचर असल्याने तो नाकारतो. वास्तविक आत्म्याची अनुभूती प्रबळ असतांनाही तो आत्मतत्त्वाकडे दुर्लक्ष करतो.
३. **जड वस्तुत चेतना-** मार्क्स जड वस्तूतही गती मान्य करतो. वास्तविक गती भौतिक वस्तू नसते तर जीवित वस्तूत असते. जीवित व्यक्तीद्वारा भौतिक वस्तूत परिवर्तन होते याकडे दुर्लक्ष करतो.
४. **द्वंद्वातून विकास-** मार्क्स सर्वच विकास द्वंद्वातून घडतो असे मानतो. परंतु प्रत्येक वस्तू वाद-प्रतिवाद-संवाद या मार्गाने घडेल हे अशक्य आहे.
५. **संघर्षावर अतिभर-** मार्क्स विकास प्रक्रियेत संघर्षाला महत्त्व देता. सहकार्याकडे दुर्लक्ष करतो. संघर्षाशिवाय ही सहकार्यातून विकास होऊ शकतो हे लक्षात घेत नाही.

**प्र.२ रा.मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांत स्पष्ट करा?**

**किंवा.**

**मार्क्सने इतिहासाचे केलेले विश्लेषण किंवा आर्थिक मिमांसा स्पष्ट सांगा?**

मार्क्सने हेगेलच्या भौतिकवादी सिद्धांताच्या आधारावर इतिहासाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. उत्पादनाची साधने व आर्थिक घटकाच्या आधारावर इतिहासाची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला. द्वंद्वात्मक भौतिकवाद हा मार्क्सच्या संपूर्ण विचाराचा पाया आहे. मार्क्सने मानव इतिहासात होणारी विविध परिवर्तने भौतिक किंवा आर्थिक कारणामुळे घडून येतात असे मत मांडल्यामुळे या सिद्धांताला इतिहासाची आर्थिक किंवा भौतिक मिमांसा असे म्हटले जाते. मार्क्स समाज परिवर्तनाचा मूळ आधार समाजातील उत्पादन पद्धती मानतो. उत्पादन पद्धतीत होणारे बदल समाज रचनेत बदल घडवून आणतात त्यामुळे तो परिवर्तनाची कारणे अर्थव्यवस्थेत शोधता. त्या वर्गाचे उत्पादन साधनावर नियंत्रण असते त्याचे राजकीय व्यवस्थेवर नियंत्रण असते. एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीसोबत निर्माण होणारे संबंध त्यांच्या इच्छेवर ठरत नसून त्यांच्याजवळ उत्पादनाची साधने किती आहेत यावर ठरतात. आर्थिक संबंध हा समाजरचनेचा आधार असतो. त्यासाठी इतिहासाचे आर्थिक आधारावर सहा टप्पे मानतो. ते पुढील प्रमाणे होत

**१. आदीम किंवा प्राचीन साम्यवादः -** या टप्प्यात मनुष्य आपली उपजीवीका निसर्गाने निर्माण केलेल्या वस्तुवर करत होता. संपत्तीच्या उदय झालेला नव्हता. मनुष्याला शेती व पशुपालनाचे ज्ञान नव्हते. सर्व वस्तुवर सर्वांची मालकी होती. सामुहिक शिकार, फळे, कंदमुळे, आणि मासेमारी करून उदरनिर्वाह करत असत. सर्व वस्तू आपसांत वाटून उदरनिर्वाह करत असते. प्रत्येक व्यक्ती आनंदाने जीवन जगत होती. खाजगी मालमत्तेची कल्पना नसल्यामुळे तुझे आणि माझे हा भेदभाव नव्हता, आपसात संघर्ष नव्हता म्हणून या अवस्थेला प्राचीन साम्यवाद नाव देतो.

२. **गुलामगिरीची अवस्था-** माणसाच्या गरजा वाढल्यामुळे प्राचीन साम्यवाद ही अवस्था दीर्घकाळ टिकू शकली नाही. मानवाने गरजा पूर्ण करण्यासाठी शेती उत्पादन साधनाचा शोध लावला. बुद्धिवान व बलवान लोकांनी जमिनीची मालकी मिळवली. या उलट ज्याला जमिन मिळू शकली नाही तो उदरनिर्वाहासाठी मालकाच्या शेतीवर गुलाम म्हणून काम करू लागला. या टप्प्यात मालक व गुलाम हे दोन वर्ग निर्माण झाले. दोन्ही वर्ग परस्परांच्या गरजेपोटी एकत्र आलेले असले तरी हित परस्परविरोधी असल्याने त्यांच्यातील समन्वय फार काळ टिकू शकला नाही. काही काळानंतर दोन्ही वर्गात संघर्ष निर्माण झाला. गुलामांचे बंड नष्ट करण्यासाठी मालकांनी राज्य नावाची संस्था स्थापन केली. त्या संस्थेमार्फत गुलामांचे बंड नष्ट केले. उदा. ग्रीक नगरराज्यातील गुलामगिरी

३. **सामंतशाही**:- या अवस्थेत उत्पादन साधनावर जमीनदाराचा अधिकार असतो. राजाला मदत करणारे संरजामदार, सेनापती व त्यांच्या नातेवाईकांमध्ये राजाने जमिनीचे वाटप केले. त्यांना जमिनीचा वाटा मिळाला ते जमीनदार बनले. त्यांच्या कडे जमिन नव्हती ते जमीनीदाराच्या शेतीवर शेतमजुरी करू लागले. जमीनदार शेत मजुरांना उत्पन्नातुन थोडा वाटा देत असे. जमीनदार युद्ध काळात राजाला सैन्य भाडयाने देत असे. राजाला पैसे पुरवत असे. त्यामुळे राजासुद्धा दुर्बल होता. त्याच काळात शहरातल्या व्यावसायिकांनी यंत्र नावाचे नवे उत्पादन साधन शोधून काढले. यंत्रावर काम करण्यांसाठी त्यांना कामगारांची गरज होती .म्हणून व्यापारांनी शेतमजुरांना जमिनदाराविरुद्ध भडकवण्यास मदत केल्यामुळे जमीनदारी नष्ट झाली.

४. **भांडवलशाही**:- यंत्राचा शोध लागल्यानंतर भांडवलदारांनी अनेक कारखाने काढले. खेडयातून आलेले शेतावर कामगार म्हणून काम करू लागले. कामगारांकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्याने अत्यंत कमी वेतनात जास्तीत जास्त काम भांडवलदार करून घेऊ लागले. परिणामतः भांडवलदार अधिक श्रीमंत झाले व कामगार गरीबच राहिला. या अवस्थेत एकाच कारखान्यात लाखो कामगार असल्यामुळे व सर्वांच्या समस्या सारख्या असल्यामुळे कामगारांमध्ये एकी निर्माण झाली. त्यांनी भांडवलदाराविरूद्ध संघर्ष सुरू केला. त्या संघर्षात कामगारांचा विजय अटळ आहे. कारण भांडवलदारांपेक्षा कामगारांची संख्या जास्त आहे.

५. **कामगारांची हूकूमशाही**:- कामगार व भांडवलदार संघर्षात कामगारांचा विजय होतो. परंतु पराभूत भांडवलदार शांत बसण्याची शक्यता नाही ते प्रतिक्रांती करू शकतात. भांडवलदार कामगाराचे शोषण करण्यासाठी राजकीय संस्था म्हणजे राज्याचा वापर करत होता. राजेशाहीऐवजी संसदीय लोकशाही स्थापन होऊनही वास्तविक सत्ता धनिकाच्या हाती असते ते शोषणाचे नवे नवे मार्ग शोधून काढतात. म्हणून कामगारांनी राज्य संस्था ताब्यात घेऊन कामगारांची हुकूमशाही निर्माण करावी. शासनाची सर्व सूत्रे कामगारांच्या हाती आल्यामुळे ते त्या सत्तेचा वापर करून संपूर्ण भांडवलशाही नायनाट करतील आणि कारखाने व जमिनीची मालकी आपल्या ताब्यात घेतील.मार्क्स या अवस्थेला तात्पुरती अवस्था म्हणतो. भांडवलदार वर्ग नष्ट करणे आणि समाजवादाची स्थापना करणे हे या अवस्थचे मुख्य वैशिष्टये होते.

६. **साम्यवाद**:- या अवस्थेत शेती व कारखाने या उत्पादन साधनावर समाजाची मालकी प्रस्थापित होईल. त्यामुळे भांडवलदार वर्गाचा नायनाट होऊन समाजात एकच वर्ग राहील. त्यामुळे वर्ग संघर्ष नष्ट होईल. या अवस्थेत वर्ग विरहीत समाज निर्माण होईल. राज्य भांडवलदाराचे किंवा मालक वर्गाच्या हितासाठी निर्माण झाले होते तो वर्गच नष्ट झाल्यामुळे राज्यांची आवश्यकता राहणार नाही. राज्य विरून जाईल म्हणजे राज्य विरहीत समाज निर्माण होईल. प्रत्येक व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार काम करेल. प्रत्येकाला त्याचा हिस्सा दिला जाईल त्यामुळे कोणी कोणाचे शोषण करणार नाही. या अवस्थेत वर्गविरहीत व राज्यविरहीत अवस्था निर्माण होईल. कार्लमार्क्स या अवस्थेला शेवटची अवस्था म्हणतो.

**दोष परिक्षण**:- मार्क्सच्या विचारावर पुढील टीका केली जाते.

**१. एकांगी विचार-** मार्क्स मानव जीवनात बदल घडवून आणण्यासाठी आर्थिक घटक महत्वपूर्ण मानतो. हा दृष्टीकोन एकांगी आहे. कारण राजकीय व सामाजिक आणि वैयक्तिक महत्वाकांक्षा देखील इतिहासात परिवर्तन होते याकडे दुर्लक्ष करतो.

**२. गतिचक्राला नाकारतो-** मार्क्स मानवाचा विकास वाद, प्रतिवाद, संवाद या माध्यमातून घडतो. हे चक्र सतत चालू असते असे सांगतो. मात्र साम्यवाद ही शेवटची व्यवस्था आहे असे सांगून गतिचक्राला स्वतः शेवटी नाकारतो. ही त्यांच्या विचारात विसंगती दिसून येते.

**३. राज्य नष्ट होणे अशक्य-** साम्यवादी अवस्थत राज्य नष्ट होईलहे मार्क्स सांगतो पण रशिया व चीन मध्ये दीर्घकाळापासून साम्यवाद असूनही राज्य नष्ट झालेले नाही किंवा राज्याचे अधिकार कमी झाले नाहीत. उलट राज्याचे अधिकार वाढलेले दिसतात.

**४. चुकीचे भाकितकथन-** भांडवलदाराच्या अत्याचाराला कंटाळून कामगार क्रांती करतील हे मार्क्स सांगता.पण ही परिस्थिती इंग्लंड मध्ये असतांना रशिया, चीन सारख्या शेतीप्रधान देशात क्रांती झाली. याचा अर्थ मार्क्स भविष्यवाणी असत्य होती.

**५. धर्मावर टीका अयोग्य-** मार्क्स धर्माला अफूची गोळी मानतो. भौतिक विकास आणि भौतिक वस्तूंना महत्त्व देता. परंतु समाजाच्या अध्यात्मिक गरजा पूर्ण करण्यासाठी धर्माची गरज असते याकडे दुर्लक्ष करतो.

मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांत काही उणिवा दिसून येत असल्यातरी भांडवलदाराकडून कामगारांचे शोषण कसे केले जाते हे शास्त्रीयदृष्टया पटवून दिलेले आहे.

**प्र.३ रा. मार्क्सचा वर्गसंघर्ष कलह वा वर्गसंघर्षाचा सिद्धांत स्पष्ट करा?**

मार्क्सने 'साम्यवादाचा जाहीरनामा' ग्रंथात वर्गसंघर्षाची कल्पना मांडली. मानवाचा ज्ञात इतिहास हा वर्गसंघर्षाचा आहे, असे मार्क्स म्हणतो. मानव समाजाच्या प्राचीन काळापासून दोन वर्ग अस्तित्वात आहेत. आर्थिक विषमतेच्या आधारावर हे दोन वर्ग निर्माण झालेले दिसतात. ऐतिहासिक भौतिकवादानुसार समाजातील सहा अवस्थामध्ये विकास होत असतांना वर्गसंघर्ष कसा निर्माण झाला याचे स्पष्टीकरण मार्क्सने केले आहे. गुलामगिरी अवस्थेत शेती या उत्पादन साधनाचा शोध लागल्यामुळे खाजगी मालमत्तेची कल्पना जन्माला आली. त्यातून संपत्ती असणारा आहे रे आणि संपत्ती नसणारा नाही रे हे दोन वर्ग निर्माण झाले हे दोन्ही वर्ग एकमेकांच्या गरजेपोटी एकत्र आलेले असले तरी त्याचे हित परस्परविरोधी असल्याने वर्गामध्ये संघर्ष निर्माण होतो. म्हणून मार्क्स जगाचा इतिहास वर्गसंघर्षाने भरलेला आहे असे सांगतो. गुलामगिरी अवस्थेत मालक आणि गुलाम, सांमतशाहीत सांमत आणि शेतमजूर आणि भांडवलशाहीत कारखानदार आणि कामगार हे वर्ग दिसून येतात. या वर्गाचे एका शब्दात वर्णन करावयाचे झाल्यास एक वर्ग शोषक व दुसरा वर्ग शोषितांचा असतो. या दोन्ही वर्गात प्रत्यक्षाप्रत्यक्ष सातत्याने संघर्ष असतो. एक अन्याय करणारा आणि दुसरा अन्याय सहन करणारा हे दोन्ही वर्ग परस्परांच्या विरोधात कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे संघर्ष करतात. या संघर्षात अस्त समाजरचनेत बदल होऊन एका वर्गाचे अस्तित्व नष्ट होण्यात होता तर कधी कधी दोन्ही वर्गाचा नाश होऊन नवीन दोन वर्ग निर्माण झाले. वर्गाची नावे बदलली पण स्वरूप बदले नाही. या संघर्षात दोन्ही वर्गात कधीच समन्वय निर्माण होणार नाही कारण दोघांचे हेतू परस्पर विरोधी असतात आणि त्यातच त्यांचे हित असते. मार्क्स या वर्गसंघर्षास आहे रे वर्गास जबाबदार मानतो. भांडवलशाहीत वर्ग नष्ट करणे शक्य आहे. भांडवलशाहीत उत्पादन साधनाचे केंद्रीकरण होते. हा वर्ग संख्येने कमी असतो. लहान उद्योग व्यवसाय करणाऱ्यांचा टिकाव न लागल्याने ते श्रमिक होतात. त्यामुळे श्रमिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाते. श्रमिकांच्या शोषणामुळे ते गरिब होत जातात याउलट भांडवलदार अधिक श्रीमंत होतात. मार्क्स वर्गसंघर्षाचे विश्लेषण करतांना भांडवलशाहीच्या दोषाचे वर्णन करतांना म्हणतो की, भांडवलशाहीतच तिच्या विनाशाची बिजे दडलेली आहेत. भांडवलशाहीत कामगार कामाच्या निमित्ताने शहरी भागात कारखान्यात कामासाठी एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यात लवकर संघटन होते. एकाच कारखान्यात अनेक कामगार काम करतात. एका शहरात अनेक कारखाने असल्याने या कारखान्यात लाखो कामगार काम करतात. दळणवळणाच्या साधनाच्या विकासामुळे कामगारामध्ये विचाराचे आदान-प्रदान होते. सर्वांच्या समस्या समान असल्याने कामगार एकत्र येतात. भांडवलदार उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठा काबिज करण्यासाठी साम्राज्यवादी प्रवृत्तीस प्राधान्य देतात. साम्राज्यवादातून वसाहतीची देखील पिळवणूक होते. परिणामतः समान समस्यामुळे जागतिक कामगार एकत्र येऊन भांडवलदाराविरूद्ध क्रांती करून भांडवलदाराचा नाश करतात. या संघर्षात कामगारांचा विजय अटळ आहे. कारण

भांडवलदारापेक्षा कामगाराची संख्या जास्त आहे. क्रांती झाल्यानंतर कामगाराची हुकूमशाही निर्माण करून सर्व मालमत्ता समाजाच्या ताब्यात घेतल्यामुळे समाजात एक वर्ग उरतो. तो म्हणजे कामगार वर्ग असल्याने वर्गसंघर्ष होत नाही आणि शेवटी वर्गविहीन आणि राज्यविहीन समाजरचना निर्माण होते. मार्क्स 'जगातील कामगारांनो एकत्र या व क्रांती करा. क्रांतीत श्रमिकांना काहीही गमवायचे नाही.' हे आवाहन करून तो कामगार क्रांती आणि वर्गविरहीत समाजरचना निर्मितीचा सिद्धांताची मांडणी करतो.

**वर्गकलह सिद्धांत परीक्षण:-** मार्क्सच्या वर्गकलहाच्या सिद्धांत पुढील उणिवा आहेत.

१. **वर्गसंघर्षावर अनावश्यक भर-** मार्क्स जगाचा इतिहास वर्गसंघर्षाने भरलेला मानतो पण इतिहासात कायमस्वरूपी वर्गसंघर्ष दिसून येत नाही याउलट वर्गसंघर्षापेक्षा समन्वय जास्त दिसतो. मानवी समाजातील प्रेम, सद्‌भाव आणि सहकार्य याकडे तो दुर्लक्ष करतो. समाजात कायमस्वरूपी वर्गसंघर्ष दिसून येत नाही.

२. **दोनच वर्ग-** मार्क्स समाजात फक्त दोन वर्ग सांगतो. मात्र समाजात अनेक वर्ग असतात. त्याने मध्यम वर्गाकडे दुर्लक्ष केले. वास्तविक मध्यम वर्गाची संख्या सर्वात जास्त आहे.

३. **वर्गसंघर्षात कामगाराचा विजय अर्धसत्य-** भांडवलदार व श्रमिक संघर्षात कामगारांचा विजय अटळ मानतो. त्यांचा हा विचार वैज्ञानिक तथ्यापेक्षा आदर्शावर आधारलेला दिसतो. रशियात साम्यवादी क्रांती अपयशी ठरली त्यामुळे मार्क्स विचारांत सत्यतेचा अभाव दिसून येतो.

४. **भांडवलशाहीचा अंत अशक्य-** भांडवलशाहीच्या विकासातच तिचा अंत दडलेला मार्क्स मानतो. वास्तविक इंग्लंड आणि अमेरिकासारख्या औद्योगिक दृष्टया प्रगत राष्ट्रात क्रांती होऊन भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे होती. परंतु क्रांती औद्योगिक दृष्टया अप्रगत रशिया व चीनमध्ये क्रांती झाली तेथील क्रांती ही अपयशी झाली.

५. **वर्ग व राज्यविहीन समाज अशक्य-** कामगार क्रांती करून वर्गविरहीत व राज्यविहीन समाज निर्माण करतील मात्र रशिया व चीन मध्ये क्रांती होऊनही वर्ग व राज्य नष्ट झाले नाहीत तर रशियाने साम्यवादाचा त्याग केला.

६. **जागतिक मजूर एक हे दिवास्वप्न-** कामगाराच्या समस्या समान असल्याने ते एकत्र येऊन क्रांती करतील पण कामगारामध्ये अनेक प्रकारची विविधता असते. एका कारखान्याचे कामगार एकत्र येत नाहीत तर जगातील कामगार एकत्र येणे दिवा स्वप्न आहे.

मार्क्स वर्गकलहाच्या सिद्धांत अनेक दोष असले तरी भांडवलदार कामगारांचे शोषण कसे करतात हे दाखविणे हा प्रमुख हेतू होता. भांडवलदाराचे शोषणाचे स्वरूप स्पष्ट करून कामगारांना क्रांतीसाठी पोषक परिस्थिती विशद करण्याच्या उद्देशाने त्यांने या सिद्धांताची मांडणी केलेली होती.

**प्र.४ था. कार्ल मार्क्सच्या राज्यविषयक विचाराचे परीक्षण करा?**

ॲरिस्टॉटलच्या मते राज्याशिवाय राहणारा मानव पशू किंवा परमेश्वर असला पाहिजे असे म्हटले आहे याचा अर्थ व्यक्ती विकासासाठी राज्याची गरज असते. ॲरिस्टॉटल राज्य संस्थेला स्वाभाविक संस्था मानतो. राज्याच्या उद्देश जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे आणि व्यक्तीला सर्वोत्कृष्ट जीवनाची प्राप्ती आहे. जगातील अनेक विचारवंतानी मानवी विकासासाठी राज्यसंस्था आवश्यक मानली पण मार्क्स वरील राज्यविषयक विचार मान्य करीत नाही. त्यांच्यामते लोककल्याण हा राज्याचा उद्देश कधीच नव्हता. जनतेच्या विकासासाठी राज्य निर्माण झालेले नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्यासाठी राज्य हे साधन शोधून काढले आहे. राज्य हे धनवान लोकांच्या हातातील निर्धनांचे शोषण करण्याचे साधन आहे. प्राचीन साम्यवादात वर्ग व संपत्ती नसल्याने राज्य अस्तित्वात नव्हते. गुलामगिरी अवस्थेत शेती उत्पादन साधनातून मालक व गुलाम हे दोन वर्ग निर्माण झालेत. दोन्ही वर्गाचे हितसंबंध परस्परविरोधी असल्याने वर्गामध्ये संघर्ष होतो. गुलामांनी मालकाविरूद्ध बंड करू नये आणि गुलामांचे शोषण करता यावे यासाठी मालक वर्गाने एकत्र येऊन राज्य नावाची संस्था काढली. गुलामगिरीत गुलामांवर, संरजामशाहीत शेतमजूरावर आणि भांडवलशाहीत कामगारांची पिळवणूक करण्याचे राज्य हे साधन आहे. राज्य हे शासक वर्ग आणि भांडवलदार वर्गाचे हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी व मजूर वर्गाच्या शोषण करण्याचे कार्य करत असते. भांडवलदार राज्याचे पोलिस, लष्कर, कायदे व न्यायालया इ.मार्फत कामगारांचे शोषण करतात. राज्य ही भांडवलदाराची कमिटी आहे आणि ती आहे रे वर्गाने निर्माण

केलेली आहे. राज्यसंस्था ही संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी हितसंबंधी वर्गांनी निर्माण केलेली कृत्रिम संस्था आहे. क्रांती करून भांडवलदार वर्ग नष्ट करावयाचा असेल तर कामगारांनी राज्य ताब्यात घेतले पाहिजे. भांडवलदार ज्याप्रमाणे राज्याचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी केला त्याप्रमाणे कामगारांनी राज्याचा वापर करून भांडवलदाराचा नायनाट करून सर्व संपत्ती समाजाच्या मालकीची करावी. त्यामुळे एकच वर्ग अस्तित्वात राहील तो वर्ग म्हणजे कामगार वर्ग होय. वर्ग व संपत्ती नसल्यामुळे संघर्ष राहणार नाही. संघर्ष नसल्यामुळे राज्याची गरज राहणार नाही. राज्य आपोआप विरून जाईल किंवा हळूहळू आपोआप नष्ट होईल. कामगार क्रांतीच्या संक्रमणकाळ संपुष्टात आल्यावर राज्यसंस्था विसर्जित करावी असे मत मार्क्स मांडतो. राज्यविहीन व वर्गविहीन अवस्थेत प्रत्येक जण क्षमतेप्रमाणे काम करेल आणि प्रत्येकाला योग्य वाटा दिला जाईल. या अवस्थेला तो साम्यवाद असे नाव देतो.

**राज्यविषयक सिद्धांताची वैशिष्टये:-**

**१) राज्याचा आधार पाशवी-** राज्यसंस्था कृत्रिम व आपल्या स्वार्थी हेतूने धनिक वर्गाने श्रमिकांवर शक्तीच्या आधारावर लादलेली संस्था आहे असे मार्क्सला वाटते. राज्याचे पोलिस, कायदा, न्यायालय याचा वापर करून भांडवलदार श्रमिकांचे शोषण करतो. म्हणून राज्यसंस्थेचा नष्ट करण्यासाठी क्रांती हाच पर्याय त्याला योग्य वाटतो.

**२) वर्गसंघर्षचा संबंध-** मानवाच्या इतिहास वर्गसंघर्षने भरलेला आहे. वर्गसंघर्षाची सुरूवात उत्पादन साधनाच्या परिवर्तन वा बदलामुळे झाली. राज्य धनिक वर्गाचे हित जोपासणारी व्यवस्था असून मजूर हित विरोधी आहे.

**३) कामगारांचे शोषण-** कामगाराच्या शोषणाचे भांडवलदाराच्या हातामधील साधन म्हणजे राज्य होय. दोन वर्गात समन्वय कधीच होत नसतो. कामगारांना शोषण मुक्त करण्यासाठी राज्य नष्ट केले पाहिजे असे मार्क्सला वाटते.

**४) धनिक वर्गाचे हितसंबंध हा हेतू-** जनकल्याण हा राज्याचा हेतू कधीच नव्हता. राज्याचा हेतू पक्षपाती असतो. श्रमिक वर्गाचे दमन करणे व भांडवलदारांना सोयी सवलती देणे हे कार्य असते. भांडवलदाराच्या संपत्तीचे अंतर्गत व बाह्य धोक्यापासून संरक्षण केले जाते.

**५) राज्य संस्थेचा लोप-** राज्यसंस्था कल्याणकारी नसल्यामुळे व श्रमिकांचे शोषण करणारी यंत्रणा असल्यामुळे राज्याविहीन समाजाची आवश्यकता मार्क्सने सांगितली. त्यासाठी राज्य नष्ट करणे योग्य ठरेल असे मार्क्सने वाटते.

**मार्क्सच्या विचाराचे परीक्षण:-**

१. **राज्याचे एकांगी विवेचन-** राज्य म्हणजे शोषण व पिळवणूक करणारी संस्था हा मार्क्सने घेतलेला अर्थ अशास्त्रीय आहे. कारण संरक्षण, कायदा व सुव्यवस्थेसाठी राज्यसंस्थेची आवश्यकता असते याकडे दुर्लक्ष करतो.

२. **राज्याचा आधार शक्ती नव्हे-** राज्याचा आधार शक्ती असून त्यांचा जन्म जनकल्याणासाठी झाला नसून शोषणासाठी झाला आहे हे मार्क्स मत अयोग्य वाटते. राज्याचा आधार शक्ती नसून जनइच्छा असते. राज्याचे विविध विभागाचा वापर भांडवलदार कामगारांच्या शोषणासाठी करतो हे आजच्या कल्याणकारी राज्याचे स्वरूप अभ्यासल्यानंतर योग्य वाटत नाही.

३. **विसंगत विधाने-**कामगारांच्या शोषणाला विरोध करणारा मार्क्स कामगाराच्या हुकूमशाहीत भांडवलदाराच्या शोषणाला मान्यता देतो. भांडवलदाराच्या हुकूमशाहीला विरोध करणारा मार्क्स क्रामगार क्रांतीनंतर त्यांच्या हुकूमशाही लादतो. ही त्याच्या विचारात विसंगती आहे.

४. **राज्य नष्ट होणे अशक्य-** क्रांतीनंतर राज्य आपोआप नष्ट होईल हे मार्क्स सांगतो. पण रशिया व चीन मध्ये क्रांती होऊनही राज्य नष्ट झाले नाहीत म्हणून त्याचा सिद्धांत काल्पनिक वाटतो.

५. **पिळवणूक हे राज्याचे कार्य नव्हे-**पिळवणूक राज्याचे कार्य मानतो.मात्र प्रत्यक्षात राज्याचे स्वरूप तसे दिसत नाही.उलट राज्य व्यक्ती कल्याणासाठी कार्य करतांना दिसते.

मार्क्सच्या राज्यविषयक विचारात अनेक दोष आहेत. मार्क्सने या सिद्धांताद्वारे राज्याचा भांडवलदारकडून होणाऱ्या दुरूपयोगाकडे लक्ष वेधण्याचे कार्य केलेले दिसते. मार्क्सने राज्यावर घेतलेल्या गंभीर आक्षेप लक्षात घेऊन नंतरच्या राज्याच्या स्वरूपात व्यापक बदल झालेले दिसतात. त्या बदलाचे श्रेय मार्क्सच्या राज्यविषयक सिद्धांताला दिले पाहिजे.

**प्र.५ वा.कार्ल मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिद्धांत स्पष्ट करा?**

मार्क्सने 'दास कॅपिटल' ग्रंथात अतिरिक्त मूल्य सिद्धांत मांडला आहे. या सिद्धांताचा हेतू भांडवलदार वर्गाकडून कामगार वर्गाची पिळवणूक कशी होते हे दाखविणे होता म्हणून त्यांचा सिद्धांत आर्थिक पेक्षा राजकीय दृष्टया अधिक महत्त्वपूर्ण मानला जातो. मार्क्सच्या सिद्धांतावर रिकार्डोच्या सिद्धांताचा प्रभाव असल्यामुळे रिकार्डोच्या श्रममूल्य सिद्धांताची सुधारित आवृत्ती असेही म्हटले जाते. हा सिद्धांत वस्तूच्य किंमती निर्धारीत करणारा सिद्धांत नसून भांडवलशाही श्रमिकांच्या शोषणाचे विलेषण करणारा सिद्धांत आहे. प्रत्येक वस्तूला दोन प्रकारची मूल्य असतात.

१) **उपयोगिता मूल्य**:- ज्या वस्तूला मूल्य आहे पण त्या वस्तूवर श्रम खर्च झालेले नाही त्याला उपयोगिता मूल्य असे म्हणतात. उदा. हवा, पाणी

२) **विनीमय मूल्य**:- वस्तू तयार करण्यासाठी श्रम खर्च होते आणि श्रमानुसार वस्तूचे मूल्य ठरते त्यास विनिमय मूल्य असे म्हणतात उदा. बाक श्रम हा मूल्याचा प्रमुख आधार असतो.

**अतिरिक्त मूल्य व्याख्या**:- कामगाराने प्रत्यक्ष केलेले काम आणि त्याला मिळणारी मजुरी यातील फरकाला मार्क्स अतिरिक्त मूल्य असे म्हणतो.

मार्क्सचा सिद्धांत विनिमय मूल्याबाबत आहे. हा मूल्य निर्धारणाचा सिद्धांत भांडवलदार श्रमिकांच्या श्रमावर संपन्न जीवन जगून त्यांचे कसे शोषण करतो ह्या संबंधीचा सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार श्रमिकांचा उत्पादनात जो हिस्सा असतो. त्या हिस्साच्या प्रमाणात मजूरी दिली जात नाही. एखादी वस्तू तयार करण्यासाठी कामगाराला आठ तास लागले तर त्याला आठ तासाची मजुरी दिली पाहिजे पण भांडवलदार त्याला फक्त सहा तासाची मजूरी देता आणि उरलेल्या दोन तासांची मजूरी तो स्वतः घेतो. हे श्रमिकांना कळते मात्र तो निमूटपणे सहन करता कारण कामगाराला कामावर ठेवावे की नाही हे भांडवलदाराच्या मर्जीवर अवलंबून असते. तसेच काम मिळविण्याबाबत कामगारामध्ये स्पर्धा असल्यामुळे कामगार शांत बसतात आणि मजूर श्रम साठवून ठेऊ शकत नाही.

मार्क्सच्या मते वस्तूची किंमत पुढील सूत्राच्या आधारे ठरते. कच्चामाल + मजूरी = वस्तूची किंमत उदा.एखादी खुर्ची बनवायला पन्नास रूपयाचा कच्चा माल लागला. खुर्ची बनविण्याऱ्या मजुराला वीस रूपये मजूरी दिली तर वरील सूत्रानुसार वस्तूची किंमत सत्तर रूपये पाहिजे पण भांडवलदार ती शंभर रूपयाला विकतो. त्या तीस रूपयाला मार्क्स अतिरिक्त मूल्य म्हणतो. या तीस रूपयांमधुन वस्तू तयार करणाऱ्या कामगाराला काहीही मिळत नाही. कारण वस्तूचे उत्पादन होते तेव्हा वस्तू विकली जात नाही मात्र मजूरी दिली जाते. नंतर नफा घेऊन विकली जाते. वस्तूची किंमत वाढविण्यासाठी भांडवलदार कृत्रिम टंचाई किंवा अनेक युक्ता प्रयुक्ता करून वस्तूची किंमत वाढवतो. वस्तू किंमती कृत्रिमरीत्या वाढविण्याचा प्रयत्न करतो. वस्तूची किंमत जितकी जास्त वाढेल तितके अतिरिक्त मूल्य त्याला मिळते. अतिरिक्त मूल्याच्या जारोवर भांडवलदार श्रीमंत होत जातो तर कामगार गरीब राहतो. त्यांचा समाजावर देखील विपरीत परिणाम होतो. लहान उद्योजकांचे उद्योग भांडवलदार पैसाच्या जोरावर विकत घेतो. त्यामुळे भांडवलदाराची संख्या कमी होत जाते. कामगारांची संख्या वाढतच जाते. या शोषणाविरूद्ध कामगार क्रांती करून एक दिवस भांडवलशाही नष्ट करतील. क्रांतीनंतर सर्व उद्योग समाजाच्या मालकीचे करतील. त्यामुळे कोणीही अतिरिक्त मूल्य घेणार नाही.

**परीक्षण वा दोषः-**

१) **केवळ श्रमाला महत्त्व-**वस्तूचे मूल्य मागणी आणि पुरवठा सिद्धांतावर आधारीत असते पण मार्क्स श्रमानुसार वस्तूची किंमत ठरवतो हे तत्व अयोग्य व अशास्त्रीय आहे.

२) **मूल्य शब्दाचा अयोग्य वापर-** मार्क्सचा अतिरिक्त मूल्य सिद्धांताबाबतची विधाने अशास्त्रीय आहेत. वस्तूच्या उत्पादना व किंमतीत कच्चामाल, श्रम, भांडवल, संयोजन हे चारही घटक महत्वाचे असतात. मार्क्स फक्त श्रमाला महत्व देतो. तसेच मार्क्स मूल्य शब्दाचा अर्थशास्त्रीय आशय लक्षात न घेता राजकीय कारणासाठी वापर करतो.

३) **बौद्धिक श्रमाकडे दुर्लक्ष-** मार्क्स फक्त शारीरिक श्रमाला महत्व देऊन बौद्धिक श्रमाकडे दुर्लक्ष करतो. मात्र वस्तूचे उत्पादन करतांना शारीरिक श्रमाबरोबर तंत्रज्ञ, पैसा, संशोधन इ.बौद्धक श्रमाचाही समावेश होतो याकडे तो दुर्लक्ष करतो.

४) **भांडवलदाराच्या खर्चाकडे दुर्लक्ष-** कच्चा माल अधिक श्रम बरोबर वस्तुची किंमत हे सूत्र सांगतो. परंतु यंत्रसामुग्री, व्यवस्थापन, दुरूस्ती खर्च, वाहतुक खर्च, जागेचे भाडे, कर्जावरील व्याज इ. खर्चाकडे दुर्लक्ष करतो.

५) **अयोग्य भाकितकथन-** मार्क्सचा अतिरिक्त मूल्याबाबतचे भविष्य खोटे ठरले आहे. मार्क्सने वर्णन केलेली परिस्थिती इंग्लंडमध्ये असतांना औद्योगिकदृष्टया मागासलेल्या रशिया व चीन देशात क्रांती झाली.

वरील प्रकारची टीका भांडवलशाहीवर मार्क्स सिद्धांताने केल्यामुळे भांडवलदारांनी आपल्या वर्तनात बदल करून कामगाराच्या वेतन व सवलतीत वाढ केली. यावरून मार्क्सच्या विचारांचे महत्त्व लक्षात येते.

**टिप- कार्ल मार्क्सचे धर्माविषयी विचार -**

मार्क्स हा भौतिकतावादी विचारवंत असल्याने धार्मिक विचाराचे महत्व नाकारले आहे. त्याच्यामते पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कल्पनाना कोणताही शास्त्रीय आधार नाही. मार्क्स धर्माला अफूची गोळी वा नशा मानतो. असंतुष्ट व गरजा पूर्ण होत नसलेल्या समाजातील असंतोष कमी करण्यासाठी राज्यकर्त व भांडवलदार वर्ग धर्माचा वापर करतात. धर्मातील तत्त्वज्ञानामुळे लोक आपले दुःख विसरून भविष्यावर हवाला ठेवतात. धर्माचा वापर करून भांडवलदार व धर्मगुरू कामगारांचे शोषण करतात. धर्म कर्तबगारीवर विश्वास ठेवण्याऐवजी नशिबावर विश्वास ठेवून जगण्यास प्रोत्साहन देतात. धर्मामुळे कामगाराची कर्तृव्यशक्ती झाकली जाते. दोषपूर्ण अर्थव्यवस्था असेल तर भांडवलदार व राज्यकर्ते वर्ग धर्माचा आधार घेऊन लोकांना आपली दुःखे विसरण्यास व क्रांतीपासून त्यांना परावृत्त करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करत असतात. वास्तवतेपेक्षा काल्पनिक गोष्टीवर विश्वास ठेवून दारिद्रय व हलाखीच्या परिस्थितीत समाधान मानण्याची वृत्ती निर्माण करतात. मानवात परिस्थितीत परिवर्तन करण्याचे सामर्थ्य असून धर्म व्यक्ती विकासात अडथळे निर्माण करतो. जैसे थै परिस्थितीत राहण्यातच समाधान आहे ही शिकवण देतात म्हणून मार्क्स धर्माचे महत्व नाकारून शुद्ध भौतिकतावादी भूमिका स्वीकारतो आणि धर्माला मानवाच्या विकासाचा शत्रू मानतो.

**टिप- कामगार वर्गाची हुकूमशाही (Dictatorship of Proletariat)-**

श्रमिकांची क्रांती हा अंतिम उद्देश नसून समाजवादी समाजरचनेची प्रस्थापना हे श्रमिकांचे अंतिम ध्येय असते. या ध्येयाप्रत पोहचण्यासाठी क्रांती हे पहिले पाऊल असते. नवसमाज निर्मितीसाठी निर्माण झालेली एक संधी असते. या संधीचे यशात रूपांतर करण्यासाठी क्रांतीनंतर तात्पुरत्या स्वरूपात कामगारांची हुकूमशाही निर्माण करावी असे मार्क्सचे मत आहे. अतिरिक्त मूल्य व वर्गसंघर्षामुळे कामगार वर्ग क्रांतीच्या माध्यमातून भांडवलदाराची सत्ता नष्ट करतील आणि शासनाची सूत्रे आपल्या ताब्यात घेतील असे मार्क्स मानतो. जोपर्यंत कामगार क्रांती करून भांडवलशाहीचा अंत करत नाही तोपर्यंत भांडवलदार स्वतःहून सत्ता त्यागणार नाहीत. सत्ता ताब्यात घेतल्यानंतर सत्ता व शक्तीच्या आधारावर म्हणजे कामगारांच्या हुकूमशाहीच्या बळावर सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचे मार्क्स मानतो. कामगार क्रांतीनंतर आपोआप व्यवस्था बदलणार नाही. भांडवलशाही व्यवस्था नष्ट करून साम्यवादी व्यवस्था निर्माण करण्यास वेळ लागेल. जोपर्यंत जुनी समाजव्यवस्था नष्ट करून नवी समाजव्यवस्था निर्माण होणार नाही जोपर्यंत जुन्या-नव्या व्यवस्थेत संघर्ष नष्ट करण्यासाठी मधल्या वा संक्रमणकाळात कामगारांच्या हुकूमशाहीची आवश्यकता मार्क्स सांगतो. या अवस्थेत कामगार उत्पादनाची सर्व साधने सामुहिक मालकीची करतील. या व्यवस्थेला विरोध करणाऱ्या भांडवलदाराचा नायनाट केला जाईल. कारण या वर्गाकडून प्रतिक्रांतीचा धोका आहे. कामगारांची हुकूमशाही ही अल्पसंख्य भांडवलदारासाठी हुकूमशाही असली तरी बहुसंख्य कामगारांसाठी लोकशाही आहे. लास्कीच्या मते "कामगार वर्गाची हुकूमशाही लोकशाही विरोधी असते. ती भांडवलदार लोकांच्या विरोधातील लोकशाही व्यवस्था असते. खरी समाजवादी समाजरचना असलेली ती एक चांगली व्यवस्था असते. ती कायमची असत नाही."ही एक तात्पुरती व्यवस्था असून साम्यवादाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचण्याचे साधन आहे. ही हुकूमशाही नव्या व्यवस्थेची स्थापना करण्याचे साधन आहे. समाजवादी अवस्था निर्माण झाल्यानंतर समाजात वर्ग राहणार नाही. त्यामुळे संघर्षही राहणार नाहीत. परिणामतः राज्याची गरज ही राहणार नाही. वर्गविहीन व राज्यविहीन समाजरचनेचा अंतिम उद्देश साध्य होईल. मार्क्स या अंतिम अवस्थेला साम्यवाद असे नांव देता.

अशा प्रकारे मार्क्स साम्यवाद प्रस्थापनेसाठी कामगारांच्या हुकूमशाही आवश्यकता विशद करतो.

**प्र. ६ वा. कार्ल मार्क्सच्या विचारांचे उदारमतवादी दृष्टीकोनातून परीक्षण वा मूल्यमापन करा?**

मार्क्सने विचारसरणीवर उदारमतवादी विचारवंतानी पुढील आक्षेप घेऊन उणिवा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **मार्क्सचा भौतिकवाद एकांगी स्वरूपाचा-** मार्क्सने मांडलेला विरोध विकासवाद सिद्धांत एकांगी स्वरूपाचा दिसून येतो. त्याने जगातील परिवर्तनाला आर्थिक व भौतिक घटक जबाबदार आहेत हे मत मांडले पण हे मत एकांगी आहे. कारण जगाच्या इतिहासात केवळ आर्थिक घटकाच्या आधारावर परिवर्तन घडत नसून तर नैतिक, धार्मिक व कायदाविषयक संस्था देखील आपआपल्या परीने विकासात हातभार लावतात याकडे तो दुर्लक्ष करतो.

२. **वर्ग संघर्ष अपरिहार्य नाही-** मार्क्सच्या मते संपूर्ण जगाचा इतिहास वर्गसंघर्षाने भरलेला आहे. हिसात्मक मार्गाने अवलंब केल्याशिवाय वर्ग विरहीत समाज निर्माण होणार नाही. टीकाकाराच्या मते हा दृष्टिकोन चुकीचा आहे. जगात कायमस्वरूपी वर्गसंघर्ष दिसून येत नाही. याउलट वर्गसंघर्षाऐवजी वर्गसमन्वय जास्त दिसून येतो.

३. **वर्गविरहीत समाज अशक्य-** मार्क्सन साम्यवाद या अवस्थेत वर्गविरहीत समाज निर्माण करण्याचे स्वप्न रंगविले आहे पण प्रत्यक्षात वर्गविरहीत समाज निर्माण करणे शक्य नाही. सामाजिक श्रमविभागणी हा सामाजिक संबंधाचा एक भाग आहे. मार्क्सवादी क्रांतीनंतर रशिया व चीन मध्ये वर्ग नष्ट झाले नाही. या उलट रशियाने साम्यवादाचा त्याग केलेला दिसतो.

४. **राज्यसंस्थेचा लोप होण अशक्य-** कामगारांनी क्रांती केल्यानंतर कामगाराची हुकूमशाही ही अवस्था निर्माण होईल पण ही अवस्था तात्पुरती असेल असे मानतो. या नंतर शेवटीची अवस्था साम्यवाद असेल व या अवस्थेत राज्य नष्ट होईल पण राज्य नष्ट होणे शक्य नाही. राज्य नष्ट झाल्यास समाजात अराजकता निर्माण होईल. रशिया व चीन देशात कामगाराची हुकूमशाहीनंतर आजपर्यंत राज्य नष्ट झालेले दिसून येत नाही तर राज्याचे अधिकार वाढलेले दिसतात.

५. **अतिरिक्त मूल्य सिद्धांत दोषपूर्ण-** मार्क्सने मूल्य आणि किंमत यात गल्लत केली. त्यांने कामगारांच्या मानसिक श्रमाकडे दुर्लक्ष केले फक्त शारीरिक श्रमावर भर दिला. तसेच वस्तूचे मूल्य हा श्रमिक शक्तीचा परिणाम नसतो. श्रमाशिवाय अनेक महत्वपूर्ण गोष्टी वस्तूचे मूल्य निश्चित करतो. मार्क्स फक्त श्रमाच्या आधारावर वस्तूचे मूल्य निश्चित करून अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत मांडतो पण हा सिद्धांत भांडवलदाराच्या इतर खर्चाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे हा सिद्धांत दोषपूर्ण आहे.

६. **चुकलेला भविष्यकर्ता-** कार्ल मार्क्सने वर्गसंघर्ष आणि समाजवादी रचनेबद्दलची भविष्यवाणी खरी ठरली नाही. मार्क्सचा सिद्धांतानुसार भांडवलशाहीचा ज्या प्रमाणात विकास होईल त्या प्रमाणात वर्गसंघर्ष तीव्र होईल आणि कामगार भांडवलदांच्या विरोधात एकत्र येऊन क्रांती करतील. मात्र ही परिस्थिती अमेरिका व इंग्लंडमध्ये असतांना रशिया व चीन सारखा औद्योगिक दृष्टया मागास देशात प्रथम क्रांती झाली. त्यामुळे मार्क्सला चुकलेला भविष्यकर्ता मानले जाते.

७. **हिंसात्मक मार्गावर भर-** कार्ल मार्क्सने वर्गविरहीत समाजरचना निर्माण करण्यासाठी क्रांती व हिंसात्मक मार्गाचे समर्थन करतो. क्रांतीशिवाय परिवर्तन होणार नाही यावर भर देतो. परंतु जगातील देशांनी अहिंसात्मक व सनदशीर मार्गाने समाजवाद निर्मितीचा प्रयत्न केलेला दिसतो. क्रांतीतून अराजकतेला निमंत्रण मिळू शकते याकडे दुर्लक्ष होते. क्रांतीतून होणारे परिवर्तन कोणते वळण घेईल याचा अंदाज येत नाही. म्हणून मार्क्सचा हिंसात्मक मार्गाचा दिलेला भर अयोग्य आहे.

८. **शोषणविरहीत समाजनिर्मिती अशक्य-** मार्क्स भांडवलदार वर्गाच्या शोषणातून कामगारांना मुक्ती मिळवून देण्यासाठी कामगार क्रांतीची गरज विशद करतो. कामगार क्रांतीनंतर भांडवलशाही उरलेसुरले सर्व अवशेष नष्ट करण्यासाठी कामगारांची हुकूमशाहीची स्थापना करतो. या काळात सर्व उत्पादन साधने समाजाच्या मालकीची करतो. सर्व उत्पादन साधने समाजाच्या मालकीची झाल्यामुळे शोषणविरहीत समाजची स्थापना होईल असे मानतो.

परंतु प्रत्यक्ष व्यवहारात शोषणविरहीत समाजाची स्थापना होणे शक्य नाही. भांडवलदार जरी नष्ट झाले तरी प्रशासकांकडून कामगाराचे शोषण होईल हे लक्षात घेत नाही.

अशा प्रकारे उदारमतवादी विचारवंताकडून मार्क्सच्या विचारावर टीका केली जाते.

**एका वाक्यातील अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. अतिरिक्त मुल्य म्हणजे काय?

उत्तर:- कामगाराने प्रत्यक्ष केलेले काम आणि त्याला मिळणारी मजुरी यातील फरकाला मार्क्स अतिरिक्त मूल्य असे म्हणतो. या सिद्धांतानुसार श्रमिकांचा उत्पादनात जो हिस्सा असतो.तो हिस्साच्या प्रमाणात मजूरी दिली जात नाही.

२. कार्ल मार्क्सने लिहिलेल्या ग्रंथाची नांवे लिहा.

उत्तर- मार्क्सने The Poverty of Philosophy,The Communist Manifesto,Das Capital ,Value Price and Profit,The Critique of Political Economy इ.ग्रंथ लिहीले.

३. मार्क्सचे धर्माविषयीचे विचार सांगा.

उत्तर- मार्क्स हा भौतिकतावादी विचारवंत असल्याने धार्मिक विचाराचे महत्व नाकारले आहे.त्यांच्या मते पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कल्पनाना कोणताही शास्त्रीय आधार नाही. तो धर्माला अफूची गोळी वा नशा मानतो. धर्माचा वापर करून भांडवलदार व धर्मगुरू कामगारांचे शोषण करतात. धर्मामुळे माणूस कर्तबगारीवर विश्वास ठेवण्याऐवजी नशिबावर विश्वास ठेवून जगण्यास प्रोत्साहन देतो.धर्मामुळे कामगाराची कर्तृव्यशक्ती झाकली जाते.

४. मार्क्सने मांडलेले दोन प्रमुख सिद्धांत सांगा.

उत्तर - मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवाद, वर्गकलह आणि अतिरिक्त मूल्य सिद्धांत हे प्रमुख सिद्धांत मांडले आहेत.

५. मार्क्सच्या विचारावरील दोन उदारमतवाद्यांनी केलेल्या टीका लिहा.

उत्तर- मार्क्सचा भौतिकवाद एकांगी स्वरूपाचा आहे, मार्क्सला चुकलेला भविष्यकर्ता मानले जाते आणि राज्यविरहीत व वर्गविरहीत समाज निर्माण करणे अशक्य आहे हे प्रमुख टीका उदारमतवादी करतात.

६. राज्यविरहीत समाज म्हणजे काय?

उत्तर -मार्क्सच्या मते लोककल्याण हा राज्याचा उद्देश कधीच नव्हता. जनतेच्या विकासासाठी राज्य निर्माण झालेले नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्यासाठी राज्य हे साधन शोधून काढले आहे. राज्य भांडवलदाराचे किंवा मालक वर्गाच्या हितासाठी निर्माण झाले होते तो वर्गच नष्ट झाल्यामुळे राज्यांची आवश्यकता राहणार नाही. राज्य विरून जाईल म्हणजे राज्य विरहीत समाज निर्माण होईल. प्रत्येक व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार काम करेल. प्रत्येकाला त्याचा हिस्सा दिला जाईल त्यामुळे कोणी कोणाचे शोषण करणार नाही.

७. मार्क्सची वर्गसंघर्षची संकल्पना सांगा.

उत्तर - मार्क्स जगाचा इतिहास वर्गसंघर्षाने भरलेला आहे असे सांगतो.गुलामगिरी अवस्थेत मालक आणि गुलाम,सांमतशाहीत सांमत आणि शेतमजूर व भांडवलशाहीत कारखानदार आणि कामगार हे वर्ग दिसून येतात.त्यापैकी एक अन्याय करणारा आणि दुसरा अन्याय सहन करणारा हे दोन्ही वर्ग परस्परांच्या विरोधात कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे संघर्ष करतात.या संघर्षात कधी कधी दोन्ही वर्गाचा नाश होऊन नवीन दोन वर्ग निर्माण झाले.वर्गांची नावे बदलली पण स्वरूप बदले नाही.मार्क्स या वर्गसंघर्षास आहे रे वर्ग जबाबदार मानतो.

८. कामगारांच्या हुकूमशाहीचे प्रमुख उद्देश कोणते?

उत्तर- उत्पादन साधने समाजाच्या मालकीची करण्यासाठी, भांडवलशाहीचा संपूर्ण नायनाट करणे आणि भांडवलदाराकडून प्रतिक्रांती होऊ नये म्हणून ही हुकूमशाही असते हे कामगारांच्या हुकूमशाहीच्या स्थापनेचे प्रमुख उद्देश सांगता येतात.

९. मार्क्सच्या विचारांच्या आधारावर कोणत्या दोन देशात साम्यवादी क्रांती झालेली होती.

उत्तर- मार्क्सच्या विचारांच्या आधारावर रशिया आणि चीन देशात साम्यवादी क्रांती झालेली होती.

## प्रकरण २ रे
## जॉन स्टुअर्ट मिल
(इ.स.१८०६ ते १८७३)

**जीवन परिचय-** उपयोगितावादी विचारवंत बेंथमचा मित्र व शिष्य जेम्स मिलचा जॉन हा मुलगा होता. त्यांचा जन्म लंडन येथे २० मे १८०६ रोजी झाला. वडीलाकडून त्याला उपयोगितावादाचे धडे लहानपणापासूनच मिळाले होते त्यामुळे तो पहिल्यापासूनच उपयुक्ततावादाचा कट्टर समर्थक बनला होता. तो अतिशय तल्लख बुद्धीचा होता. लहानपणीच त्यांने ग्रीक व लॅटिन भाषा शिकण्यास प्रारंभ केला. वयाच्या १२ व्या वर्षी प्लेटो, ॲरिस्टॉटल व होमर यांचा अभ्यास केला. १४ व्या वर्षी भावाबरोबर फ्रॉन्सला गेला. एक वर्ष फ्रान्समध्ये राहण्याचा योग आला तिथल्या निसर्ग सौंदर्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. तेथे त्याने फ्रेंच भाषा अवगत करण्याचा प्रयत्न केला. फ्रॉन्समधुन परत आल्यानंतर उपयोगितावादी समितीचा सदस्य बनला. काही काळ ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी केली. जॉन ऑस्टिनच्या सहवासात रोमन कायदयाचा अभ्यास केला. तो संसदेचा काळी काळ सभासद होता. त्याकाळात स्त्री मताधिकार, अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व इ. पुरोगामी विचार मांडल्यामुळे दुसऱ्यादा निवडून येऊ शकला नाही. श्रीमती हॅरियट टेलर या स्त्रीशी परिचय झाला. या स्त्रीच्या सहवासात त्यांच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले. श्रीमती हॅरियट टेलर जी त्यांच्या मित्राची पत्नी होती तिचे सौदर्य, कोमलता व भावूकतेचा त्यांच्या जीवनावर खूप प्रभाव पडलेला होता. श्री टेलरच्या मृत्यूनंतर त्याने तिच्याशी विवाह केला. मात्र विवाहानंतर सात वर्षात तिचे निधन झाले. त्यामुळे तो एकाकी बनला. परंतु तिच्या मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव मिलवर कायमस्वरूपी राहिला. त्याने आपला On Liberty हा ग्रंथ आपल्या पत्नीस समर्पित केला. पत्नी निधनानंतर आपला बरचसा वेळ पुस्तके लिहीण्यात घालविला. West Minister Review मधील त्याचे अनेक लेख गाजले. London Review मासिकाचाही तो संपादक होता. मिलने On Liberty, Utilitarianism, Consideration on Representative Government, Principles of Political Economy, Thoughts on Parliamentary Reforms, Essay on Religion, System of Logic इ. ग्रंथाचे लेखन केले. मिलच्या विचारावर बेंथम व जेम्स मिल, फान्स मधील वास्तव्य, श्रीमती टेलरचा प्रभाव, संसद सदस्य असतांना प्रभाव, जॉन ऑस्टिन, ऑगस्त कॉम्प्त इ. विचारवंताचा प्रभाव दिसून येतो. ८ मे १८७३ ला या महान विचारवंताचे निधन झाले.

**प्र.१ ला. मिलचे उपयोगितावादावर केलेले संशोधन वा विचार स्पष्ट करा?**

मिलचे वडील जेम्स मिल हे बेंथमचे शिष्य व उपयोगितावादाचे कट्टर समर्थक होते. मिलवर लहानपणापासून वडीलांनी उपयोगितावादाचे संस्कार केल्यामुळे तो उपयोगितावादाचा कट्टर समर्थक बनला. प्रौढ वयात आल्यानंतर उपयोगितावादावर होणाऱ्या टीकेला समर्थ उत्तर देण्यासाठी उपयोगितावादावर संशोधन केले. मात्र संशोधन करता करता उपयोगितावादाचे मूळ स्वरूपच बदलून टाकले. मिलने उपयोगितावादाचे विश्लेषण करत असतांना त्याला मानवतावादी चेहरा देण्याचा प्रयत्न केला. बेंथमचा उपयुक्ततावाद स्वीकारतो पण त्यातील कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करतो. तो व्यक्तिस्वातंत्र्यवादी असल्यामुळे बेंथमच्या सर्व कल्पना मान्य करीत नाही. उपयोगितावादात काळाप्रमाणे बदल घडवून आणतो. बेंथमचे उपयोगितावादी विचार चार मूलभूत कल्पनांवर आधारित आहेत.

**अ)** मानवी जीवनात आनंद हाच योग्य व दु:ख हे वाईट असते.

**ब)** आनंद आणि दु:ख याचे मोजमाप करता येऊ शकते .

**क)** प्रत्येक माणूस आनंद उपभोगण्याचा आणि दु:ख टाळण्याचा प्रयत्न करतो.

**ड)** सर्व सुखे ही गुणात्मक दृष्टया सारखी असतात.

मिलने या गृहित कल्पनांना विरोध करून त्यात सुधारणा घडवून आणल्या. मिलने उपयोगितावादाला व्यावहारिक रूप प्राप्त करून दिले. मिलने उपयोगितावादावर संशोधन करतांना व्यक्तिवादावर जास्त भर दिल्यामुळे

त्याला अंतिम उपयुक्ततावादी आणि प्रथम व्यक्तिवादी मानले जाते. त्याने Utilitarianism ग्रंथात आपले संशोधित विचार पुढील प्रमाणे मांडले आहेत.

१. **सुख-दुःखाच्या स्वरूपात फरक-** बेंथम सुख-दुःखात केवळ मात्रात्मक फरक मानतो. मिलने त्यात गुणात्मक फरक मानुन भर टाकतो. बेंथम सुखाच्या भौतिक मात्रेवर भर देता तर मिल गुणात्मक सुखाला अधिक महत्व देतो. बेंथम मिष्टान्न भोजन आणि कालिदासाच्या काव्यवाचना आनंद सारखेच मानतो. मिल ही गोष्ट मान्य करीत नाही. सर्वच सुखे सारखी नसतात. त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठता असते. मिल शारीरिक सुखाला पेक्षा बौद्धिक सुखाला श्रेष्ठ मानतो. त्यांच्यामते पशू होऊन समाधानी होण्यापेक्षा माणूस होऊन असमाधानी राहणे चांगले, मुर्खाच्या संतुष्टपेक्षा असंतुष्ट साक्रेटिस बरा मात्रात्मक सुखातून सुखाची एकच बाजू लक्षात येते तर ज्ञानी माणसाला गुणात्मक बाजूची माहिती असते. त्यामुळे श्रेष्ठ पुरूषाचे दुःख सुखी माणसापेक्षा श्रेष्ठ असते असे तो मानतो.
२. **मूल्यांकन अशक्य-** संख्यात्मक मात्रेमुळे सुख दुखाचे मूल्याकन करता येते असे बेंथमला वाटते पण मिलने गुणात्मक फरक केल्यामुळे मूल्यांकनाचे सर्व मान्य निष्फळ ठरतात. सुख आणि दुःख अमूर्त कल्पना असल्याने त्याचे मूल्यांकन अशक्य आहे. प्रत्येकाला एकाच गोष्टीमुळे सारखा आनंद होत नाही. शास्त्रीय संगीत ऐकण्याने काहींना आनंद तर काहींना कंटाळवाणे वाटेल.
३. **नैतिक मूल्यांचा आधार-** बेंथम मानवी जीवनाचा उद्देश सुखप्राप्ती असल्याने राज्याने अधिकतम लोकांचे अधिकतम सुखाला महत्व देऊन नैतिक विचारांचे महत्व नाकारतो. मिल नैतिक विचारांना महत्व देतो. मिलने राज्याला नैतिक संस्था मानतो. राज्याचा उद्देश वैयक्तिक सुख वाढविणे नसून व्यक्तींच्या नैतिक गुणांचा विकास करणे असते. वैयक्तिक सुख किंवा उपयोगिता वाढविणे नसून व्यक्तींच्या गुणांचा विकास करण्याचा असतो. मिल येशूच्या उपदेशाने नैतिकता स्पष्ट करू इच्छीतो. "तुम्ही तुमच्या सोबत दुसऱ्याने कसे वागावे याची जशी इच्छा करता तसे प्रथम दुसऱ्यासोबत वागण्याचा प्रयत्न करा. तुम्ही तुमच्या जेवढे प्रेम करतो तेवढे शेजाऱ्यावर करा. आपले हित व सुख दुसऱ्याच्या हित व सुखात पहा." नैतिकता हाच उपयोगितेचा आधार आहे. बेंथमला कोणत्याही स्थितीत सुख पाहिजे होते तर मिल मानवाला प्रथम उन्नत करून त्यांच्या सुखाचा दर्जा वाढण्याच्या विचाराचा पुरस्कार करतो.
४. **प्रत्यक्ष व अनुभूतीमधूनही सुख मिळते-** बेंथम मते सुखामुळे मानवाला काम करण्याची प्रेरणा मिळते. माणूस आपले हित असल्याशिवाय दुसऱ्यांची सेवा करणार नाही. मिल या तत्वाला विरोध करतो. व्यक्ती आपल्या हिताचा विचार करते पण विकसित विचारांमुळे कार्य हे ध्येय मानते. सार्वजनिक सुखातच सुख शोधते. परोपकार, सहानुभूती यात त्यांना सुख दिसते. मृत्यूचा धोका पत्करून एखादयाला मृत्यूच्या दाढेतून सोडविण्याचा आनंद अतुलनीय असतो.
५. **सुख ही बाहय तसेच आंतरिक प्रेरणा-** माणूस सुखप्राप्तीचा प्रयत्न करण्याची चार कारणे बेंथम सांगतो. अ) सामाजिक- समाजात प्रतिष्ठा मिळण्यासाठी ब) राजकीय- राजकीय कायदे पालन करण्यासाठी क) धार्मिक- स्वर्गप्राप्तीकरिता प्रयत्न ड) शारीरिक- शरीर सुखाकरीता

या सर्व बाहय गोष्टीमुळे माणूस सुखाकडे आकर्षित होतो. मिलने यात नैतिक, मानसिक व अध्यात्मिक सुखाची भर टाकतो. उदात्त ध्येय गाठण्यासाठी त्याग करण्यातून मिळणारे सुख हे आंतरिक असते. स्वातंत्र्यासाठी हसतहसत फाशावर जाणाऱ्या क्रांतिकारकाचे सुख आंतरिक असते.

६. **कायदयापेक्षा नैतिक सामाजिक बंधने श्रेष्ठ-** बेंथम राज्याने अधिकतम लोकांचे अधिकतम हित या आधारावर कायदे करावेत असे म्हणतो. मिलच्या मते उपयुक्ततेचे निश्चित मापयंत्रे वा मापदंड नसल्यामुळे उपयुक्तता कायदयाचा आधार होऊ शकत नाही. सुव्यवस्था व नैतिक उन्नती हा कायदयाचा त्याने मानलेला आहे. कायदापेक्षा नैतिकतेमुळे निरूपयोगी वाटणारी कामे व्यक्ती आनंदाने करते. त्यामुळे उपयोगिता हा एकच निकष लावणे योग्य नाही. उदा.वृद्ध आई वडिलांची सेवा करणे कायदयाचा आधार जनइच्छा आहे असे मिल मानतो.

७. **राज्याचे कार्यक्षेत्र व स्वातंत्र्य-** वैयक्तिक सुख प्राप्तीमुळे सामाजिक सुख प्राप्त होऊ शकेल म्हणून बेंथम राज्याकडे नकारात्मक कार्य सोपवितो. मात्र मिल सार्वजनिक कल्याणासाठी व्यक्ती जीवना हस्तक्षेप करण्याचा राज्याला परवानगी देतो.बेंथमने स्वातंत्र्याला उपयोगितेच्या सिद्धांताचे साधन मानले तर मिलने स्वातंत्र्याला स्वयंसाध्य मानुन स्वातंत्र्याला अधिक महत्व दिले.

८. **इतिहास व परंपरासंबंधी-** बेंथम उपयुक्ततेच्या आधारावर सर्व गोष्टी समान करू इच्छीतो. त्याने तयार केलेले संविधान सर्व देशांना सारख्या प्रमाणात लागू करता येइल असे त्याला वाटते. मिल त्यांच्या विचाराशी सहमत नाही. प्रत्येक देशाचा इतिहास व परंपरा वेगवेगळया असल्याने प्रत्येक देशातील शासनव्यवस्था त्या देशाच्या परिस्थितीनुसार असली पाहिजे यावर भर देतो.

९. **राज्याच्या कार्यक्षेत्रासंबंधी-** उपयुक्ततावादी बेंथम व्यक्तिगत सुखप्राप्तीमुळे सामाजिक सुख प्राप्त होऊ शकेल हे मत व्यक्त करतो. मिल व्यक्तिगत जीवनात आवश्यक प्रमाणात राज्याने हस्तक्षेप करून नियंत्रण टाकण्यास मान्यता देतो. मिल हा व्यक्तीवादी असल्यामुळे राज्याच्या कार्यक्षेत्राला मर्यादित ठेवण्यावर भर देतो. परंतु व्यक्ती विकास व सामाजिक कल्याण यात बाधक ठरणाऱ्या कार्यावर प्रतिबंधात्मक उपाय योजण्याचा अधिकार राज्याला देतो.

१०. **स्वातंत्र्यवादी विचार-** बेंथम स्वातंत्र्याला उपयोगितेच्या सिद्धांताचे साधन मानले तर मिल स्वातंत्र्यालाच स्वयंसाध्य मानले बेंथम राज्याकडे नकारात्मक कार्य सोपवितो मिल आर्थिक क्षेत्रात राज्य हस्तक्षेपाला मान्यता देतो.

वरील सर्व विवेचनात मिलने उपयोगितावादात महत्वपूर्ण संशोधन केलेले असले तरी त्याने केलेले संशोधन इतकी जास्त आहेत की त्यामुळे मूळ उपयुक्ततावाद शिल्लक राहिला नाही. वेपरच्या मते, उपयोगितावादावर होणाऱ्या टीकेला समर्पक उत्तर देऊन त्यांचे संरक्षण करण्याच्या हेतून मिलने एवढी संशोधने केली की उपयुक्ततावादाचा परित्याग केला. मिलने उपयोगितावाद सिद्धातात मोलाची भर टाकलेली आहे. त्याने उपयोगितावादाला नैतिकतेची जोड दिली आहे. त्याने उपयुक्ततावादाला मानवतावादी रूप देण्याचे कार्य केले आहे यातून त्यांच्या विचाराचे महत्त्व लक्षात येते.

**प्र.२ रा. मिलचे स्वातंत्र्यासंबंधी विचार स्पष्ट करा?**

मिलचा On Liberty हा विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल विचार मांडणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. वेपरच्या मते, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा चांगला ग्रंथ यापूर्वी लिहिला गेला नव्हता असा अभिप्राय दिला आहे. मिलची स्वातंत्र्याची संकल्पना ही उपयुक्ततावादाशी संबंधित आहे. सुखाचा स्वातंत्र्य हा अत्यंत महत्त्वाचा अंतिम मार्ग असून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्याची आवश्यकता असते. स्वातंत्र्याचे संरक्षण वा हती सामाजिक कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाची असते. इंग्लंडमधील संसद त्यावेळी उपयुक्ततावादाच्या नावावर अनेक कायदेशीर बंधने व्यक्तीस्वातंत्र्यावर लादण्याचा प्रयत्न करीत होती. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होऊ लागला. राज्य आपले अधिकार वाढवत गेले तर शासनाची हुकूमशाही निर्माण होईल, प्रजातंत्र धोक्यात येऊन व्यक्तिस्वातंत्र्याचा ऱ्हास होईल असे मिलला वाटल्याने त्याने व्यक्तिस्वातंत्र्यावर प्रतिबंध लादणाऱ्या कायदाना विरोध केला. मिल स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार मानत नाही. व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार कार्य करण्याचा अधिकार म्हणजे स्वातंत्र्य होय.स्वातंत्र्यावर मर्यादा असल्या पाहिजेत पण त्या मर्यादितच असल्या पाहिजेत. कारण मनुष्याला आपला विकास घडवून आणण्यामध्ये समाज व राज्याकडून अडचणी निर्माण होऊ शकतात. मिलला राज्य व समाजाची अनुचित बंधने मान्य नाहीत. मिलने राज्य व समाजाच्या हुकूमशाही प्रवृत्तीपासून व्यक्तीला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी त्याने प्रयत्न केले. राज्य व समाज यापेक्षा व्यक्तीला स्वत:ला आपले हित अधिक समजते. म्हणून तिला सर्वांगीण प्रगती करण्यासाठी आणि विचार करण्यासाठी स्वतंत्रता असावी. राज्य आणि समाजाने व्यक्तीवर जोपर्यंत बंधने लादू नये की जोपर्यंत व्यक्ती वर्तनाचा दुसऱ्या कुणावर अनिष्ट परिणाम होत नाही. समाजाच्या जुन्या परंपरा व श्रद्धांना धक्का पोचेल अशी मते समाज मान्य करीत नाही. येशू ख्रिस्त व सॉक्रेटिसने समाजापुढे नवी मूल्ये ठेवल्याने समाजने त्यांचे जीवन हिरावून घेतले. आज त्याचे विचार पटल्याने समाज त्यांची पूजा करतो. म्हणून मानवी प्रगतीसाठी स्वातंत्र्य आवश्यक असते.

मिलने प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील दोन दृष्टिकोन मान्य केले आहेत. एक म्हणजे वैयक्तिक दृष्टिकोन जो त्यांच्या स्वत:च्या जीवनापुरता मर्यादित असतो. तर दुसरा दृष्टिकोन सामाजिक असतो. प्रत्येक व्यक्ती समाजाचा भाग

असल्याने समाजाशी संबंधित असतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला दोन कार्य करावी लागतात. स्वसंबंधी कार्य व परसंबंधी कार्य होय. समाजविकास हा प्रत्येकाच्या विकासावर आधारित असल्याने प्रत्येकाला विकासासाठी विचार करण्याचे व ते अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे लागते या आधारावर मिल स्वातंत्र्याचे १. विचार स्वातंत्र्य २. आचार स्वातंत्र्य या दोन भागात वर्गीकरण करतो. विचार स्वातंत्र्य बंधनमुक्त असावे तर आचार स्वातंत्र्यावर काही उचित मर्यादा स्वीकारतो.

**अ) विचार स्वातंत्र्य-** मिल हा विचार स्वातंत्र्यावर समाज व राज्याचे कोणतेही बंधन मान्य करीत नाही. कारण मानवाच्या प्रगतीसाठी विचार स्वातंत्र्य आवश्यक मानतो. ते नाकारणे म्हणजे मानवी समाजाची प्रगती रोखणे असे मानतो. विचार स्वातंत्र्याशिवाय सत्याचा शोध घेता येणार नाही. प्रत्येक व्यक्तीचे मत सत्य, अर्धसत्य व असत्य अशा तीन प्रकारचे असू शकते. सत्य विचारापासून मानवी समाज वंचित राहिला तर त्यांची प्रगती होणार नाही. म्हणून व्यक्ती शहाणा असो वा मूर्ख, तिचे विचार सत्य असो वा असत्य तिच्या विचारावर बंधने लादण्याचा अधिकार समाज वा राज्याला नाहीत. जरी एका व्यक्तीला वगळून अखिल मानवजातीचे मत एका प्रकारचे असेल तरी त्यांच्या मताची मुस्कटदाबी करणे न्यायसंगत नाही. विरोधी मत धारण करणाऱ्या व्यक्तीची मुस्कटदाबा करेल ती गोष्ट मानवी जातीच्या वर्तमान व भावी पिढयांना सत्याच्या अंशापासून वंचित ठेवणे असे मानतो. मिलने विचार स्वातंत्र्याची गरज खालील कारणासाठी सांगितलेली आहे.

१. सॉक्रेटिस सारख्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानी व्यक्तींला देशवासींनी अनैतिक मानून प्राणदंड दिला. येशू ख्रिस्ताला आपण आज परमेश्वर मानतो. त्यांना ईश्वरनिंदेमुळे देहदंड दिला. या महापुरूषीची सनकी म्हणून निर्भर्त्सना केली गेली. या ऐतिहासिक घटनेवरून असे दिसते की, सनकी म्हणून त्याच्या मताची मुस्कटदाबी करतो तेच भविष्यात समाजाचे कल्याणकारक तत्त्ववेत्ते ठरले आहेत. म्हणून विचारांच्या दमानाने मानवी समाजाचे अतोनात नुकसान झाले आहे.
२. विचार स्वातंत्र्य न देण्याचा परिणाम सत्याचे दमन होईल. त्यामुळे प्रत्येकाला हा अधिकार असला पाहिजे. समाजातील बहुसंख्य लोक एखादी गोष्ट मानतात म्हणून ती सत्य आहे असे मानने चूक ठरेल. १७ व्या शतकात सूर्य पृथ्वी भोवती फिरतो असे लोक मानत. गॅलिलिओने पृथ्वी सूर्याभोवती फिरते सांगितल्यामुळे त्याला शिक्षा भोगावी लागली. बहुमताचा अन्याय दूर करण्यासाठी विचार स्वातंत्र्य आवश्यक असते.
३. सत्य कोणत्याही एका गट वा व्यक्तीची जहागिरी नसते. सत्याचे विराट स्वरूप असल्याने अनेक पैलू असतात. त्यातील एक पैलू सत्य मानने हे चार आंधळे व हत्तीच्या गोष्टीसारखे आहे. संपूर्ण सत्य जाणून घेण्यासाठी वेगवेगळया दृष्टिकोनाची गरज असते. हे भिन्न भिन्न दृष्टिकोन एकमेकांच्या विरोधी नसून पूरक असतात.
४. सत्याला उजाळा देण्यासाठी सदृढ विचार स्वातंत्र्याची गरज असते. साने जसे अग्नीतून तावून सुलाखून निघाल्यावर शुद्ध होते तसे वादविवादाच्या तर्कावर सत्याची पारख होते. या बाबत मिल डार्विनचा जीवशास्त्रीय नियम लागू करतो योग्य असणाराचा विजय होईल. योग्य विचार तर्करूपी संघर्षात विजयी होईल. समाजाला प्रगतीपथावर नेण्याकरीता विचारस्वातंत्र्य राज्याने दिले पाहिजे असे त्याला वाटते.

१९ व्या शतकात उदारमतवादी विचारवंतानी जुलूमी शासनाच्या नियंत्रणापासून मुक्तीसाठी जनतेला स्वातंत्र्य व विद्रोह करण्याचा अधिकार असावा अशी मागणी केली. मिलला देखील राज्याप्रमाणे समाजदेखील स्वातंत्र्यावर आघात करतो. समाजाने रीतीरिवाज व परंपरेच्या माध्यमातून मानवाला बंदिस्त केलेले आहे. समाज व राज्याच्या बंधनापासून व्यक्तीला मुक्ती मिळवून देण्यासाठी तो विचार स्वातंत्र्याचे समर्थन करतो.

**ब) आचार स्वातंत्र्य-** विचार जोपर्यंत कृतीतून उतरत नाही तोपर्यत विचारांना काहीच अर्थ नसतो. विचाराबरोबर कार्य करण्याने समाजाची प्रगती होते. त्यामुळे विचार व कृती स्वातंत्र्य परस्परपूरक असते. मिलने विचार आणि भाषण स्वातंत्र्याच्या क्षेत्रात व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. पण आचार स्वातंत्र्याबाबत संपूर्ण स्वातंत्र्याचे समर्थन तो करीत नाही. त्याने काही अटीसह आचार स्वातंत्र्यावर राज्याला प्रतिबंध लादण्याचा अधिकार दिला आहे. तो व्यक्तीच्या कार्याचा दोन भाग करतो.

**१) व्यक्तिगत वा स्वसंबंधी कार्य-** व्यक्तीच्या ज्या कार्याचा परिणाम तिच्या स्वतःपुरता मर्यादित असतो. दुसऱ्यावर बरा वाईट परिणाम होत नाही त्या कार्याला स्वसंबंधी कार्य म्हणतो.उदा.खाणे, पिणे, शिक्षण घेणे इत्यादी व्यक्तिगत कार्यासाठी

व्यक्तींना संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार कोणत्याही बंधनाशिवाय हे कार्य करता आले पाहिजे.

**२) सामाजिक वा परसंबंधी कार्य-** व्यक्तीच्या ज्या कार्याचा परिणाम इतरांवर पडतो. त्या कार्याला परसंबंधी कार्य म्हणतो. समाजातील इतर व्यक्तीचे स्वातंत्र्य नष्ट होईल असे कार्य व्यक्तीकडून होता कामा नये. समाजातील कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहचेल असे कार्य करण्याचा अधिकार व्यक्तींला असू शकत नाही. अशा कार्यावर राज्याला पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मिल मान्य करतो.

मिलच्या मते राज्याला व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आत्मरक्षणामुळे मिळू शकतो. उदा.नदी ओलांडण्यासाठी पुलावरून जाता येईल पण नादुरूस्त पुलावरून जाता येणार नाही कारण त्यामुळे व्यक्तीच्या जीवास धोका आहे. व्यक्तीला वाईट कार्यापासून परावृत्त करण्याचे दोन मार्ग सांगतो. एक निवारात्मक व दुसरा सुधारणात्मक मिलच्या मते कायदेशीर मार्ग आंतरिक सुधार करू शकत नाही. ती वरवरची मलमपट्टी असते. शिक्षेच्या भीतीने लोक कायदा पालन करतील पण अवैध मार्गाने ते कार्य करतील. उदा. दारूबंदी व्यक्तीच्या अंतर्मनात बदल झाला पाहिजे त्यासाठी  शिक्षण व प्रबोधन हाच योग्य मार्ग मानतो. मिलची स्वातंत्र्याची संकल्पना तीन महत्त्वपूर्ण तत्त्वावर आधारित आहे. मिलने व्यक्तींच्या भावना व इच्छांना महत्त्व देऊन व्यक्तिगत कार्यात स्वातंत्र्याचे समर्थन केले, उत्स्फूर्तता व व्यक्तिमत्त्व या दोन गोष्टी व्यक्तिविकास व समाज कल्याणासाठी आवश्यक मानल्या, सामाजिक परंपरा विरोध केला. सामाजिक परंपरा प्रगतीला खीळ घालणारे माध्यम मानतो. मिल स्वातंत्र्य सुसंस्कृत व सुशिक्षित समाजाला देऊ इच्छीत होतो. असंस्कृत व अविकसितांना स्वातंत्र्य नाकारतो.

**मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचार मूल्यमापन वा टीका किंवा परिक्षण-** मिलच्या स्वातंत्र्य संकल्पनेचा आशय चांगला असला तरी प्रत्यक्ष उपयोगात आणतांना व्यावहारिक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे त्या विचारावर पुढील टीका होतात.

१. **स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना-** बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असा मिलने घेतलेला अर्थ आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या समाजात हा दृष्टिकोन अपूर्ण व नकारात्मक आहे. राज्याने मानवी विकासाच्या मार्गातील अडचणी दूर कराव्यात म्हणजे निवारात्मक भूमिका घ्यावी, प्रतिबंधात्मक नव्हे हे त्यांचे मत दिसते. पण राज्याला सकारात्मक कार्य दिल्याशिवाय खरे स्वातंत्र्य उपलब्धे होणे कठिण वाटते.

२. **अधिकाराकडे दुर्लक्ष-** अधिकाराशिवाय स्वातंत्र्य म्हणजे कार्याविणा वाचाळता ठरेल. मिल व्यक्तीस्वातंत्र्याचे वर्णन प्रभावीपणे करतो. पण स्वातंत्र्य रक्षणासाठी प्रभावी उपाय सांगत नाही. बार्करच्या शब्दात मिल पोकळ स्वातंत्र्य आणि अमूर्त व्यक्तीचे समर्थन करणारा प्रेषित आहे.

३. **कार्य स्वातंत्र्याचे विभागणी अनावश्यक-** मिलने कार्य स्वातंत्र्याचे स्वसंबंधी व परसंबंधी कार्यात विभागणी केली ती अनावश्यक आहे.‌व यक्तीच्या प्रत्येक कार्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत असतो. उदा.मद्यपान करणे हे वैयक्तिक कार्य आहे. परंतु मद्यपान केल्याने व्यक्तीला नशा आल्यामुळे व्यक्ती चोरी, मारामारी व अनैतिक कर्तव्य करू शकते. त्यामुळे अशा अनैतिक कार्यावर बंधने आवश्यक असतात.

४. **राज्याचा हस्तक्षेप वाढेल-** मिलने परसंबंधी कार्याच्या संदर्भात राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार देता आहे. व्यक्तीच्या परसंबंधी कार्याचा परिणाम समाजावर होत असेल तर राज्याला समाजाच्या भल्यासाठी निर्बंध लादण्याचा अधिकार देतो. परंतु या तत्वाचा आधार घेऊन धुरंधर राज्यकर्ते आपले अधिकार वाढवून व्यक्ती जीवनात हस्तक्षेप करतील. मिल स्वातंत्र्यावरील राज्याची बंधन नाकारत अप्रत्यक्षपणे बंधने मान्य करतो.

५. **विचार विसंगती-** मिल स्वातंत्र्याचा प्रभावी पुरस्कर्ता आहे. परंतु असंस्कृत व अज्ञानी लोकांना तो स्वातंत्र्य नाकारतो. उपयुक्ततावादी आणि व्यक्तीवादी मिल अनेक बाबतीत पुरोगामी विचार मांडतो. मात्र कष्टकऱ्यांना स्वातंत्र्यापासून वंचित ठेवतो हे आश्चर्यकारक वाटते ही त्यांच्या विचारांत विसंगती वाटते.

६. **तर्क व वितंडवाद अहितकारक-** मिलने विचारस्वातंत्र्यावर भर देताना प्रत्येक गोष्ट तर्काच्या कसोटीवर घासून स्वीकारावी हे मत व्यक्त केले. हे मत व्यवहारात अजमावणे शक्य नाही तसेच प्रत्येक गोष्ट तर्कावर घासल्याने समाजात संघर्षमय परिस्थिती निर्माण होईल ते समाजहिताचे ठरणार नाही.

७. **लहरीपणा व्यक्तिमत्त्वाचा दुर्गुण-** मिल विचारस्वातंत्र्यावर कोणतेही बंधन मान्य करीत नाही. दहा लहरी व्यक्तीतून एखादी अलौकिक व्यक्ती निर्माण होऊन समाजाला क्रांतिकारक विचार देईल हा मिलचा तर्क योग्य वाटत नाही. लहरीपणा हा व्यक्तीचा मनोविकास व दुर्गुण आहे. तत्त्वज्ञानी होण्यासाठी लहरीपणाची गरज नसते. याउलट त्या प्रवृत्तीवर बंधन ठेवणे योग्य ठरेल. विकृत व्यक्तींना स्वातंत्र्य दिल्याने समाजाचे अकल्याण होईल हे लक्षात घेत नाही.

मिलच्या स्वातंत्र्यविषयक विचार काही दोष असले तरी त्याचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार राज्यशास्त्राला मिळालेली देणगी आहे हे अमान्य करता येणार नाही.

**प्र.३ रा. जे. एस. मिलचे प्रातिनिधिक लोकशाहीत सुचविलेल्या सुधारणा स्पष्ट करा ?**

**किंवा**

**मिलचे प्रातिनिधिक लोकशाहीबद्दलचे विचार सांगा?**

मिलने लोकशाही शासनव्यवस्थेला इतर शासनप्रणालीच्या तुलनेत श्रेष्ठ मानतो. इंग्लंडमधील प्रचलित शासनप्रणालीमध्ये अनेक दोष अभ्यास करून त्याने त्यात सुधारणा सुचविल्या. On Representative Government या ग्रंथात मिलने प्रातिनिधिक शासनप्रणालीमधील उणिवा व उपाय यांची चर्चा केलेली आहे. मिल प्रथम सर्वोत्कृष्ट शासन कशास म्हणावे त्यांचे निकष सांगतो.

**अ)** ज्या शासन व्यवस्थेच्या नियंत्रणात नागरिक राहतात त्या शासनव्यवस्थेत त्यांना सहभागी होता आले पाहिजे.

**ब)** नागरिकांना सहभागी होण्याच्या सोयी उपलब्ध करून दयाव्यात.

क) सक्तीने कुणालाही सहभाग घेण्यास भाग पाडू नये.

**ड)** शासनव्यवस्थेत बहुमत प्राप्तीसाठी सहभाग नसावा तर अल्पसंख्याकांच्या हित रक्षणाची भावना असावी.

**इ)** सहभागीत्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असू शकते.

मिल सर्वोत्कृष्ट शासन त्या शासन व्यवस्थेत मानतो त्या व्यवस्थेत शासनावर नियंत्रण ठेवणारी सार्वभौम सत्ता संपूर्ण समाजात निहीत असते. मिल लोकशाहीला शासनाला श्रेष्ठ मानत असला तरी सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्तीसाठी योग्य मानतो. अशिक्षित समाजात लोकशाही यशस्वी होणार नाही. शासनाचे यश समाजातील व्यक्तींची योग्यता व कर्तव्यावर अवलंबून असते. बौद्धिक विकास आणि गुणांच्या अभिव्यक्तीसाठी प्रतिनिधिक शासनप्रणाली योग्य मानतो. लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते. बहुमताची हुकूमशाही ही हुकूमशाहीपेक्षा घातक असते. या बहुमताच्या हुकूमशाहीला आवर घालण्यासाठी आणि लोकशाही शासन यशस्वी करण्यासाठी पुढील उपाययोजना सांगतो.

१. **प्रमाणशीर प्रतिनिधित्व-** लोकशाहीतील सामान्य मतदान पद्धतीत अनेक दोष आहेत. त्यातील महत्त्वाचा दोष म्हणजे सत्तारूढ पक्षाला प्राप्त मतांपेक्षा अधिक जागा मिळून त्यांचे बहुमत वाढते व विरोधी पक्षात मते विभागली गेल्यामुळे त्यांना साधे प्रतिनिधित्व मिळत नाही. समाजात अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व मिळत नाही. प्रतिनिधित्व नसल्यामुळे त्यांच्या हिताकडे सदैव दुर्लक्ष केले जाते. एकप्रकारे बहुसंख्याकांची अल्पसंख्याकांवर हुकूमशाही निर्माण होते. हा दोष नष्ट करण्यासाठी मिलने प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा पुरस्कार करतो. या पद्धतीत सर्व लोकांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळते. त्यामुळे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचे समर्थन मिल करतो.

२. **शैक्षणिक व संपत्तीची पात्रता-** मतदाराची पात्रता विषयी मिल सांगतो की, लोकशाहीत बहुसंख्य लोकांचे शासन असल्याने अज्ञानी व निरक्षर लोक निवडून येतात. त्यामुळे मतदारावरच काही योग्यतेची बंधने टाकली पाहिजेत. लोकशाहीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ते आवश्यक असते. लोकशाहीच्या यशासाठी निरक्षरांना मतदानाचा अधिकार देऊ नये. ज्यांना लिहता वाचत येते व प्राथमिक अंकगणित करता येते त्यानांच मतदानाचा अधिकार दयावा. तसेच शैक्षणिक योग्यतेप्रमाणे संपत्तीची योग्यता सांगतो. संपत्तीधारक कर भरत असल्यामुळे ते जबाबदारीने वागतात. म्हणून जे लोक कर भरतात. त्यांना मतदानाचा अधिकार दयावा.

३. **स्त्री मतदान-** स्त्रियाविषयी मिलची मते उदार स्वरूपाची होती. श्रीमती टेलरच्या सहवासाचा तो प्रभाव असू शकतो. स्त्री-पुरूषात बौद्धिक भेद नाहीत. त्यांना समान दर्जा दिला पाहिजे. स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारल्यास निम्मे लोकसंख्या राजकीय अधिकारापासून वंचित करणे ठरेल. स्त्रियांना संधी मिळाल्यास पुरूषाच्या बरोबरीने योग्यता सिद्ध करू शकतात. त्यामुळे स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे असे समर्थन मिल करतो.

४. **बहुल मतदान पद्धती-** लोकशाहीचा आणखी एक दोष म्हणजे सर्वजण सारखे मानले जातात. योग्यता, बुद्धिमत्ता आणि शिक्षण यांना काहीच महत्त्व नसते. लोकशाहीत डोकी मोजली जातात डोक्यातील विचार नव्हे म्हणून हे समाजाला घातक ठरेल. मिल सांगतो की, व्यक्ती जितका सुशिक्षित असेल तर तितकी तिला जास्त मते देण्याचा अधिकार असावा. तसेच श्रीमंत व्यक्तींना शासनात थोडे अधिक महत्व देण्यास हरकत नाही. गुण व संपत्तीला अधिक महत्त्व दिल्यामुळे चांगले शासन निर्माण होण्यास मदत होईल. म्हणून मिल संपत्तीधारक व सुशिक्षितांना जास्त मते देण्याच्या अधिकाराचे समर्थन करतो.

५. **प्रतिनिधित्व-**मतदाराप्रमाणे मिल प्रतिनिधीसाठी काही योग्यता सांगतो. मतदाराप्रमाणेच प्रतिनिधी सुशिक्षित, बुद्धिवान, व्यापक दृष्टीकोन असणारा हवा. जनतेला मार्गदर्शन करणारा असावा. राजकीय पक्षाच्या नियंत्रणापासून मुक्त व भांडवलदार प्रवृत्तीच्या प्रभावापासून मुक्त असण्यासाठी निवडणुकांचा खर्च राज्याने करावा. संसद सदस्यांना मानधन असू नये असे त्याचे मत होते.

६. **खुले मतदान-** उपयुक्ततावादी बेंथम व जेम्स मिल यांनी गुप्त मतदान पद्धतीचे समर्थन केले होते. मिल मतदानाला नैतिक व पवित्र कर्तव्य मानतो. त्यामुळे गुप्त मतदान निरर्थक मानतो. गुप्त मतदानात भ्रष्टाचार, लाचलुचपत, धमकीची शक्यता असते. खुल्या मतदानामुळे मतदारांची जबाबदारी वाढते. ते स्वार्थापेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करतात. त्यामुळे मिल खुले मतदानाचे समर्थन करतो.

७. **संसदेबाबत विचार-** मिलने संसदेचे सार्वभौमत्व मान्य केले आहे. कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाची कायदेविषयक सत्ता मान्य करून त्याने विधेयक संसदेसमोर सादर करण्याची क्षमता व अधिकार दिला. त्याने संसदेच्या दोन गृहाची आवश्यकता सांगतो. संसदेवरील कामाचा ताण कमी करणे व योग्य व्यक्तींकडे योग्य कार्य सोपविण्याच्या हेतूने संसद कार्यात सुधारणा सुचविल्या आहेत. कायदयाच्या पूर्ण ज्ञान नसलेल्या व्यक्ती विधिमंडळाच्या मोठया प्रमाणात सदस्य असू शकतात. तेव्हा संसद सदस्यांत काही प्रतिनिधी तज्ञ व अर्हता असणारे असतात. संपूर्ण सभागृहाने कायदा निर्मितीच्या उद्योगात न पडता त्यासाठी तज्ञाची समिती निर्माण करून समितीने कायदा करावा. समितीने तयार केलेला कायदा संसदेने मान्य करावा. तो नाकारण्याचा अधिकार संसद सदस्याना देता पण त्यात सुधारणा करण्याचा अधिकार नाकारून तो संसदेचे कार्य सिमीत करतो. संसदेचे काम सरकार चालविणे नसून सरकारचे निरीक्षण व नियंत्रण करण्याचे असते. सत्तेचा दुरूपयोग करणाऱ्याला शासनाला सत्तेवरून दूर करणे, शासनाच्या कार्यावर प्रकाश टाकणे इ.संसदेचे कार्य असते. मिल संसदेची संख्या जास्त असल्यामुळे तांत्रिक बाबीसंबंधी संसद सदस्यांना अनुभव नसल्यामुळे समिती पद्धती सुचवितो. कायदेमंडळाच्या विविध कामासाठी अनुभवी व तज्ञांच्या समित्याची गरज विशद करतो.

**टीकात्मक परीक्षण-**

**१.** **प्रमाणशीर प्रतिनिधीत्व-** प्रमाणशीर पद्धत अत्यंत गुंतागुंतीची असते. तिचा वापर सुशिक्षितांपुरता करता येऊ शकतो. या पद्धतीत वाजवीपेक्षा जास्त उमेदवार निवडून येण्याची शक्यता असल्याने अनेक पक्ष उदयास येऊन शासन अस्थिर होण्याची शक्यता जास्त असते. तरीही या पद्धतीचा वापर काही ठिकाणी केला जातो. उदा. भारतात राज्यसभा निवडणुक

**२.** **मर्यादित मतदान-** मिलने शैक्षणिक व संपत्तीची पात्रता लादून बहुसंख्य लोकांना मतदानाच्या पवित्र अधिकारांपासून वंचित ठेवले. लोकशाहीचा समर्थक असूनही लोकांना मतदानाचा समान अधिकार नाकारतो. त्यामुळे लोकांचे शासन होण्याऐवजी मर्यादित मतदानामुळे बुद्धिवंत व संपत्तीधारकाचे शासन होईल.

३. **बहुल मतदान गैरवाजवी-** शिक्षणाच्या आधारावर एकापेक्षा जास्त मते देण्याचा अधिकार असमर्थनीय आहे. शिक्षण ही योग्यतेची एकमेव कसोटी नाही. अनुभव हा त्यापेक्षा अधिक क्षमता दाखवू शकतो. बहुल मतदान समता व लोकशाहीविरोधी आहे. त्यामुळे अल्पसंख्य सुशिक्षित व संपत्तीधारकाचे राज्य येईल.

४. **खुले मतदान असमर्थनीय-** मिल मतदानाला पवित्र मानतो. त्यासाठी खुले मतदानाचा पुरस्कार करतो. परंतु त्यात व्यावहारिक अडचणी आहेत. गुप्त मतदानातील अनुत्साह बघता खुल्या मतदानाची टक्केवारी किती असेल याबद्दल शंका येते. खुले मतदानामुळे संघर्ष व विरोध पत्करावा लागेल.

५. **संसदेसंबंधी मर्यादा-** संसद सदस्यांना वेतन देऊ नये ते सेवाभावी कार्य करतील हे मत आदर्शाच्या दृष्टीने योग्य असेल पण व्यवहारात उपयोगी नाही. समितीने केलेल्या कायदयात संसदेन दुरूस्त्या करू नये असे सांगून संसदेला फारच मर्यादित अधिकार देतो. संसद ही निव्वळ समिती नसून शासनाची सर्वोच्च शाखा आहे हे लक्षात घेत नाही.

मिलने प्रतिनिधीक शासनातील उणिवांचा अभ्यास करून त्या दूर करण्याचे उपाय सुचविले आहेत. त्या उपायातील काहीत दोष आहेत हे मान्य करून देखील आज त्यांच्या अनेक विचारांना बहुतेक देशानी स्वीकारलेले दिसते. प्रमाणशीर प्रतिनिधित्व, स्त्रियाना मतदानाचा अधिकार, साक्षरतेचे महत्त्व हे लोकशाहीच्या संरक्षणासाठी मिलने सुचविलेल्या उपायाइतके प्रभावी उपाय आजपर्यंत कोणालाही सांगता आले नाहीत. म्हणून लोकशाहीचा समर्थक व स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता म्हणून मिलचे नाव जगातील इतिहास चिरस्मरणीय ठरले आहे.

**टिप- जॉन मिलचे स्त्री स्वातंत्र्याविषयी विचार-**

जॉन मिलने On Liberty, Subjection of Woman ग्रंथात मिलने स्त्री स्वातंत्र्याचे जोरदार समर्थन केलेले आहे. मिलच्या स्त्रिया विषयक विचारांवर त्यांची पत्नी श्रीमती हॅरियट टेलर सौंदयवती स्त्रीचा प्रभाव होता. मिलची स्त्रीविषयी मते उदार स्वरूपाची होती. त्यांच्यामते स्त्री -पुरूष बौद्धिक भेद नाहीत. त्यामुळे त्यांना पुरूषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने संधी व दर्जा मिळाली तर ती पुरूषांच्या बरोबरीने आपली योग्यता सिद्ध करू शकतात. स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नाकारल्यामुळे अर्धी लोकसंख्या राजकीय अधिकारांपासून वंचित करणे ठरेल. खऱ्या लोकशाहीसाठी हा अन्याय दूर झाला पाहिजे. आणि त्यासाठी स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. मिल सामाजिक व राजकीय क्षेत्रात स्त्रियांना स्वतंत्र करू इच्छीत होता. स्त्रियांना राजकीय अधिकार देऊनच समाजाचा दर्जा उचावू शकते. स्त्रियाची गुलामगिरी व दास्यमुक्ती लवकरात लवकर नष्ट केली पाहिजे. स्त्री स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्रभावी कायदे तयार केले पाहिजे. स्त्रीयांना गुलामगिरी व अन्याय करणाऱ्यांना कायदयाने शिक्षा केली पाहिजे. समाजात स्त्रीयांना विकासाची संधी उपलब्ध करून दिल्यास स्वातंत्र्याच्या नव्या वातावरणात त्यांना कार्य करण्याची संधी मिळेल. स्त्री स्वातंत्र्यामुळे स्त्रियांच्या विकासाला चालना मिळेल. अशा पद्धतीने मिलने स्त्री स्वातंत्र्याची समर्थन केलेले दिसते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. प्रतिनिधिक शासनाबद्दल मिलचे विचार लिहा.

उत्तर- मिल प्रतिनिधिक लोकशाहीला शासनाला श्रेष्ठ मानत असला तरी सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्तीसाठी योग्य मानतो. अशिक्षित समाजाला लोकशाही यशस्वी होणार नाही. शासनाचे यश समाजातील व्यक्तींची योग्यता व कर्तव्यावर अवलंबून असते. ही लोकशाही यशस्वी करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्व आणि मतदानासाठी शैक्षणिक व संपत्तीची पात्रता व बहुलमतदान पद्धतीचे समर्थन करतो.

२. जे. एस. मिलने कोणते ग्रंथ लिहीले आहेत.

उत्तर- मिलने On Liberty, Utilitarianism, Consideration on Representative Government, Principles of Political Economy, Thoughts on Parliamentary Reforms, Essay on Religion, System of Logic इ.ग्रंथाचे लेखन केले.

३. मिलचे उपयोगितावादाविषयी थोडक्यात विचार सांगा.

उत्तर- मिलवर लहानपणापासून वडिलांनी उपयोगितावादाचे संस्कार केल्यामुळे तो उपयोगितावादाचा कट्टर समर्थक बनला. प्रौढ वयात आल्यानंतर उपयोगितावादावर होणाऱ्या टीकेला समर्थ उत्तर देण्यासाठी उपयोगितावादावर संशोधन केले. मात्र संशोधन करता करता उपयोगितावादाचे मूळ स्वरूपच बदलून टाकले. मिलने उपयोगितावादाला व्यावहारिक रूप प्राप्त करून दिले. मिलने उपयोगितावादावर संशोधन करतांना व्यक्तिवादावर जास्त भर दिल्यामुळे त्याला अंतिम उपयुक्ततावादी आणि प्रथम व्यक्तिवादी मानले जाते.

४. मिलने केलेले स्वातंत्र्याचे दोन प्रकार कोणते?

उत्तर- मिलने विचार स्वातंत्र्य आणि आचार वा कृती स्वातंत्र्य हे स्वातंत्र्याचे दोन प्रकार केले आहेत.

५. मिलचे स्त्री स्वातंत्र्याबद्दल विचार लिहा.

उत्तर- मिलच्या स्त्री-पुरूष बौद्धिक भेद नाहीत. त्यामुळे त्यांना पुरूषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने संधी व दर्जा मिळाली तर ती पुरूषांच्या बरोबरीने आपली योग्यता सिद्ध करू शकतात. स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारल्यामुळे अर्धी लोकसंख्या राजकीय अधिकारांपासून वंचित करणे ठरेल. खऱ्या लोकशाहीसाठी हा अन्याय दूर झाला पाहिजे. आणि त्यासाठी स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे.

६. मिलचे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाबाबत विचार सांगा.

उत्तर- लोकशाहीतील सामान्य मतदान पद्धतीतील दोष दूर करण्यासाठी मिल प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे समर्थन केलेले आहे. सामान्य मतदान पद्धतीत सत्तारूढ पक्षाला प्राप्त मतांपेक्षा अधिक जागा मिळून त्यांचे बहूमत वाढते व विरोधी पक्षात मते विभागली गेल्यामुळे त्यांना साधे प्रतिनिधित्व मिळते. समाजात अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व मिळत नाही. बहुसंख्याकांची अल्पसंख्याकांवर हुकूमशाही निर्माण होते. हा दोष नष्ट करण्यासाठी मिलने प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा पुरस्कार करतो. या पद्धतीत सर्व लोकांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळते.

७. मिलने लोकशाही शासन पद्धतीत सुचविलेल्या दोन सुधारणा लिहा.

उत्तर- मतदानासाठी संपत्ती व शैक्षणिक पात्रता, बहुल मतदान, स्त्रियांना मतदानाचा अधिकार, प्रमाणशीर प्रतिनिधित्व इत्यादी सुधारणा सुचविलेल्या आहेत.

८. मिलच्या लोकशाहीविषयक विचारांतील दोन दोष लिहा.

उत्तर- खुले मतदान असमर्थनीय, बहुल मतदान गैरवाजवी, प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीही अनेक दोष हे मिलच्या लोकशाहीविषयक विचारात दोष आहेत.

९. मिलने व्यक्तीच्या कार्याचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत.

उत्तर- मिलने स्वसंबंधी किंवा व्यक्तिगत कार्य आणि सामाजिक किंवा परसंबंधी कार्य हे व्यक्तीच्या कार्याचे दोन प्रकार केलेले आहेत.

## प्रकरण ३ रे
## थॉमस हील ग्रीन
(१८३६ ते १८८२)

**जीवन परिचय-** राजशास्त्रात आदर्शवाद हा महत्त्वाचा सिद्धात मानला जाते. आदर्शवादी विचारवंतापैकी ग्रीन हा महत्त्वपूर्ण विचारवंत मानला जातो. त्याने राज्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले असून व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि उपयोगिता याचा राज्याच्या कार्याशी उत्तम समन्वय साधलेला आहे. थॉमस हील ग्रीन जन्म इंग्लंडमधील यार्कशासर परगाण्यातील बिरकीय येथे एका मध्यवर्गीय पादरी कुटुंबात १७ एप्रिल १८३६ ला झाला. त्याचे वडील इव्हेंग्लिकल संप्रदायाचे अनुयायी होती. रग्बी व आक्सफर्ड विश्वविद्यालयात त्यांचे शिक्षण झाला. तेथे बेंजामीन जॉवेट याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्याने आक्सफर्ड विश्वविद्यालयात २४ वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्याने आक्सफर्ड येथे आपले संपूर्ण सक्रिय जीवन व्यतित केले. अध्यापनाशिवास सार्वजनिक व राजकीय कार्यातही सहभागी झाला. तो ऑक्सफर्ड टाऊन कौन्सिलचा सदस्य होता. उदारमतवादी पक्षाचा कार्यकर्ता, अनेक महत्त्वाच्या आयोगाचा सदस्य आणि ऑक्सफर्ड स्कूल बोर्डचा सदस्य म्हणून त्याचे कार्य उल्लखनीय आहे. त्याने मद्यपान निषेध आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. शासनाने मद्यविक्री व निर्मितीवर प्रतिबंध घालण्यावर विशेष भर दिला होता. वयाच्या अवघ्या ४६ व्या वर्षी १८८२ ला त्यांचे निधन झाले. ग्रीन जीवंत असतानाच नव्हे तर त्याच्या मृत्यूनंतर ही त्यांच्या लिखाणाचा प्रभाव इंग्लंडवर नव्हे तर जागतिक पातळीवरही पडलेला दिसतो. Lectures on the Priciples of Political Obligation, Prolegomena to Ethics, Lecturers on Liberal Ligislation and Free of Contract, Lectures on the English Revolution हे ग्रंथ लिहीले. त्यांच्या विचारांवर प्लेटो, ॲरिस्टॉटल व जर्मन आदर्शवादी, रूसोची सामूहिक ईहा आणि ऑक्सफर्ड विश्वविद्यालयातील प्राध्यापक बेंजामीन जॉवेट, मिल, आस्टिन व बर्क इ.विचारवंताचा प्रभाव दिसून येतो.

**प्र.१ ला.राज्यासंबंधीचे ग्रीनचे विचार स्पष्ट करा?**

ग्रीनने Lectures on the Priciples of Political Obligation ग्रंथात मानवी जागृतीच्या सिद्धांतातून राज्याच्या स्वरूपाविषयी आपली मते मांडली. राज्य हे मानवाच्या सामान्य इच्छेचा परिणाम मानतो. व्यक्ती विकासासाठी राज्य आवश्यक आहे. राज्याअभावी व्यक्ती श्रेष्ठ जीवन व नैतिकता प्राप्त करू शकत नाही. ग्रीनने सामाजिक कराराला नाकारून राज्य नैसर्गिक विकासातून अस्तित्वात आले आणि नैतिकता हे राज्याचे अंतिम ध्येय असते. ग्रीनच्या शब्दात "मानवी जागृती स्वातंत्र्याची मागणी करते स्वातंत्र्यासाठी अधिकार आवश्यक असतात आणि अधिकार संरक्षणासाठी राज्याची आवश्यकता असते." व्यक्तिविकासासाठी राज्य आवश्यक आहे. नैतिक जीवनाला आवश्यक परिस्थिती निर्माण करण्यासाठी राज्याची आवश्यकता असते. ग्रीनच्या मते मनुष्याच्या मनात दोन प्रकारच्या इच्छा असतात.

**१) भावनात्मक इच्छा-** व्यक्तिगत हितावर आधारित स्वार्थी इच्छेला तो भावनात्मक इच्छा असते.

**२) सदिच्छा-** समाजहिताशी समन्वय साधणारी व समाजकल्याणाचा विचार करणारी सदिच्छा होय.

ग्रीनची सदिच्छा ही मानवाला निश्चित कार्य करण्यास प्रेरणा देते. त्या प्रेरणांना तो नैतिक आदेश मानतो. नैतिक आदेशानुसार कार्य करणाऱ्या व्यक्तीस नैतिक व्यक्ती मानतो. नैतिक व्यक्तीचे कार्य समाजहिताशी निगडित सर्वांची उन्नती व सुरक्षितता या स्वरूपाचे असते. नैतिक व्यक्तीच्या सदिच्छेमधील समाजहितैषी सामान्य इच्छा ही राज्याचे मूळ प्रेरणास्थान असते. समाजातील काही व्यक्ती नैतिक आदेशाविरूद्ध काम करतात. अशा स्वार्थप्रेरीत समाजविरोधी कार्य करणाऱ्या व्यक्तीला या कार्यापासून रोखण्याकरीता कायदे निर्माण करण्याची आवश्यकता असते. ते काम सदिच्छेवर आधारित राज्य करते म्हणून राज्याच्या उत्पत्तीचे मौलिक तत्व सदिच्छा होय.

**राज्याचा आधार -** ग्रीनच्या मते राज्य हे करारातून निर्माण झाले नसून मानवी सदिच्छेतून निर्माण झालेले आहे. राज्य एक नैतिक व स्वाभाविक सामुदायिक समुदाय आहे. राज्य नैतिक विकासाचे साधन असून अधिकार संरक्षणासाठी अस्तित्वात आले. शक्ती व दैवी सिद्धांत त्याने नाकारला. राज्याच्या संरक्षणासाठी शक्तीची गरज असते परंतु शक्ती हा

राज्याचा आधार नसून संमती वा जनइच्छा हा राज्याचा आधार आहे.ग्रीनच्या शब्दात Will, not force is the basic of the state असे सांगतो.

१. **राज्य मानवी सदिच्छेतून निर्माण-** व्यक्तीच्या अधिकार रक्षणासाठी राज्य अस्तित्वात आले. आपल्या अधिकारांचे रक्षण व्हावे त्याच बरोबर दुसऱ्याच्या अधिकाराचे संरक्षण झाले पाहिजे. ज्याच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे अधिकारात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांना थांबविण्यासाठी सर्वांच्या मनात सदिच्छा निर्माण झाली पाहिजे. या सामान्य इच्छेनुसार राज्य निर्माण होत असते. ही सदिच्छा चिंरतन जागृत असते. त्यात सामाजिकता असते. सदिच्छेमुळे व्यक्ती आपल्या भावना नियंत्रित करून आपले नैतिक कार्य करतात. त्यास ग्रीन मानवी जागृती म्हणतो. राज्य हे नैतिक व अध्यात्मिकतेचा परिणाम असते. जनसंमती हा राज्याचा आधार असून जनकल्याण हे त्याचे कार्य ठरते.

२. **शक्ती हा राज्याचा गुण-** राज्याला अधिकार संरक्षणासाठी शक्तीचा वापर करावा लागतो. मानवामध्ये सदिच्छेप्रमाणे वास्तविक इच्छा असते. ती अविवेकी व स्वार्थप्रेरीत असते. त्यामुळे सदिच्छेत अडथळे निर्माण होतात. नैतिक विकासाला बाधक ठरणाऱ्यावर राज्याच्या शक्तीचा वापर करावा लागतो. उदा. चोरी करणारा दोषी असतो व त्या दोषी व्यक्तीला शिक्षा व्हावी ही समाजाची इच्छा असते. त्याचे माध्यम पोलिस व न्यायालय आहे. म्हणून शक्ती हा राज्याचा गुण असतो पाया नव्हे.

३. **कायदापालन ही जनइच्छा-** ग्रीनच्या मते लोक कायदा पालन का करतात? याचे कारण जनतेची तशी इच्छा असते. कायदयाचे पालन केल्याने स्वतःचे व समाजाचे हित साध्य होणारे असते. कायदा भंगामुळे शिक्षा होईल या भीतीने कायदा पालन होत नाही तर जनता स्वइच्छेने कायदे पालन करते. उदा. रस्त्याच्या डाव्या बाजूने चालण्यात आपल्या जीविताचे संरक्षण असते म्हणून कायदे पालन होत असते.

४. **सार्वभौमत्वाचा आधार जनसंमती असतो-** रूसोप्रमाणेच ग्रीन सार्वभौमत्व सामान्य इच्छेत असते हे मानतो. समाजातील नैतिक अशी सामूदायिक चेतना अधिकाराची मागणी करते व त्या अधिकार संरक्षणासाठी सर्व शक्तीमान राज्याची निर्मिती होते. काही प्रसंगी राज्याला शक्तीचा वापर करावा लागतो. परंतु त्यात जनहित असते. म्हणून निरंकुश शासक देखील जनविरोधी आज्ञा देवू शकत नाही. ग्रीनच्या मते राजा व संसद यापेक्षा एक अदृश्य वस्तू असते जी सार्वभौम असते ती म्हणजे सामान्य इच्छा. म्हणजेच जनमान्यता हा सार्वभौमत्वाचा आधार असतो.

५. **राज्याचे अस्तित्व जन समर्थनावर-** आदर्श व वास्तविक या दोन्ही बाजूकडे जो लक्ष देतो. काही राज्य जनइच्छा डावलून शक्तीच्या आधारावर चालविण्याचा प्रयत्न करतात. या राज्यांना तो भ्रष्ट व अनैतिक मानतो. जी राज्य जनइच्छेकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या समाप्तीचा काळ जवळ आलेला असतो. जनता क्रांतीद्वारे अशा राज्यात परिवर्तन घडवून आणतात. म्हणून जनसमर्थन हाच राज्याचा आधार असतो.

६. **नैतिक आशय-** हेगेलच्या प्रभावामुळे ग्रीन राज्याला व्यक्तीच्या आत्माचे प्रकटीकरण मानतो. तो राज्याला साधन मानून व्यक्तींचा नैतिक विकास साध्य मानतो. राज्य तो नैतिक समुदाय मानतो.समुदायातच व्यक्ती विकास असल्याची त्याला जाणीव असते. म्हणून व्यक्ती अधिकारांची मागणी करतो.

**ग्रीनच्या राज्यविषयक विचारावरील टीका किंवा परिक्षण-**

**१.** ग्रीन हा आदर्शवादी विचारवंत असल्यामुळे त्याचे विचार समजण्यास कठिण वाटतात. चेतना व आत्मजागृती सारखे शब्द स्पष्ट होत नाही. तसेच विचारात कल्पकता हीच अधिक जाणवते.

**२.** ग्रीन सामान्य इच्छेला महत्त्व देतो पण परमेश्वर महान पुरूषातील वाईट कृत्यांमधून चांगले निवडतो असे सांगून सामान्य इच्छेचे महत्त्व कमी करतो ही विसंगती निर्माण झाली आहे.

**३.** ग्रीन शक्तीवर चालणारे व वाईट प्रवृत्तीच्या राज्यालाही जनतेचा पाठिंबा असतो. म्हणून ते टिकते असे म्हणतो. याचा अर्थ राज्य भीतीच्या आधारावर टिकते व भीतीमुळे लोक विरोध करीत नाहीत. ही बाजू पुढे येते. ग्रीन याकडे दुर्लक्ष करतो.

**४.** हॉबहाऊस सामान्य इच्छेबाबत असे मत व्यक्त करतो की इच्छा सामान्य असत नाही व सामान्य झाली तर इच्छा राहत नाही. ग्रीनने सार्वभौमत्वच्या व्यवहारिक बाजूकडे दुर्लक्ष केलेले आहे.

**प्र.२ रा. राज्याच्या कार्याबाबत ग्रीनचे विचार स्पष्ट करा?**

आदर्शवादी ग्रीन आदर्श राज्याची कल्पना विशद करतो. व्यक्तीच्या नैतिक विकासाला सहाय्य करणे हा राज्याचा उद्देश आहे. तेव्हा राज्याने या उद्देशपूर्तीला पूरक कार्य केले पाहिजे. राज्य व्यक्तीला नैतिक बनवू शकत नाही पण नैतिक विकासाला आवश्यक साध्य परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य करू शकते. म्हणून राज्याचे प्रमुख कार्य चांगले जीवन जगण्याच्या मार्गानी अडचणी दूर करणे होय. राज्य व्यक्तीवर सक्ती करून कार्य करण्यास भाग पाडू शकत नाही. व्यक्तीने आपले नैतिक कार्य व सामाजिक कार्य स्वयंम प्रेरणेने पूर्ण केले पाहिजे, भीतीने नव्हे. व्यक्तीची समाजहिताची इच्छा हा कार्याचा आधार असला पाहिजे. ग्रीन राज्याचे कार्य अडचणी दूर करण्यापुरते नकारात्मक स्वरूपाचे न मानता राज्याकडे अनेक सकारात्मक कार्य सोपवितो. बार्करच्या मते, ग्रीनला नकारात्मक कार्याचे स्वरूप सकारात्मक वाटते. राज्याला नैतिक विकासाची परिस्थिती टिकविण्यासाठी हस्तक्षेप करावा लागतो आणि स्वातंत्र्य संरक्षणासाठी आवश्यक तेवढया शक्तीचा वापर करावा लागतो. यातून त्यांची राज्याच्या कार्याबद्दल सकारात्मक भूतका दिसून येते. व्यक्तीमधील आंतरिक प्रेरणा विकासाचा मार्ग दाखवितात परंतु त्या विकास येणाऱ्या अडचणी व्यक्ती दूर करू शकत नाही. त्या दूर करून व्यक्तीच्या नैतिक विकासाचा मार्ग निर्माण करणे राज्याचे कार्य आहे. ग्रीन राज्याच्या कार्याचे विभाजन पुढिल प्रमाणे करतो.

**१) सकारात्मक कार्य-** राज्याद्वारे पार पाडल्या जाणाऱ्या प्रमुख कार्यात सकारात्मक कार्यात समावेश करतो. ज्या कार्यातून व्यक्तीचा नैतिक व भौतिक विकास साध्य होऊ शकेल. व्यक्तीला आंतरिक किंवा नैतिक सहाय्यता प्रधान करण्याचे कर्तव्य राज्याने नाही. मात्र व्यक्तीस जास्तीत जास्त सामाजिक किंवा नैतिकता निर्माण करण्यासाठी आवश्यक कार्य मात्र राज्यास पार पाडावे लागते. सामाजिक प्रगतीच्या मार्गात बाधक ठरणाऱ्या व्यक्तीला दंड करण्याचा अधिकार राज्याला आहे. राज्य नैतिकता निर्माण करू शकत नाही. नैतिकता व्यक्तीच्या अंतकरणाशी संबंधित असते. मात्र नैतिकतेला अनुकूल वातावरण निर्माण करू शकते. ग्रीन राज्याची पुढील सकारात्मक कार्य सांगतो.

**अ)** राज्याने भूमी व्यवस्थेचे कार्य आपल्या हाती ठेवले पाहिजे. भूमी मर्यादित असते. सर्वानाच भूमी संपादनाचे स्वातंत्र्य देणे योग्य नसते.

**ब)** व्यक्तीचा नैतिक विकास व्हावा म्हणून राज्याने उच्च शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. अज्ञान व असंस्कृती नष्ट करणे राज्याचे कर्तव्य आहे.

**क)** राज्याने व्यक्तीगत संपत्तीचे रक्षण केले पाहिजे. कारण खाजगी मालमत्ता नैतिक विकासासाठी आवश्यक असते.

**ड)** मद्यपानस विरोध केला पाहिजे. कारण मादकता सामान्य इच्छेविरूद्ध आहे.

**२) नकारात्मक कार्य-** ग्रीनच्या मते, राज्याचे कार्य खऱ्या अर्थाने नकारात्मक स्वरूपाचे असते. व्यक्तीला श्रेष्ठ जीवन प्राप्त करण्यात जे अडथळे येतात. त्यांना दूर करण्याचे कार्य राज्याला पार पाडावे लागते. राज्याने अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, ज्यात नैतिकता विकास होऊ शकेल. व्यक्तीच्या बाह्य आचार विचारांवर शिक्षा किंवा दंड देऊन प्रतिबंध लादणे. सामान्य इच्छेच्या विरोधात होईल. म्हणून व्यक्तीच्या विकासातील अडथळे दूर करण्यापुरताच राज्याला हस्तक्षेप मर्यादित असला पाहिजे.

**३) सुधारात्मक कार्य-** ग्रीन राज्याच्या वरील कार्या व्यतिरिक्त काही सुधारणात्मक कार्य करण्यास सांगतो. त्यात सार्वजनिक शिक्षण, कारखान्याची निर्मिती, खादय प्रदार्थ भेसळ प्रतिबंध, आंतरराष्ट्रीय शांततेसाठी प्रयत्न, युद्धास विरोध करणे इ. कार्य राज्याने आवश्यक पार पाडली पाहिजेत.

**मानवाच्या विकास कार्यात बाधा आणणारे अडथळे-** ग्रीने मानवाच्या कार्यात बाधा असणारे अडथळे पुढील प्रमाणे सांगितलेली आहेत.

१. **असाक्षरता-** असाक्षरता हा ज्ञानार्जनातील एक मोठा अडथळा आहे. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी राज्याने विद्यालये स्थापन करून प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. शिक्षणामुळे व्यक्तीतील सुप्त गुणांचा विकास होतो. सद्‌गुण व संयमी नागरीक शिक्षणाने घडविता येतो. शिक्षण व्यक्तिविकास आणि समाजविकासाला पूरक असल्याने आपल्या मुलांला अज्ञानी ठेवण्याचा अधिकार पित्याला नसतो.

२. **दारिद्रय -** ग्रीन दारिद्रयाचे कारण दुर्षीत भूमी व्यवस्था मानतो. जमीनदारीचे उच्चाटन केल्याशिवाय दारिद्रय निर्मूलन होणार नाही. वैयक्तिक संपत्तीच्या तो विरोधी नाही. जमीनदारीला विरोध करतो. भांडवलदारावर बंधने घालण्यास व संपत्तीचा दुरूपयोग टाळण्यास तो राज्याला अधिकार देतो. मर्यादित आर्थिक समानता मान्य करतो.

३. **नशाबंदी-** व्यक्ती अज्ञान व सवयीमुळे मद्यपान करते आणि अनैतिकता व दारिद्रयास आमंत्रण देतो. ग्रीन राज्याद्वारे मद्यपान विक्रीचा विरोध करतो. कौटुंबिक, सामाजिक व व्यक्तीच्या नैतिक विकासासाठी कायदयाने नशाबंदीची मागणी करतो.

४. **कामगार सुधार-** कारखान्यात काम करणाऱ्या श्रमिकांना विशेषता स्त्रिया व मुले यांची दुर्दशा, वेतन व शारीरिक कुवत या करीता राज्याने हस्तक्षेप करून सुधारणा केल्या पाहिजेत. कामगार संरक्षणाचे कायदे ग्रीनला आवश्यक वाटतात.

५. **जीवनस्वास्थ्य-** जीवनस्वास्थ्य निरोगी व निकोप राखण्यासाठी उपयुक्त परिस्थिती उपलब्ध करून देणे आवश्यक असते. स्वच्छता व आजारांपासून संरक्षणाचे प्रतिबंधक उपाय केले पाहिजे. गलिच्छ वस्ती सुधार, घरबांधणी, स्वच्छ पाणी व संसर्गजन्य रोग प्रतिबंध योजना राज्याने राबवाव्यात. शरीर स्वास्थ्य उत्तम असेल तर विकास गतिमान करतो येईल.

६. **अपराधी भावना-** भावना व्यक्ती विकासामध्ये थोडी थोडी तरी बाधा बनते. तो पर्यंत मनुष्य भावनेचा दास असतो. तो पर्यंत आपल्या आंतरिक प्रेरणेप्रमाणे विकास होऊ शकत नाही. म्हणून व्यक्तीतील अपराधी भावना दाबून टाकणे हे राज्याचे कार्य आहे. त्यासाठी अपराध्याला दंड देण्यात यावा.

याशिवाय अंतर्गत धोका व बाहय आक्रमणापासून संरक्षण करणे आवश्यक असते. अंतर्गत कायदा व सुव्यवस्थेसाठी व्यक्तीत नैतिकता जागृती करावी. त्या दृष्टीने व्यक्ती विकासातील अडथळे दूर सारून विकासाची संधी देणे हे राज्याचे महत्त्वाचे कार्य आहे. ग्रीनने राज्याला कार्य सिद्धांत मांडताना संरक्षक राज्याचे समर्थन केले नाही तर व्यक्ती विकासाला साध्य मानून राज्याला साधन ठरविले. समाजहित समोर ठेवून व्यक्तीच्या कार्यावर उचित निर्बंध मान्य केले म्हणून तो कल्याणकारी राज्याचा समर्थक ठरतो.

**राज्यावरील मर्यादा-** ग्रीनने सांगितलेले राज्य सर्वसत्ताधारी किंवा निरंकुश स्वरूपाचे नाही. राज्यावर अंतर्गत आणि बाह्यगत मर्यादा टाकतो. व्यक्तीच्या बाह्य वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार कायद्यास आहे. परंतु बाह्य इच्छेवर कायद्यास नियंत्रण ठेवता येत नाही. म्हणून व्यक्तीचे चांगले जीवन निर्माण करण्याचे कार्य राज्याने पार पाडावे. तो राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला देतो. राज्याने सामाजिक संबंधात सुसंवादित्य निर्माण केले तर व्यक्तीला राज्याविरूद्ध वर्तन करण्याचा अधिकार असू शकत नाही. मात्र सामाजिक संबंधात बिघाड झाला तर व्यक्तीला हा अधिकार वापरता येतो. व्यक्तीने राज्यास विरोध करण्यापूर्वी त्याने काही अटी टाकलेल्या आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय कायद्याचे बंधन प्रत्येक राज्यावर असते. ग्रीन आंतरराष्ट्रीय भातृभावाची कल्पना मान्य करून राज्याच्या सत्तेवर एक प्रकारे मर्यादा टाकतो.

**टिप- ग्रीनचे स्वातंत्र्या संबंधी विचार-**

ग्रीनने आपल्या विचाराची सुरूवात स्वातंत्र्यापासून केली आहे. कान्ट प्रमाणे 'स्वातंत्र्य म्हणजे करण्यायोग्यव उपभोगण्यायोग्य इच्छित कार्य करण्याची सहज प्रेरणा ' ही व्याख्या करतो. मानवी जागृती आवश्यक अट स्वातंत्र्य सांगतो. स्वातंत्र्य म्हणजे मानवाला दिलेली देणगी होय. व्यक्ती विकासासाठी आवश्यक आहे. पण स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव हा नकारात्मक अर्थ ग्रीनला मान्य नाही. स्वातंत्र्य म्हणजे इच्छीत कार्य करण्याची सहज प्रेरणा होय. या कार्यापासून विकास झाला पाहिजे व आनंद मिळाला पाहिजे ही सकारात्मक भूमिका मांडतो. स्वातंत्र्य म्हणजे अशा प्रकारचे कार्य किंवा आनंद प्राप्त करण्याची भावनात्मक शक्ती आहे की, जी आनंद घेण्यायोग्य आहे. ग्रीन अशाप्रकारे निषेधात्मक स्वातंत्र्याऐवजी भावनात्मक स्वातंत्र्याची कल्पना मांडतो. मनुष्यास आपला नैतिक विकास करण्यायोग्य परिस्थिती समाजात असली पाहिजे. तो स्वातंत्र्याला शाश्वत चैतन्य म्हणजे मानवाच्या आत्माचा आवश्यक गुण मानतो. तो स्वातंत्र्याचे दोन प्रकार पाडतो.

**१) आंतरिक स्वातंत्र्यता-** आपल्या विकृत मनोवृत्तीला नियंत्रण करून आदर्श नियंत्रण आदर्श इच्छेनुसार कार्य करण्यातच खरे स्वातंत्र असते. पंचद्रियांना ताब्यात ठेवल्याने व्यक्ती नैतिक वर्तनास योग्य ठरते. तो अपप्रवृत्तीच्या आधीन झाल्यास इंद्रियांचा गुलाम बनतो. म्हणून आंतरीक स्वनियंत्रणात निहीत असते.

**२) बाह्य स्वातंत्रता-** बाह्य स्वातंत्र्याचा संबंध विकासाला आवश्यक परिस्थितीच्या निर्मितीसाठी आहे. नैतिक विकासाच्या कार्यात बाधक ठरणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण घालण्याशी संबंधी आहे. ही परिस्थितीकरीता राज्याची आवश्यकता असते. ग्रीन राजकीय जीवनाशी तीन तत्वे सांगतो.

१) मानवी आत्म्याचा स्वातंत्र्य हा स्वाभाविक गुण आहे.

२) स्वातंत्र्याच्या विकासासाठी अधिकार आवश्यक असतात.

३) अधिकार संरक्षणासाठी राज्याची गरज असते.

**ग्रीन स्वातंत्र्याची दोन लक्षण वा वैशिष्टये-**

**अ) निश्चित प्रकारची कार्य-** सामाजिक व नैतिक दृष्टीने योग्य व उपयुक्त कार्य करण्याचे स्वातंत्र्य आनंददायी असते. स्वतंत्र अर्थात दुसऱ्याच्या बंधनातून अनुशासन अथवा नियंत्रणातून मुक्त होय. स्वतंत्र म्हणजे इच्छेनुसार कृती करणे होय. स्वातंत्र्य पण ही इच्छा सदिच्छा असली पाहिजे. मद्यपान, जुगार इ. इच्छा कृत्य नैतिक व धार्मिक दृष्टया निंदनीय आहेत. ग्रीन स्वातंत्र्याला स्वैराचार न मानता नैतिक व सामाजिक उन्नतीला पूरक असणारे कार्य करण्याला स्वातंत्र्य मानतो. वाईट कार्य माणसाला न करू देण्यातच खरी स्वतंत्रता आहे.

**ब) सकारात्मक अथवा भावनात्मक कार्य-** उपयुक्ततावादी विचारवंत राज्याच्या कायदयांना स्वातंत्र्यविरोधी मानत असत. ग्रीनने त्याऐवजी  सकारात्मक विचार मांडला. व्यक्तीच्या योग्यता व विकासासाठी राज्याच्या नियंत्रणासाठी त्याने आवश्यक मानले. उदा. शिक्षण व्यवस्था राज्याचे कायदे स्वातंत्र्यहनन करीत नाहीत तर त्यांचे संरक्षण करीत असतात. स्वातंत्र्यात समाज, व्यक्ती व राज्य तिघांचे हित व उन्नती सामावलेली असते.

**टिप- अधिकारासंबंधी ग्रीनचे विचार-**

अधिकार स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी आवश्यक असणारी अट होय. लॉक प्रमाणे ग्रीन अधिकाराला नैसर्गिक मानत नाही. समाजाकडून व्यक्तींना समाजाच्या हिताच्या दृष्टीने करावयाच्या कार्याची मान्यता मिळते व समाज त्याचे संरक्षण करण्याची व्यवस्था करतो. व्यक्तीच्या विकासाकरीता काही सोयी व सवलती आवश्यक असतात. अधिकार व्यक्तिगत मागणीच्या स्वरूपात पुढे येत असतात. ते समाजहिताशी संसुगत असले पाहिजे. समाजाचा सदस्य असणाऱ्यांला अधिकार ते मिळतात. सर्व व्यक्तींना त्यापासून समानहिताची प्राप्ती आवश्यक असते. व्यक्तीने आपल्या आंतरीक व नैतिक विकासाची मागणी केल्यानंतर त्या मागणीला समाजाने मान्यता दिली की त्याला अधिकार असे म्हटले जाते. अधिकारात व्यक्ती व समाज हित यांचा समन्वय साधलेला असावा लागतो. अधिकाराचे स्वरूप सामान्य, सर्वमान्य व समाजहितैषी असते. अधिकारांची निर्मिती समाजाकडून मिळालेल्या मान्यतेतून होत असते. ग्रीन अधिकारांचे दोन प्रकार पडतात.

**१) नैसर्गिक अधिकार-** ग्रीनची नैसर्गिक अधिकाराची कल्पना सामाजिक कराराचे प्रर्वतक हॉब्ज, लॉक व रूसोने नैसर्गिक अधिकाराची कल्पना मांडली. अधिकार जन्मतः व्यक्तींला मिळालेले आहेत. परंतु ग्रीनने या मताला विरोध करून व्यक्ती जोपर्यंत समाजाचा एक घटक म्हणून वावरत नाही तोपर्यत अधिकारांना काहीच अर्थ नसतो. अधिकार समाजातच निर्माण होतात व राज्याद्वारे त्यांचे संरक्षण केले जाते. ग्रीनच्या मते नैसर्गिक अधिकार अशा अधिकाराला म्हणतात की, ज्यांना समाजाची मान्यता असते. परंतु राज्याच्या कायद्याची कायदेशीर मान्यता नसते. त्याला नैसर्गिक अधिकार म्हणतो. ते नैतिकता व आत्मिक विकासाशी संबंधित असतात.

**२) वैधानिक अधिकार-** अधिकारांना समाजमान्यता असणे ग्रीन आवश्यक मानतो. समाजाने मान्य केलेल्या नैतिक अधिकारांना राज्यांनी कायदेशीर मान्यता दिली कि त्यांनाच वैधानिक दर्जा मिळतो. वैधानिक अधिकारांचे संरक्षण दंडशक्तीच्या आधारावर राज्य करू शकते.

ग्रीनने नैसर्गिक व वैधानिक अधिकाराला समाजाची मान्यता आवश्यक असते. परंतु तो अधिकारात फरक करतो. केवळ समाजमान्यता असणाऱ्या अधिकारांना नैसगिक व समाज व राज्यमान्यता असलेल्या अधिकारांना वैधानिक अधिकार म्हणतो. अधिकाराचे वैयक्तिक व सामाजिक स्वरूप असते. आदर्श राज्यात व्यक्तिगत व सामाजिक असा फरक नसतो. समाजहितात व्यक्तीहित सामावलेले असते. म्हणून प्रत्येक अधिकारात दोनही बाजू सामावलेल्या असतात. उदा.जीविताचा अधिकार वैयक्तिक तसाच प्रत्येकाचा मिळून समाजाचा अधिकार ठरतो. राज्य त्याचे संरक्षण करते. मानवी इच्छेतून स्वातंत्र्य, स्वातंत्र्य रक्षणासाठी अधिकार आणि अधिकार संरक्षणाकरीता राज्याची निर्मिती झालेली आहे. म्हणून राज्याचे अधिकाराचे संरक्षण केलेच पाहिजे. तो अधिकार, नैतिकता आणि कायदा यात फरक करतो.

ग्रीनच्या अधिकार विषयक कल्पनेत अनेक उणिवा आहेत. अधिकाराशी राज्याच्या कायदेशीर मान्यतेचा संबंध त्याने जोडला आहे. ज्याचे संरक्षण करता येत नाही त्याला अधिकार म्हणजे उचित मानत नाही तसेच अधिकारात नैतिक बाजूवर जास्त भर देतो. म्हणून लँकेस्टर ग्रीनच्या अधिकार कल्पनेस अस्पष्ट, भ्रम निर्माण करणारी बाजू मानतो तर जोन्सच्या मते त्यांच्या अधिकार संकल्पनेतील संदिग्धता बघता तो जुना सिद्धांत नाकारण्याच्या प्रयत्नात पुन्हा त्यांचा स्वीकार करतो. ग्रीनच्या अधिकारविषयक विचारवर वरील प्रकारच्या टीका केल्या जातात.

**टिप- ग्रीनचा राज्याला विरोध करण्याचा अधिकार-**

राज्य ही नैतिक संस्था असून राज्याचा आधार सदिच्छा आहे. सदिच्छा मानवी जागृतीचा परिणाम असून राज्य सार्वभौम असून व्यक्ती विकासाचे साधन आहे. राज्यात व्यक्तीला आदर्श जीवनाची प्राप्ती होऊ शकेल. त्यामुळे राज्याच्या आज्ञाचे पालन करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असते. परंतु राज्य आपल्या उद्देशापासून विचलित होत असेल वा सामाजिक हिताची पूर्तता करण्यात अडचणी निर्माण होत असतील तर राज्याच्या कायदयाला विरोध करण्याचा नैतिक अधिकार व्यक्तींला दिला आहे. पण हा अधिकार काळजीपूर्वक वापरावा यासाठी अनेक अटी लादल्या आहेत. कारण वैयक्तिक हित लक्षात घेऊन राज्याला विरोध होऊ नये. समाजहितासाठी राज्याला विरोध करण्याचा अधिकार देतो. समाजात अराजक निर्माण होईल असा अधिकार वापरता येणार नाही.

राज्यात व्यक्तीला नैतिक व आदर्श जीवन प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करत असते. त्याबाबत सार्वभौमत्व मान्य केलेच पाहिजे. राज्याने कर्तव्य म्हणजे अधिकार संरक्षण व आदर्श जीवनाच्या मार्गातील अडथळे दूर करणे हे काम असते पण स्वार्थी व दुराचारी व्यक्तीकडे राज्याची सत्ता गेल्यास ते जनइच्छेचा अनादर करून सामान्य इच्छेविरोधी कायदे करू शकतील. त्या अनैतिक व समाजहित विरोधी कायदे पाळण्याचे व्यक्तीवर बंधन नसून अन्यायी कायदा विरोधात आवाज उठविणे हा जनतेचा अधिकार असतो. नागरिकांच्या विकासाची आवश्यक परिस्थिती निर्माण करणे या नैतिक उद्देशाने राज्य अस्तित्वात आले. तो उद्देश राज्याकडून सफल होत नसेल तर नागरिकाकडून आज्ञापालनाची अपेक्षा करू शकत नाही. या परिस्थितीत राज्याविरोधी व कायदयाला विरोध करण्याचा व्यक्तीचा अधिकार रास्त ठरतो.ग्रीन विशिष्ट परिस्थितीत राज्याला विरोध करण्याचा अधिकार देतो.

**१)** स्वार्थासाठी राज्याला विरोध नसावा त्यात जनकल्याण अपेक्षित असावे.

**२)** विरोध केल्यामुळे अराजक निर्माण होणार नाही यांची काळजी घ्यावी.

**३)** कायदयात किंवा शासनाच्या धोरणात संवैधानिक मार्गाने बदल करणे शक्य आहे का? यांची शहानिशा करावी.

**४)** क्रांतिकारी मार्गामुळे बदल घडविणे शक्यता असल्याची खात्री असावी.

**५)** समाजहितैषी बदल घडवून पूर्वीपेक्षा चांगले व्यवस्थापन निर्माण करणे शक्य असल्यास अधिकाराचा वापर करावा.

**६)** समाजाचा लाभ व हानीचा तुलनात्मक विचार करून लाभाची शाश्वती असेल तर अधिकाराचा वापर करावा.

**७)** सरकार व राज्यकर्ते भ्रष्टाचार व लाचलुचपत व जनहितविरोधी वर्तन करत असतील तसेच बहुसंख्य जनतेचा पाठिंबा असेल तर ग्रीन राज्याला विरोध करण्याचा अधिकार नागरिकांना देतो.

ग्रीन राज्याला विरोध करण्याचा अधिकार देताना एवढी बंधने लादली आहेत की व्यवहारात त्याचा उपयोग करणे शक्य नाही तरी देखील सार्वभौम सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व जनहित आणि व्यक्तीचे अधिकार संरक्षण करण्याच्या व्यापक उद्देशाने मर्यादित प्रमाणात क्रांतीचा व राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला दिला आहे.

**टिप- ग्रीनचे शिक्षेसंबंधी विचार -**

ग्रीन राज्याला व्यक्तिविकासाचे साधन मानले जाते. शिक्षा वा दंड देणे हा राज्याच्या कार्याचा एक भाग आहे. राज्याचे महत्त्वाचे कार्य व्यक्तीच्या अधिकाराचे रक्षण करणे. अपराधीची इच्छा समाज वा राज्यविरोधी असते. प्रत्येक व्यक्तीला अधिकारांचा योग्य उपयोग करून घेता यावा यासाठी दंडव्यवस्था आवश्यक असते. एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या अधिकारावर अतिक्रमण करत असेल तर राज्याला दंडाद्वारे त्या व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करता येतो. ग्रीन राज्याला व्यक्तिविकासाचे साधन मानतो. व्यक्तीच्या नैतिक विकासात येणाऱ्या अडथळयांना दूर करणे हे राज्याचे कार्य आहे. सदिच्छा हा राज्याचा पाया आहे. व्यक्तीत वास्तविक इच्छा देखील असल्यामुळे ती विवेकी व संकुचित स्वार्थामुळे व्यक्तीकडून राज्य व समाजविरोधी कार्य होण्याची शक्यता असते. अशा कार्याला प्रतिबंध करण्यासाठी राज्य कायदे करते. कायदे सामान्य इच्छेचा अविष्कार असल्याने त्याचे पालन प्रत्येकाचे करणे गरजेचे आहे. कायदयाच्या माध्यमातून व्यक्ती, संस्था व समाज यात राज्याला समन्वय ठेवणे शक्य होते. शिक्षेचे स्वरूप काय असावे याबाबत विचारवंतात एकमत दिसून येत नाही. समाजात अराजकता, अनैतिकता आणि अन्याय कार्य करणाऱ्या गुन्हेगारांना गुन्ह्याच्या तीव्रतेच्या स्वरूपात शिक्षा दिली जावी. ग्रीनच्या समकालीन काळात प्रचलित असलेल्या तीन सिद्धांताचा सूक्ष्म विचार करून आपला सिद्धात मांडला.

१. **प्रतिशोध सिद्धांत-** रानटी जमातीत प्रचलित शिक्षा पद्धत होती. अपराध्याने केलेले अपराधाचा बदला घेणे हा प्रतिशोध सिद्धांता उद्देश असतो. या सिद्धांत नुकसानभरपाई किंवा जशास तसे हा नियम वा भावना असते. उदा.गुन्हेगाराने हात मोडल्यास गुन्हेगाराचा हात मोडणे होय. ग्रीन ही पद्धती रानटी व अव्यवहार्य मानतो. शिक्षा देतांना वैरभाव किंवा बदलाची भावना हा उद्देश नसावा. कारण काही वेळेस परिस्थितीमुळे देखील माणसे गुन्हा करतात. म्हणून शिक्षेचा उद्देश गुन्हेगाराला वाईट प्रवृत्तीचे ज्ञान करून देण्याचा असावा.
२. **निवारक सिद्धांत-** या सिद्धांतानुसार गुन्हेगाराला एवढी तीव्र स्वरूपाची शिक्षा दिली पाहिजे की त्या शिक्षेच्या भीतीमुळे सामान्य व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर राहील. हा सिद्धात व्यक्तीच्या मनात अशी भीती निर्माण करतो की ती गुन्ह्यास प्रवृत्त होणार नाही. लहानसहान गुन्हाबद्दल या सिद्धांतानुसार जबर शिक्षा दिली जाते. उदा. चोरी करणाऱ्यांचे हात कलम करणे. हा सिद्धांत चांगला असला तरी त्यात अनेक दोष आहेत. समाजातील लोकांना गुन्हेगाराच्या शिक्षेपासून धडा मिळेल. परंतु अपराधाचे प्रमाण व शिक्षा यांचा संबंध राहत नाही. परिस्थिती व अपराध यांच्या प्रमाणात शिक्षेची तरतूद असावी.
३. **सुधारणावादी सिद्धांत-** अपराध्यात सुधारणा घडवून आणणे हा शिक्षेचा उद्देश असतो. शिक्षेमुळे अपराध्याला आपली चूक कळते व त्यास त्याच्या कृत्याबद्दल पश्चाताप होता. त्यामुळे तो भविष्यात अपराध न करण्याचा निर्णय घेतो. अपराध्यात सुधार क्षमता असल्याने त्याला मृत्यूदंड देणे ग्रीनला योग्य वाटत नाही. व्यक्ती जिवंत राहण्याने समाजस्वाथ्यास फार मोठा धोका निर्माण होता अशी राज्याची खात्री झाली तर मृत्यूदंड शिक्षा समर्थनीय ठरतो.

**ग्रीनचे विचार-** ग्रीनचे प्रचलित तीन दोषपूर्ण असल्याने त्यावर टीका करून आपला वेगळा सिद्धांत मांडतो. शिक्षेचा उद्देश व्यक्तीच्या नैतिक विकासासाठी आवश्यक स्वतंत्र वातावरण निर्माण करण्याचा आणि त्याच्या विकासातील अडचणी दूर करण्याचा असतो. गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे चोरी, हिंसा व अपराध्यामुळे व्यक्तीच्या आंतरीक अधिकार व विकासात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे शिक्षा गुन्हेगारीस आळा बसविण्याचे साधन असते. शिक्षा अपप्रवृत्ती थांबविण्यासाठी राज्याकडून केलेला शक्तीचा प्रयोग असतो. शिक्षेचा उद्देश समाज विरोधी प्रवृत्तीचे उच्चाटन करून चांगल्या जीवनाच्या मार्गातील अडथळे दूर करणे असतो. ग्रीन गुन्ह्याला समाज सुव्यवस्था व व्यक्तीच्या स्वातंत्र्यावरील आक्रमण असून ग्रीनचा शिक्षेचा सिद्धांत गुन्हेगारी प्रवृत्ती अडचणीत आणण्याचा सिद्धांत आहे. व्यक्तीच्या आंतरिक मनात बदल होण त्याला अधिक महत्त्वाचे वाटते. शिक्षा ही गुन्ह्याच्या प्रमाणात न्यायावर आधारित असावी. गुन्हेगारीला अयोग्य मार्गापासून परावृत्त करून योग्य दिशेने वळविणे हा उद्देश असावा. गुन्हेगारात सुधार करण्याचे साधन असते.

ग्रीन शिक्षेसंबंधीच्या सिद्धांत प्रतिशोध, निवारण व सुधार तीन तत्त्वांचा समन्वय झालेला दिसतो. गुन्हेगाराला आपण केलेल्या गुन्ह्यामुळे शिक्षा झाल्याची भावना ही प्रतिशोधात्मक असते तर शिक्षेमुळे समाजात भीती निर्माण होऊन

गुन्ह्यास आळा बसणे हे निवारात्मक आहे तर सुधार तत्व गुन्हेगारात सुधारणा घडवितो. निवारात्मक सिद्धांत जवळचा वाटूनही ग्रीनने सुधारणात्मक भावना ठेवली आहे. सुधारणा ही आंतरीक प्रेरणेतून निर्माण होत असते. राज्य गुन्हेगाराला शिक्षा देऊन त्याच्या नैतिक चैतन्यास जागृत करते आणि सुधारणांचा मार्ग मोकळा करते असे ग्रीन सांगतो.

**टिप- ग्रीनचे युद्ध व आंतरराष्ट्रीय संबंधी विचार-**

ग्रीनने युद्ध व आंतरराष्ट्रीयसंबंधी आदर्शवादी विचार मांडले आहेत. विश्वबंधुत्व व विश्वशांतीचे समर्थन करणाऱ्या विचारवंतात ग्रीनला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रीन युद्धाला निष्ठूर मानतो. युद्ध राज्याच्या अपूर्णतेचे लक्षण आहे. युद्ध आवश्यक नाही. युद्ध अपूर्ण व अविकसित असणाऱ्या राज्याचे साधनमात्र आहे. युद्धाला नैतिक अपराध मानून युद्ध राज्याच्या बिघडलेल्या परिस्थितीचे लक्षण असते. युद्धापेक्षा शांततेच्या काळात विकासाचा वेग अधिक वाढतो. युद्धामुळे वित्तीय व मानवीय हानी होते. म्हणून ग्रीन युद्ध तिरस्करणीय वाटते. ग्रीन युद्धाचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**१) आक्रमक युद्ध-** ग्रीन आक्रमक युद्धाला तो अयोग्य व अनैतिक प्रकार मानतो. हेगेलप्रमाणे युद्ध हे आवश्यक असते हा विचार त्याला मान्य नाही. ग्रीनच्या मते युद्ध स्वार्थीवृत्तीने लढली जातात. मानवी जीवन युद्धामुळे धोक्यात येते. म्हणून युद्धाला ग्रीन विरोध करतो.

**२) संरक्षणात्मक युद्ध-** ग्रीन युद्धाच्या संरक्षणात्मक प्रकाराला मान्यता देतो. युद्धाचा हा प्रकार योग्य व उचित असतो. कारण अनुचित मार्गाने युद्ध लादल्यामुळे त्याला थांबविण्यासाठी संरक्षणसिद्धता आवश्यक असते. युद्ध थांबविण्यासाठी युद्ध व शांतता ही त्याची भूमिका होती. संरक्षणात्मक युद्ध राज्याचे स्वातंत्र्य व व्यक्तीचे हित अबाधित ठेवत असते.

विश्वबंधुत्वाचा तो प्रबळ समर्थक होता. प्रत्येक व्यक्तीला जिवंत राहण्याचा अधिकार आहे. या विचारांवर त्यांची विश्वबंधुत्वाची कल्पना आधारित आहे. एका राज्याचा दुसऱ्या राज्याशी संबंध कसा असावा. याविषयी त्याने विवेचन केले आहे. एका राज्याने दुसऱ्याबरोबर नागरिक जसे एकमेकांशी एकता व सामज्यंसाने वागतात तसे वागावे. समाजात व्यक्तीचे हित असते तसे विश्वबंधुत्वात राज्याचे हित असते. प्रत्येक राज्याची अधिकार व कर्तव्ये निश्चित केलेली असावीत. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय न्यायालय व राज्याकरीता आंतरराष्ट्रीय आचारसंहिता असावी. तो राष्ट्रवादापेक्षा आंतरराष्ट्रवादास जास्त महत्त्व देतो. विश्वशांतची स्वप्ने रेखाटतो. परंतु विश्वराज्य स्वरूप कसे असावे याविषयी विवेचन करीत नाही. त्यामुळे विश्वराज्याचा प्रबळ पण आदर्शवादी समर्थक होता असे म्हणणे योग्य ठरेल.

**टिप- ग्रीनचे संपत्ती किंवा मालमत्ताविषयी विचार -**

ग्रीन संपत्तीचा वैयक्तिक अधिकार मान्य करतो. त्याच प्रमाणे संपत्तीच्या अधिकारावर आवश्यक मर्यादा लादण्याचा अधिकार राज्याला देतो. म्हणून संपत्तीच्या अधिकाराबाबत तो उग्र समाजवादी नाही तसेच तीव्र व्यक्तीवादी देखील नाही. व्यक्तीच्या गुण व विकासाचे साधन म्हणून तो संपत्तीच्या अधिकाराला मान्यता देतो. संपत्ती व्यक्तीच्या जीवित आणि नैतिक विकासाकरीता संपत्ती आवश्यक मानतो. मात्र संपत्तीचा वापर सार्वजनिक हितासाठी केला पाहिजे असे त्याला वाटते. समाजवादी आर्थिक व संपत्तीची विषमता पूर्णपणे नष्ट करण्याचा आग्रह धरतात तर ग्रीन समाजातील विभिन्न गुण आणि गुणवत्तेच्या आधारावर मर्यादित प्रमाणात सांपत्तिक विषमता राहील हे मान्य करतो आणि ही विषमता समाजासाठी लाभदायक असेल असे मानतो. कारण व्यक्तिगत संपत्तीमुळे अनेक कारखाने निर्माण होऊन अनेकांना काम व वेतन मिळेल. संपत्तीमुळे कार्यास वाव व दर्जा वाढविता येतो.

ग्रीन संपत्तीमध्ये जमीनदारी प्रवृत्तीचा विरोधक होता. जमीनदार वर्गाच्या मालकीमुळे वर्गसंघर्ष वाढला असून समाज दारिद्री बनला. म्हणून ग्रीन दारिद्रयाचे कारण दूषित भूमी व्यवस्था मानतो. दारिद्रय निर्मूलनसाठी जमीनदारीचे निर्मूलनावर भर देतो. संपत्तीच्या अधिकाराचे समर्थन करतांना तिच्या दोषाचाही तो विचार करतो. पण संपत्तीच्या अधिकारात दोष आहेत म्हणून तो रद्द करणे योग्य नाही. संपत्तीच्या अधिकारात राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार देतो. संपत्तीची प्राप्ती आणि वितरणाबाबत राज्याने नियम करावेत. संपत्तीचा दुरूपयोग टाळावा. संपत्ती समाजहिताकडे वळवावी. ग्रीन श्रमिक संपत्तीचे समर्थन करतो. जमीन सुधारणा, अनिवार्य मोफत शिक्षण, आरोग्य सोयी, मजूर कल्याण याबाबत राज्याला आवश्यक कायदे करण्याचा अधिकार देता. त्याने श्रमिकांचे भांडवलदाराकडून शोषण होणार नाही

इतपर्यंत आर्थिक विषमता मान्य केली आहे. त्यामुळे त्यांचे संपत्तीविषयक विचार उदारमतवादी ठरतात. संपत्तीच्या विचारात व्यक्तीवाद आणि समाजवादी विचारांत सुसंवाद साधण्याचा त्याने प्रयत्न केलेला आहे.

**आपेक्ष वा टीका-** ग्रीनच्या संपत्तीविषक अधिकारात अनेक मर्यादा आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारावर पुढील टीका केल्या जातात.

१) सांपत्तिक असमानता राज्याच्या विकासासाठी आवश्यक मानतो हे त्याचे मत आज पटण्यासारखे नाही.

२) ग्रीन जमीनदारी पद्धतीला विरोध करतो पण भांडवलशाहीचे समर्थन करतो. या दोन विचारात विसंगती दिसून येते.

३) ग्रीन भांडवलशाहीच्या गुणांचा विचार करतो व त्यांच्या दोषाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे भांडवलशाहीचा समर्थक वाटतो.

४) संपत्तीविषयी समाजवाद व व्यक्तीवादाचे समन्वय करण्याच्या विचारामुळे त्याचे विचार एकांगी बनले आहेत.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

**१.** टी.एच.ग्रीनने लिहीलेल्या दोन ग्रंथाची नावे लिहा.
उत्तर- ग्रीनने Lectures on the Priciples of Political Obligation, Prolegomena to Ethics, Lecturers on Liberal Ligislation and Free of Contract, Lectures on the English Revolution हे ग्रंथ लिहीले.

**२.** ग्रीनच्या राजकीय विचारावर कोणत्या विचारवंताचा प्रभाव आहे.
उत्तर- ग्रीनच्या राजकीय विचारावर प्लेटो, ॲरिस्टॉटल, जर्मन आदर्शवादी, रूसो इत्यादी आदर्शवादी विचारवंताच्या विचाराचा प्रभाव पडतो.

**३.** ग्रीनने मानवी इच्छेचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत.
उत्तर- ग्रीनने मानवी इच्छेचे भावनात्मक इच्छा (Impulsive Will) व सदिच्छा (Good Will) हे दोन प्रकार सांगितलेले आहेत.

**४.** ग्रीनने सांगितलेले राज्याचे दोन आधार स्पष्ट करा.
उत्तर- राज्य मानवी सदिच्छेतून निर्माण, शक्ती हा राज्याचा गुण, कायदापालन ही जनइच्छा, सार्वभौमत्वाचा आधार जनसंमती हे ग्रीनने राज्याचे प्रमुख आधार विशद केलेले आहेत.

**५.** ग्रीनने माणसाच्या विकास कार्यात अडथळे आणणारे कोणते घटक सांगितले आहेत.
उत्तर- असाक्षरता, दारिद्रय, नशाबंदी, जीवनस्वास्थ्य, कामगार सुधार हे अडथळे ग्रीनने सांगितलेले आहेत.

**६.** ग्रीनने सांगितलेले स्वातंत्र्याचे दोन प्रकार कोणते?
उत्तर- ग्रीनने आंतरिक स्वातंत्र्य आणि बाह्य स्वतंत्रता हे दोन प्रकार सांगतो.

**७.** ग्रीनने वर्णन केलेले दोन अधिकार लिहा.
उत्तर- ग्रीनने नैसर्गिक अधिकार व वैधानिक अधिकार हे अधिकाराचे प्रकार वर्णन केलेले दिसतात.

**८.** ग्रीन राज्याला विरोध करण्यासाठी सांगितलेल्या दोन अटी कोणत्या ते सांगा.
उत्तर- ग्रीनने राज्यकर्ते अन्यायकारक कायदे व जनहितविरोधी वर्तन करत असतील व संवैधानिक मार्गाने बदल घडविणे अशक्य असेल तर तो राज्याला विरोध करण्याचा अधिकार जनतेला देतो.

**९.** ग्रीनच्या समकालीन काळात शिक्षा देण्यासंबंधी कोणते सिद्धात अस्तित्वात होते.
उत्तर- प्रतिशोध सिद्धांत, निवारक सिद्धांत आणि सुधार सिद्धांत हे ग्रीनच्या काळी शिक्षा देण्यासंबंधी सिद्धांत अस्तित्वात होते.

**१०.** ग्रीन विशद केलेले युद्धाचे दोन प्रकार लिहा.
उत्तर- आक्रमक युद्ध आणि संरक्षणात्मक युद्ध हे दोन प्रकार विशद करतो.

**११.** ग्रीनने सांगितलेली राज्याची दोन कार्य सांगा.
उत्तर- ग्रीनने राज्याने असाक्षरता, दारिद्रय दूर करणे आणि नशाबंदी करणे हे कार्य केले पाहिजे.

## प्रकरण ८ वे
## हेराल्ड जे. लास्की
(१८९३ ते १९५० )

**जीवन परिचय-** प्रा. लास्कीचा जन्म इंग्लंडमधील मँचेस्टर येथे १८९३ मध्ये श्रीमंत ज्यू घराण्यात झाला. मँचेस्टर येथील ग्रामर स्कूलमध्ये शिक्षण घेतल्यानंतर ऑक्सफर्ड येथ उच्च शिक्षण घेतले. तो सुरवातीपासून तल्लख बुद्धीचा विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. त्याने वयाच्या १८ व्या वर्षी आपल्यापेक्षा जास्त वयाच्या ख्रिश्चन मुलीशी विवाह केला. धार्मिक प्रवृत्तीच्या त्यांच्या वडिलांना आवडले नाही. लास्की जुन्या विचारात न अडकता नवीन विचारांचा सर्व क्षेत्रात पुरस्कार केला. ऑक्सफर्डमध्ये त्याला मेटलँड व अर्नेस्ट बार्कर याच्यासारखे नामवंत शिक्षक लाभले. पहिल्या महायुद्धात वैद्यकीय कारणामुळे सैन्यात भरती न झाल्यामुळे तो वृत्तपत्र व्यवसायाकडे वळला. कॅनडातील मॉंट्रीयल विद्यापीठात एक वर्ष प्राध्यापक म्हणून कार्य केले. हॉवर्ड विद्यापीठात इतिहासाचा प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला. त्याने आपल्या व्याख्यानातून विचार स्वातंत्र्याचे समर्थन केले. १९२२ ते १९५० पर्यंत लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम केले. लास्कीचा प्रत्यक्ष राजकारणात सक्रिय सहभाग होता. इंग्लंडमधील फेबियन सोसायटीचा सभासद, मजूर पक्षाच्या कार्यकारिणीचा सदस्य व पुढे मजूर पक्षाचा अध्यक्ष म्हणून कार्य केले. १९४५ च्या निवडणुकीत जोरदार प्रचार केल्यामुळे मजूर पक्षाला पार्लमेंटमध्ये बहुमत मिळाले. त्याने राजकारणाचे अनुभवाच्या आधारावर लिखाण केलेले असल्यामुळे त्याचे विचार परिस्थितीप्रमाणे बदलत गेलेले दिसतात. त्यांच्या विचारात मानव हा घटक लक्षात घेऊन विचार मांडणी केलेली आहे. मानवी जीवनातील दारिद्रय व अज्ञान दूर करण्यासाठी मानवी मूल्यांना महत्त्व दिले आहे. लास्कीने आपल्या विचाराची सुरूवात अनेक सत्तावादाच्या पुरस्काराने केली. त्यानंतर फेबियन समाजावादी, साम्यवादी व सर्वात शेवटी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला. लास्कीच्या विचारावर अनेक सत्तावादी, कार्ल मार्क्स, रशियातील साम्यवाद व अमेरिका व इंग्लंडमधील लोकशाहीचा प्रभाव पडलेला दिसतो. लास्कीने विविध विषयांवर ३० पेक्षा जास्त ग्रंथ लिहीले. लास्कीने विविध विषयावर विविध स्वरूपाचे ग्रंथ लिहिले. त्याने एकूण ३० पेक्षा जास्त ग्रंथ लिहिलेले आहेत.राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने Studies in the Problem Sovereignty, A Grammar of Politics, Communism, An Introdution to Politics, Socialism and Freedom इ.ग्रंथ लिहीले.

**टिप- प्रा.लास्कीचे राज्य आणि समाज बद्दलचे विचार स्पष्ट करा.**

प्रा. लास्की अनेक सत्तावादी विचारवंत असल्यामुळे त्याचा राज्याच्या एकात्मवादी सत्तेला विरोध होता. राज्याची निर्मिती व्यक्तीच्या राजकीय गरजापूर्तीसाठी असल्यामुळे राज्याची सत्ता मर्यादित असली पाहिजे. समाज अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. व्यक्तीला आपले जीवन समृद्ध करण्यासाठी समाजाची आवश्यकता असते. व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक संस्था आणि संघटना स्थापन करतो. या सर्व संस्था व्यक्तीचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असतात. मानवाने विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, विवाहसंस्था इ स्थापन केल्या आहेत. तसेच व्यापक वा विशिष्ट उद्देश साध्य करण्यासाठी कामगार संघटना, सांस्कृतिक मंडळे निर्माण केली आहेत. अशा रितीने व्यक्तींनी आपल्या अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक संस्था निर्माण केल्या. या विविध संस्था त्याच्या क्षेत्रापुरते मर्यादित विकासाचे कार्य पार पाडत असतात. त्यांच्या क्षेत्रात श्रेष्ठ असतात.

राज्य ही अनेक संस्थापैकी एक संस्था आहे. मानवाने राजकीय गरजाच्या पूर्तीसाठी राज्य संस्था निर्माण केली. ज्याप्रमाणे मानवी आवश्यकेतून इतर संस्था अस्तित्वात आल्या त्याप्रमाणे राज्यसंस्था देखील राजकीय गरजेतून निर्माण झाली. त्यामुळे इतर संस्थाना मानवी जीवनात जे स्थान आहे ते स्थान राज्यसंस्थेला दिले पाहिजे. फारतर समाजातील प्रमुख संस्थेचा दर्जा देण्यास हरकत नाही. कारण इतर संस्थामध्ये समन्वय घडवून आणण्याचे कार्य करावे लागते. राज्य इतर संस्थामध्ये मध्यस्थाचे कार्य करत असल्याने सार्वभौम मानण्याचे कारण नाही. एवढयाच कारणावरून राज्य इतर संस्थापेक्षा वेगळी नाही. राज्य इतर संस्था सारखीच असल्यामुळे राज्याला सार्वभौमचा दर्जा देणे योग्य नाही. कारण प्रत्येक संस्थेचे मानवी जीवनात विशिष्ट स्थान असते. प्रत्येक संस्था मानवी विकासाला सहाय्यक ठरतात. त्यामुळे

राज्यासहित सर्व संस्था समान मानल्या पाहिजेत. राज्य समाजातील इतर संस्थामध्ये प्रमुख संस्था असली तरी ती सार्वभौम वा सर्वश्रेष्ठ संस्था नाही.

अशा प्रकारे प्रा.लास्की राज्याच्या सार्वभौमवादाला विरोध करून अनेक सत्तावादाचे समर्थन केले. हॉब्ज, ब्रोडीन आणि ऑस्टिन यांनी मांडलेल्या सर्वंकष सार्वभौम सिद्धांतात मान्य नाही.

**प्र.१ ला.प्रा लास्कीचे सार्वभौमत्वा संबंधीचे विचार स्पष्ट करा?**

प्रा.लास्की निरंकुश शासनव्यवस्थेला जोरदार विरोध करून सार्वभौमत्वाच्या अनेक सत्तावादाचे समर्थन करतो. जॉन ऑस्टिन सार्वभौमत्वाच्या सिद्धांतची कठोर आलोचना केली. ऑस्टिनने सार्वभौमत्वाची व्याख्या पुढील प्रमाणे केली की, "एखादया निश्चित मानव सर्वश्रेष्ठ तशाच दुसऱ्या मानवी सर्वश्रेष्ठाच्या आज्ञांचे पालन करीत नसेल, परंतु त्या मानवी सर्वश्रेष्ठाच्या आज्ञा त्या समाजातील बहुसंख्याक लोक स्वभावतः पालन करीत असतील तर तो मानवी सर्वश्रेष्ठ त्या समाजात सार्वभौम असतो.आणि तो समाज त्या सर्वश्रेष्ठासह स्वतंत्र राजकीय समाज असतो."

**ऑस्टिनच्या व्याख्येची प्रा. लास्कीने प्रमुख तीन वैशिष्टये सांगितली आहेत.**

**१) राज्य सर्व सत्ताचे उगमस्थान असून सार्वभौमत्व एका निश्चित मानव श्रेष्ठाच्या हातात असते-** या विधानावर लास्कीने आपेक्ष घेतला आहे. त्यांच्या मते सार्वभौमत्व निश्चित ठिकाणी आहे असे सांगता येत नाही. उदा. अमेरिकेचा अध्यक्ष अथवा काँग्रेस या दोहांपैकी सार्वभौमत्व कुठे आहे हे स्पष्ट होत नाही. कारण सत्तासंतुलन व नियंत्रणामुळे सार्वभौमत्व विभाजित झाले असून ते निश्चित ठिकाणी नसते. सार्वभौम सत्ता संघराज्यात निश्चित करणे कठिण असते. संघराज्यात घटनने केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यात सत्तचे विभाजन केलेले असते. कारण आपआपल्या क्षेत्रात दोन्ही सरकारे स्वतंत्र व श्रेष्ठ मानली जातात. एकात्म राज्यातही सार्वभौमत्वाचे ठिकाण निश्चित करणे अवघड असते. त्यासाठी लास्की बेल्जियम राज्यघटनेचे उदाहरण देतो. बेल्जियमच्या घटनेनुसार घटनादुरूस्तीबाबत घेतलेल्या निर्णयाला नव्याने निवडलेल्या विधिमंडळाची मान्यता असावी लागते. जुन्या निर्णयाला नवी संसद मान्यता देण्याची शक्यता नाही. मतदार सार्वभौम जनतेकडे असते पण जनता म्हणजे निश्चित व्यक्ती मानता येत नाही. म्हणून ऑस्टिनचे तत्व अव्यवहार्य व तर्कसंगत वाटत नाही.

**२) सार्वभौमत्व अमर्याद असते-** या तत्वावर लास्कीने ऐतिहासिक उदाहरण देऊन टीका केली. त्याच्यामते कोणत्याही व्यक्तीला इतकी अमर्यादित वा सार्वभौम सत्ता मिळालेली नाही. उदा.तुर्कस्थानचा खलिफा हा सर्वश्रेष्ठ समजला जातो. तरी त्याच्यावर रूढी आणि परंपरेचे बंधन होते. कायदयामध्ये दुरूस्ती तो करू शकत होता पण व्यवहारात त्याला ते शक्य नव्हते. मर्यादाभंग प्रयत्न करणाऱ्या राज्यकर्त्याच्या सार्वभौम सत्तेवर मर्यादा घातल्याची उदाहरणे इतिहासात दिसतात. यावरून सार्वभौमत्वावर मर्यादा असतात हे सिद्ध होते.

**३) सार्वभौम व्यक्तीच्या आज्ञा म्हणजे कायदा-** लास्कीने यावर आपेक्ष घेऊन कायदा आणि आज्ञा एकच गोष्ट नसून दोन अलग अलग बाजू आहेत. कायदा हा राज्यकर्ते व जनता दोघांना लागू पडतो. कायदात आज्ञा देणारे वा पालन करणारे यात कोणताच फरक नसतो. कायदा निर्माते देखील कायदा पालनास बांधील असतात. पण आज्ञांचे तसे नसते. आज्ञा देणाऱ्याला आज्ञाचे पालन करावे लागत नाही. कायदा हा सर्वांना समान पातळीवर लागू होता. प्रत्येक कायदयात आज्ञा असतेच असे नाही. उदा.घटस्फोटच्या कायदयात आज्ञा नसते.

सर हेन्री मेनच्या मते सार्वभौम सत्तेच्या सर्वच आज्ञा कायदा होण्याच्या लायकीच्या नसतात. राजा रणजीत सिंह भारतातील शिखाचा श्रेष्ठ राजा परंतु त्याने धर्म अथवा रूढीच्या विरोधी आज्ञा दिली नाही. राजाच्या आज्ञा म्हणजे कायदा हे समीकरण केल्यास सर्व नागरिक गुलाम बनतील. राज्याला व्यक्ती विकासाचे साधन मानल्यास राज्यास सर्वश्रेष्ठ मानणे अयोग्य ठरते. मानवी विकासाच्या दृष्टीने सार्वभौम सत्ता अमर्याद ठेवणे प्रगतीला बाधक ठरेल. म्हणून ऑस्टिन सिद्धांताचे नैतिक दृष्टीने समर्थन करता येत नाही.

**सत्तेचे सांधिक स्वरूप-** सार्वभौम सत्ता निरनिराळया संस्थात विभागलेली असते. अशी कोणताही सत्ता नाही की जी व्यक्तीवर अमर्याद सत्ता गाजवू शकेल. राज्याचे प्रमुख कार्य निरनिराळया संस्थेत सुसंवाद निर्माण करण्याचे आहे. समाजातील विविध संस्था निरनिराळया गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण झाल्या. उदा. चर्च धामिक संस्था नैतिक विकास

मानव विविध संस्थाचा सभासद असतो. इतर संस्था ज्या पद्धतीने मानवनिर्मित आहेत. त्याप्रमाणे राज्य देखील मानवनिर्मित आहे. त्यामुळे अमर्याद सत्ता गाजविण्याचा अधिकार नाही. राज्याने मर्यादित अधिकाराचा वापर करावा.

लास्कीच्या मते समाजातील कोणत्याही क्षेत्राचे निरीक्षण केल्यास सत्ता सांधिक स्वरूपाची दिसते. उदा.कायदा एका व्यक्तीच्या इच्छेचा परिणाम नसतो. कायदा निर्मिती पूर्वी विचारविनिमय आवश्यक असतो. त्याला समाजमान्यता आवश्यक असतो. तर तो कायदाचे पालन समाज करतो. लोकाच्या इच्छेचे प्रतिबिंब कायदयात नसेल तर तो कायदा नैतिक दृष्टया लोकांवर बंधनकारक नसतो. उदा. व्हर्साय तह जर्मनीची संमती न घेता लादल्यामुळे जर्मनीने तो फेटाळला. राज्यावर लोकमताचे बंधन पडत असते. त्यामुळै राज्याला अनियंत्रित सत्तेचा वापर करता येत नाही असे सांगून मर्यादित सार्वभौमत्वाचा पुरस्कार करतो. त्यासाठी लास्कीने सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर दिला आहे. कारण राज्याच्या अनियंत्रित सत्तेपासून व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण व कार्यक्षम शासन कारभाराची उद्दिष्टये साध्य होतात. राज्याचे आदेश व्यक्तींनी बिनतक्रार पाळण्यास त्याने विरोध केलेला आहे. राज्याला विरोध करण्याचा अधिकार तो व्यक्तीला देतो. राज्य सर्व गरजा पूर्ण करू शकत नसल्याने विविध गरजापूर्तीसाठी विविध संस्था स्थापन झाल्या. त्यामुळे सार्वभौमसत्ता विविध संस्थाच्या कार्याच्या प्रमाणात विभागली गेली पाहिजे. राज्य इतर संस्थात समन्वयाचे काम करत असल्याने इतर संस्थेच्या तुलनेत थोडे जास्त अधिकार असले पाहिजे याचा त्याने पुरस्कार केला आहे. प्रा. लास्की राज्य ही समाजातील एक प्रमुख संस्था मानतो परंतु तिला अनियंत्रित सार्वभौमत्वाचे अधिकार नाकारतो.

**परीक्षण वा दोष किंवा आक्षेप-** प्रा. लास्कीच्या अनेक सत्तावादी सिद्धांतात अनेक दोष दिसतात. ते पुढीलप्रमाणे होत.

१. इतर सामाजिक संस्थाप्रमाणे राज्य ही संस्था राजकीय उद्दिष्टासाठी निर्माण झाली. त्यामुळे राजकीय क्षेत्रापुरते त्याचे कार्य मर्यादित राहावे असे लास्कीला वाटते. परंतु मानवी जीवनाचे अनेक पैलू एवढे गुतांगुतीचे आहेत की, त्यात फरक करणे कठिण जाते. प्रत्येक कार्य अलग असूनही त्याच ऐकमेकांवर प्रभाव पडतो. उदा.राम जन्मभूमीचा प्रश्न सामाजिक, धार्मिक व राजकीयसुद्धा आहे.
२. मानवी जीवनात विविध कार्य करणाऱ्या संस्था आपआपल्या क्षेत्रात सार्वभौम असाव्यात. परंतु त्यामुळे या संस्थामध्ये संघर्ष निर्माण होऊन समाजात अराजकता निर्माण होण्याचा धोका आहे, याकडे लास्की दुर्लक्ष करतो.
३. लास्कीच्या विचारात स्थाईत्वाचा अभाव दिसून येतो. त्याने आपल्या जीवनात कोणत्याही एका विचारावर श्रद्धा ठेऊन स्थिर राहिला नाही. ज्याला जसे जसे अनुभव येत गेले तसे त्याच्या विचारात परिवर्तन होत गेले. अनेक सत्तावादाचे समर्थन करतांना आलेल्या अनुभवामुळे तो राज्याला इतर संस्थावर नियंत्रण करण्याचा अधिकार आहे.
४. राज्यसंस्था इतर संस्थासारखी एक असल्याने लास्कीने मान्य केले आणि इतर संस्थामध्ये समन्वय घडवून आणण्याचे कार्य करावे हा विचार मांडला. इतर संस्थातील संघर्षाची शक्यता अजमावली राज्यसंस्थेला इतर संस्थावर नियंत्रण करण्याचा अधिकार दिला. नियंत्रणाच्या आधारावर राज्यसंस्था इतर संस्थावर आपले नियंत्रण प्रस्थापित करते. म्हणून त्याला त्यावर योग्य उपाय सांगता आला नाही.

आधुनिक काळात सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सत्तेचे केंद्रीकरण या परस्परविरोधी तत्त्वाचा वापर राजकीय संस्था करतांना दिसत आहेत. सत्तेच्या केंद्रीकरणातून राज्याचे व्यक्तीच्या प्रत्येक क्षेत्रावरील नियंत्रण सारखे वाढत आहे. म्हणून लास्कीच्या अनेकसत्तावादी सिद्धांताची व्यवहार्यता दिसून येते. कारण राज्याच्या सार्वभौमत्वावर मर्यादा टाकून व व्यक्तिस्वातंत्र्याचे अबाधित ठेवून त्याने मर्यादित सार्वभौमत्वाचा पुरस्कार केला तो लोकशाही समाजवादी देशासाठी नवा पर्यायी मार्ग बनलेला आहे.

**प्र.२ रा प्रा. लास्कीचे अधिकार व हक्कांसंबंधी विचार स्पष्ट करा?**

व्यक्तीविकासासाठी अधिकार आवश्यक असतात. लास्कीच्या मते राज्याने व्यक्तीला दिलेल्या अधिकारावरून राज्याचे स्वरूप ठरते. अधिकाराची व्याख्या करतो की, "अधिकार म्हणजे समाज जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याच्या शिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्वाचा योग्य तऱ्हेने विकास करू शकत नाही. व्यक्ती विकासावी उचित संधी प्राप्त करून देण्याचा अधिकाराचा उद्देश असतो." सुखी जीवनासाठी अधिकार आवश्यक असतात. वास्तविक राज्य अधिकार निर्माण करीत नाही केवळ त्यांना मान्यता देते. जनकल्याण व व्यक्ति विकासासाठी अधिकार

आवश्यक असतात. अधिकाराशिवाय व्यक्ति विकासाची संकल्पना व्यर्थ आहे. म्हणून अधिकार हे कल्याणकारी राज्याचे लक्षण मानले जाते. तो अधिकाराचे नैसर्गिक किंवा वैधानिक उत्पत्ती मान्य करीत नाही. अधिकाराचे स्वरूप स्थाई नसते. सर्व काळासाठी सर्व अधिकार मान्य करता येत नाही त्यात परिस्थितीनुसार बदल होत असते. अधिकार व कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. आपण अधिकाराचा उपभाग घेत असतांना इतरांच्या मार्गात बाधक बनू नये. आपल्या अधिकारासोबत इतरांच्याही अधिकाराची जाणीव असावी. अधिकार हे सर्वांना सारखेच प्राप्त होत असतात.

**अधिकारांचे स्वरूप-** लास्की अधिकारचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगतो.

१. **ऐतिहासिक-** अधिकार ऐतिहासिक आहेत, याचा अर्थ विशिष्ट वेळी समाजाची सभ्यता, संस्कृती आणि आवश्यकतेच्या आधारावर त्याची मागणी होत असते आणि पुढेही होईल.

२. **सामाजिकता-** अधिकार सामाजिक आहेत. समाजाचा सदस्य या नात्याने ते व्यक्तीला प्राप्त होत असतात. याचा अर्थ समाजातील व्यक्तीला ते प्राप्त होतात.

३. **उपयोगिता-** उपयोगिता अधिकाराची कसोटी असून ते समाजातच प्राप्त होतात. अधिकार व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण ज्या अधिकाराचा उपभोग घेतो.त्याबाबत दुसऱ्याच्या मार्गात बाधक बनू नये. आपल्या अधिकारासोबत दुसऱ्याच्या अधिकाराची जाणीव असावी.

४. **परिवर्तनशीलता-** देश, काल, परिस्थिती व व्यक्ती विकासाच्या संकल्पनेनुसार बदलत असतात. अधिकारांची निश्चित यादी बनवू शकत नाही. तरीही अधिकारचा स्थायी स्वरूप धारण करण्याकडे कल असतो.

५. **कार्यानुरूपता-** अधिकार हे समाज संबंधित असतात. सामाजिक कार्याशी निगडित असल्याने सार्वजनिक इच्छेसाठी त्याचा वापर झाला पाहिजे. समाजासाठी व्यक्तीने केलेल्या त्यागावर ते अवलंबून असतात. समाजहित साध्य होणार असेल असेच अधिकार व्यक्तीला प्राप्त होतात.

६. **एकरूपता-** लास्कीच्या मते काही किमान अधिकार हे सर्वांना समान असले पाहिजे कारण अशा अधिकारामुळे व्यक्तीच्या किमान आवश्यकता पूर्ण होतात.

**आवश्यक अधिकार-** प्रा. लास्कीच्या मते, प्रत्येक व्यक्तीला राज्याकडून दोन प्रकारचे अधिकार प्राप्त होतात. पहिल्या प्रकारात संरक्षण आणि जीवनाचा अधिकार तर दुसऱ्या प्रकारात व्यक्ती विकासासाठी आवश्यक असणारी सर्व साधने प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या अधिकाराचा समावेश करतो. व्यक्तीला प्राप्त अधिकाराच्या संख्या समाजाच्या प्रती त्या व्यक्तीच्या सहकार्याच्या अनुरूप असली पाहिजे. आवश्यक अधिकार हे सर्वांसाठी समान असावेत. लास्की पुढील अधिकार सर्वासाठी अनिवार्य असले पाहिजे असे सांगतो.

१. **काम करण्याचा अधिकार-** मनुष्य जीवन विकासासाठी या अधिकाराची आवश्यकता असते. परंतु निश्चित कामाचा दावा करता येत नाही. प्रत्येकाला काम मिळाले पाहिजे पण याचा अर्थ सर्वांना समान काम मिळावे हा होत नाही. या अधिकाराशिवाय व्यक्ती आपली योग्यता दाखवू शकत नाही.

२. **योग्य वेतन-** प्रत्येकाला जीवनावश्यक गरजा पूर्ण करता येतील ऐवढे किमान वेतन मिळाले पाहिजे. उपाशी व्यक्ती समाज उपयुक्त कार्य करू शकणार नाही. योग्य वेतन म्हणजे समान वेतन नव्हे तर जीवन जगण्याची स्थिती व जीवन दर्जाचा विचार करून किमान वेतन अपेक्षित आहे.

३. **ठराविक वेळ काम-** प्रत्येक व्यक्तीत श्रम करण्याची निश्चित कुवत असते. त्यापेक्षा जास्त श्रम केल्यामुळे श्रम करण्याची शक्ती नष्ट होते. म्हणून श्रमासोबत विश्रांतीची गरज असते. त्यामुळे कामाचे तास निश्चित असले पाहिजे. ठरवून दिलेल्या कामापेक्षा व्यक्तीला जास्त वेळ काम सांगता येणार नाही. कारण विश्रांती काळातच व्यक्ती आपली श्रम करण्याची शक्ती प्राप्त करू शकतो आणि परत नव्या जामोने कामास सुरूवात करू शकतो म्हणून हा अधिकार महत्त्वपूर्ण आहे.

४. **शिक्षणाचा अधिकार -** लास्की शिक्षणाचा अधिकाराला प्रथम स्थान देतात. हा अधिकार व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. शिक्षणाशिवाय आदर्श नागरिक निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाशिवाय व्यक्तीला अधिकार व

कर्तव्याची जाणीव होऊ शकत नाही. त्यामुळे हा अधिकार व्यक्तीविकासासाठी आवश्यक आहे. त्यामुळे किमान प्राथमिक व माध्यमिक शिक्षण प्रत्येक नागरिकांना मिळाले पाहिजे हा आग्रह धरतो.

५. **राजकीय अधिकार-** लास्कीच्या मते मतदानाचा अधिकार सर्वांना देण्यात यावा. त्यात जात, धर्म, लिंग, व वंश इ. आधारावर भेदभाव करू नये. सार्वत्रिक मतदानाचा त्याने पुरस्कार केला.

६. **भाषण स्वातंत्र्य अधिकार-** राजकीय अधिकारातील हा एक महत्त्वपूर्ण अधिकार मानला जातो. विचार व्यक्त करण्याच्या अधिकाराशिवाय व्यक्तीविकासाची कल्पना करणे मुर्खपणाची ठरेल. विचार व भाषण स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही. तक्रार करणे, लोकमत संघटित करणे व नव्या विचारांना लोकांसमोर मांडण्याची परवानगी देऊन व्यक्ती विकासाला संधी देण्यासाठी अधिकार आवश्यक आहे.

७. **मालमत्तेचा अधिकार-** व्यक्ती विकासासाठी मालमत्तेची आवश्यकता असते. प्रत्येक नागरिकाला व्यक्ति विकासासाठी आवश्यक मालमत्ता ठेवण्याचा अधिकार असावा. आवश्यकतेपेक्षा अधिक संपत्तीचा अधिकार लास्कीला मान्य नाही.

८. **सभा व संघटनेचा अधिकार-** वैधानिक मार्गाने सभा भरविणे व सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय संघटना निर्मितीचा अधिकार नागरिकांना असला पाहिजे. समाजातील हितसंबंधाना शासनापर्यंत पोहचविण्यासाठी संघटनेशिवाय पर्याय नसतो. संघटनेच्या माध्यमातून हितसंबंध शासनापर्यंत पोहचून निर्णय प्रक्रियेला गती मिळत असते.

९. **न्याय मिळविण्याचा अधिकार-** राज्यातील प्रत्येक नागरिकाला न्याय वागणूक मिळाली पाहिजे. आपल्या विरोधात होणाऱ्या अन्याय निवारणासाठी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असला पाहिजे.

**अधिकार संरक्षण तरतूदी-** लास्कीच्या मते अधिकार देऊन चालत नाही तर ते प्रत्यक्ष कार्यान्वित झाले पाहिजे. त्याने अधिकार संरक्षणासाठी पुढील तरतूदी सांगितल्या आहेत.

१. **सत्तेचे विकेंद्रीकरण-** राज्यात सत्तेच्या केंद्रीकरणामुळे जनता निरूत्साही बनते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे जनतेत राज्यकारभारात भाग घेण्याची रूची व सवय वाढते. स्थानिक पातळीपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यास जनतेचे शासन कार्यावर लक्ष असते. सत्तेचा दुरूपयोग झाल्यास विरोध होतो. विकेंद्रीकरणामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर अतिक्रमण होत नाही. अधिकाराचे संरक्षण होते हा सत्तेवरील जननियंत्रणाचा प्रभाव असतो.

२. **सल्लागार समित्या-** केंद्रीय शासनात अनेक खाती असतात. त्या प्रत्येक खात्याला योग्य सल्ला देण्यासाठी तज्ञांच्या सल्लागार समित्या असाव्यात. निर्णय घेण्यापूर्वी संबंधित खात्याने समितीचा सल्ला घेणे बंधनकारक असावे. याचा परिणाम म्हणजे शासनाची हुकूमशाही निर्माण होण्यास धोका टाळता येईल. तज्ञाच्या सल्लामुळे शासन कार्यात फार मोठया चुका होणार नाहीत. सरकारवर समित्यांचे नियंत्रण प्रस्थापित होईल आणि ते अधिकार रक्षणासाठी उपयोगी ठरेल.

**३. राज्याची अहस्तक्षेपाची भूमिका-** व्यक्ती विकासासाठी ज्या अनेक संस्था अस्तित्वात आल्या ज्यांच्या उद्दिष्टाच्या प्राप्तीकरीता आवश्यक कार्य करतांना राज्याने हस्तक्षेप करू नये. उदा. चर्च धार्मिक कार्य या संघटना आपले कार्य करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे. याउलट राज्याने ज्याचे उचित कार्य पार पाडतांना येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांच्या विकासाला अनुकूल परिस्थिती उपलब्ध करावी. जोपर्यत एखादी संघटना राज्यविरोधी कार्य करून राज्याचे अस्तित्व धोक्यात आणण्याचा प्रयत्न करणार नाही तोपर्यंत त्या संघटनेला नष्ट करण्याचा वा कारवाई करण्याचा अधिकार नसावा. याचा अर्थ संघटनाना आपल्या कार्यक्षेत्रात पूर्ण स्वातंत्र्य असावे हा आग्रह लास्की धरतो**.**

**प्र.३ रा लास्कीचे स्वातंत्र्यासंबंधी विचार स्पष्ट करा?**

लास्कीच्या मते, " स्वातंत्र्य म्हणजे ज्यात प्रत्येक व्यक्तीला आपला संपूर्ण विकास करून घेण्याची योग्य संधी मिळते." ही व्याख्या केली. व्यक्तीविकासासाठी आवश्यक परिस्थिती म्हणजे स्वातंत्र्य. स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव ही कल्पना त्याला मान्य नाही. स्वातंत्र्याची निर्मिती अधिकारातून होते. अधिकाराशिवाय स्वातंत्र्य व्यर्थ आहे. अधिकाराच्या सहाय्याने स्वातंत्र्याचा उपभोग घेणे शक्य होते. स्वातंत्र्याचा संबंध समाज जीवनाशी असतो. मिलसारखी

व्यक्तिगत व सामाजिक वर्तन ही भूमिका मान्य नाही. प्रत्येक कृतीचा परिणाम समाज जीवनावर होत असतो. कायदयाने स्वातंत्र्याचा लोप होत नाही. उलट स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी कायदयाची गरज असते.व्यक्ती व समाजहितकारक कायदे पालनामुळे स्वातंत्र्याची वृद्धी होतच असते. प्रा.लास्कीने स्वातंत्र्याचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१. **खाजगी स्वातंत्र्य-** व्यक्ती ज्या कार्याचा परिणाम त्याच्या व्यक्तिगत जीवनापुरता मर्यादित असतो. त्या कार्याचा स्वातंत्र्याला खाजगी स्वातंत्र्य म्हणतात. उदा. धर्म ही वैयक्तिक बाब आहे. धर्मपालन, स्वीकार ही खाजगी बाब असून याबाबत राज्याने हस्तक्षेप करणे गैर ठरते. खाजगी स्वातंत्र्याचा सर्वांना लाभ मिळाला पाहिजे. व्यक्ती विकासासाठी खाजगी स्वातंत्र्याचे संपूर्ण संधी उपलब्ध करून देण्याचे तो समर्थन करतो.

२. **राजकीय स्वातंत्र्य-** राज्याच्या शासन कार्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभागित्व मिळविण्याचा नागरिकाचा अधिकार म्हणजे राजकीय स्वातंत्र्य होय. राज्यातील नागरिकांत वय, लिंग, वंश इ.कोणत्याही कार्यामुळे भेदभाव होता कामा नये. मतदान करणे, निवडणूक लढविणे, राज्यकारभार टिकविणे इ. चे स्वातंत्र्य असावे. राजकीय स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी अ) शिक्षण ब) वृत्तपत्र स्वातंत्र्याची आवश्यकता लास्की सांगतो. प्रत्येकाला शिक्षण घेता आले पाहिजे. कारण शिक्षण मानवी विकासाचा मूळ पाया आहे. शिक्षणाने स्वतः व समाजाच्या प्रश्नाची जाणीव होते. व्यक्तीत वैचारिक परिपक्वता येते. विचार कृतीत उतरण्यासाठी लेखन स्वातंत्र्य आवश्यक असून त्यासाठी स्वतंत्र बाण्याची वृत्तपत्रे असावीत. शासन धोरणावर टीका करणे, लोकमत निर्माण करून लोकांना राजकीय शिक्षण देण इ. साठी स्वतंत्र वृत्तपत्राचे समर्थन लास्की करतात. शुद्ध व निर्मळ वृत्तपत्र हे लोकशाहीचे आधारस्तंभ मानतो.

३. **आर्थिक स्वातंत्र्य-** उपासमारीपासून संरक्षण आणि उदरनिर्वाहासाठी किमान मिळकतीची सुरक्षितता म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य होय. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक व्यक्तीला योग्यतेनुसार काम व वेतन मिळविण्याचे स्वातंत्र्य होय. बेकारी व वस्तूच्या तुटवडयापासून नागरीक मुक्त पाहिजेत. कमीत कमी आवश्यक गरजांची पूर्ती झाली पाहिजे. उद्योगधंदात भांडवलदाराची मनमानी नको. उत्पादन व व्यवस्थापन प्रक्रियेत श्रमिकांना सहभागित्व मिळाले पाहिजे. कामाचे तास, वेतन इ. निर्णय भांडवलदार व श्रमिकांच्या संमतीने झाले पाहिजे. आर्थिक स्वातंत्र्य हा राष्ट्राचा प्राण आहे. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय इतर स्वातंत्र्य अर्थहीन असल्याने त्यांच्या रक्षणासाठी औद्योगिक लोकशाही आवश्यक मानतो.

**स्वातंत्र्य रक्षणाचे उपाय-** स्वातंत्र्य रक्षणासाठी लास्कीने पुढील अटी सांगितल्या आहेत.

१. **विशेष अधिकाराचा अभाव-** स्वातंत्र्य संरक्षणाची प्रथम अट म्हणजे समाजातील कोणत्याही वर्गाला विशेष सवलती असू नये. कायदे समोर सर्व नागरिक समान मानले पाहिजेत. सर्व व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून दिली जावी. त्यामुळे परंपरागत विशेष सवलती रद्द कराव्यात. समाजात सवलत मिळणारा वर्ग स्वतःला श्रेष्ठ आणि इतरांना कनिष्ठ लेखत असल्याने एकता निर्माण होऊ शकत नाही. स्वातंत्र्याचे जतन करण्यासाठी विशेष अधिकार नष्ट झाले पाहिजे.

२. **अधिकार दुसऱ्याच्या मर्जीवर नसावेत-** व्यक्तीला जीवनाचे परावलंबित्व असता कामा नये. समाजातील व्यक्तीचा उदरनिर्वाह इतरांच्या मर्जीवर नसावा. कारखानाचा मालक सबळ कारणाशिवाय कामगाराला नोकरीवरून कमी करण्याचा अधिकार असू नये. हक्कांबद्दल निश्चित कमी नसेल तर स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही.

३. **निपक्ष राज्यव्यवस्था-** राज्याचे कार्य निपक्षपाती असले पाहिजे अर्थात आदर्शवादी राज्य अस्तित्वात आणणे कठिण वाटते. परंतु त्या पद्धतीने प्रयत्न झाला पाहिजे तरच स्वातंत्र्य टिकेल.

४. **स्वातंत्र्य लढा-** स्वातंत्र्याचे संरक्षणाकरीता व्यक्ती किती लढा देण्यास उत्सुक आहेत. स्वातंत्र्यासाठी जनतेचा सक्रिय सहभाग आवश्यक मानतात. त्यावर स्वातंत्र्याचे रक्षण अवलंबून असते. मनोधर्यात स्वातंत्र्याचे मर्म आहे. जागृत नागरिक हे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे रक्षणकर्ते असतात. अज्ञानी जनते स्वातंत्र्याबद्दल जागृत नसल्यामुळे त्यावर अन्याय होण्याची शक्यता असते.

**टिप- प्रा. लास्कीचे समतेबद्दल विचार-**

स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही संकल्पना लास्कीला परस्परपूरक वाटतात. दोघांना एकमेकाच्या विरोधी समजणे म्हणजे समतेचा चुकीचा अर्थ लावणे होय. राज्यशास्त्रात समता संकल्पनेच्या विविध परिभाषा असल्याने निश्चित अर्थ लावणे कठीण आहे. तरीही सर्वांना समान वागणूक किंवा समान मोबदला म्हणजे समता नाही. कारण व्यक्तीची इच्छा, पात्रता सारखी नसते. गुण भिन्नतेमुळे समान वागणूक देणे म्हणजे त्या व्यक्तीवर अन्याय करणे होय. जीवनाच्या विशिष्ट पातळीपर्यंत सर्वांना समान स्थितीवर आणता येते. सर्वांना किमान राहणीमान उपलब्ध करून देणे म्हणजे समाजातील मानव निर्मित विषमता नष्ट करणे होय. एका व्यक्तीला दुसऱ्याची उपेक्षा वा पिळवणूक करता येऊ नये. प्रत्येकाला विकासाची संधी समान मिळावी, सर्वांना प्राथमिक शिक्षणाची पूर्तता झाल्यावर उच्च शिक्षणाची सोय झाली पाहिजे. लास्की असमानतेचा समर्थक नाही परंतु पूर्ण समता निर्माण करणे शक्य नाही या वास्तवतेची त्यांना जाणीव होती. एका व्यक्तीला दुसऱ्याची उपेक्षा, पिळवणूक व अन्याय करता येणार नाही. प्रत्येकाला विकासाची समान संधी मिळाली पाहिजे.

लास्की समतेला सामाजिकरणाची प्रक्रिया मानतो. जोपर्यंत मानवी गरजा व क्षमता यात भिन्नता आहे. तोपर्यंत संपूर्ण समता निर्माण होणे शक्य नाही. परंतु किमान समता प्रस्थापित करता येऊ शकते. त्यासाठी प्रत्येक व्यक्ती कायदयासमोर समान असावेत. समाजात विशेष अधिकार असू नये. सर्वांना संधीची समानता उपलब्ध व्हावी. आर्थिक समतेशिवाय राजकीय समतेला काहीच अर्थ नाही. आर्थिक विषमता व्यक्तीच्या स्वातंत्र्यात मारक असते. राजकीय समता ही आर्थिक समतेवर अवलंबून असते. म्हणून आर्थिक बाबतीत लास्की राज्यांच्या नियंत्रणावर भर देतो.

**टिप-खाजगी संपत्तीबाबत लास्कीचे विचार -**

प्रत्येकाला आपल्या व्यक्तीमत्वाच्या विकास घडविण्याइतकी मालमत्ता असली पाहिजे. मालमत्ता आवश्यक असली तर ती स्वकष्टार्जित असावी. मालमत्तेचे वितरण समान पद्धतीने झाले पाहिजे. सद्यकाळातील मालमत्ता वितरणाची पद्धत नैतिक दृष्टीने योग्य नाही. संपत्तीच्या अधिकारामुळे समाजात एक वर्ग वारसा घेऊन जगणारा परोपजीवी तर दुसरा श्रमावर जगणारा ज्याचा अधिकार संपत्ती धारकाकडून नियंत्रित होतो. राष्ट्रीय पातळीवर संपत्तीवर विषम वाटप होत असते.

संपत्ती धारकाची संख्या अत्यंतअल्प असते. परंतु त्याचा राजकारणावर प्रभाव असतो. राजकारणाची सूत्रे व दिशा ठरविण्याचे सामर्थ्य त्याच्यापाशी असते. कामगार भांडवलशाहीवर अवलंबून असतात. त्याने इंग्लंडच्या औद्योगिकरणाचे दोष दाखवून काही सुधारणा सांगितल्या. सद्यस्थित भांडवलदाराच्या प्रवृत्तीत बदल झाला आहे. कामगारांना थोडे फार चांगले दिवस आलेले आहेत, पण तेवढयाने प्रश्न सुटणार नाही. भांडवलदार उत्पादन मोठया प्रमाणावर करतात. उत्पादनाचा नफा आधार असतो. त्यात गरज व उपयुक्तेला स्थान नसते. उदा. समाजाला घराची आवश्यकता असेल तर तेव्हा चित्रमंदिरे उभारली जातात. संपत्तीचे नियोजन व वितरण योग्य पद्धतीने केले जात नाही. राज्यात निश्चित संपत्ती ठरवावी व अधिक संपत्ती नियंत्रणास घ्यावी. परंतु त्यासाठी आवश्यक मोबदला दिला पाहिजे. याचा अर्थ लास्की मार्क्सवादी विचाराने प्रभावित झालेला दिसतो.

**टिप- प्रा. लास्कीचा राज्याला विरोध करण्याचा अधिकार-**

राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला लास्की देतो. त्याच्यामते व्यक्तिविकासासाठी आवश्यक ती बाह्य परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कार्य होय. राज्याने व्यक्तीला अधिकाराची खात्री दिल्याशिवाय व्यक्ती आपला जास्तीत जास्त विकास करून घेऊ शकत नाही. व्यक्ती विकासास आवश्यक अधिकार मिळत नसतील तर क्रांती करणे चांगले होय. क्रांतीमुळे समाज व राज्यातील दोष नष्ट होऊन नवीन समाजरचना निर्माण झाली पाहिजे. राज्याला विरोध करणे म्हणजे प्रचलित व्यवस्थेच्या विरोधात क्रांती करणे होय. तो क्रांतीला मानवी विकासाचा महत्त्वाचा टप्पा मानतो. क्रांतीनंतर नवीन न्याय समाजरचना निर्माण होणे आवश्यक मानतो.

राज्याने निर्माण केलेल्या कायदा जोपर्यंत व्यक्ती विकासाच्या उद्देशपूर्तीसाठी असेल तोपर्यत त्यांचे पालन झाले पाहिजे. राज्याने दिलेली आज्ञा व्यक्ती विकासास बाधक असेल तर व्यक्तीने राज्याने आज्ञाचे पालन करू नये. विचार न

करता कायदा पालन करणे आत्मवंचना आहे. व्यक्ती कायदापालन भीतीमुळे करत नसून ते उपकारक असतो म्हणून करतो. उपकारक कायदा भंग करण्याचा अधिकार लास्की जनतेला देता. लास्कीने विशिष्ट परिस्थितीत व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकार दिलेला आहे.

१) राज्य सामान्य हिताचे रक्षण करीत नसल्याची संघटित खात्री असेल तर

२) राज्य अधिकारांचे संरक्षण करण्याऐवजी अपहरण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर क्रांती करता येते.

लास्कीने वरिल दोन कारणाकरीता राज्याला विरोध करण्याचा वा क्रांती करण्याचा अधिकार जनतेला दिला आहे.

**टिप- प्रा. लास्कीचे लोकशाहीसंबंधी विचार-** लोकशाही ही सर्वश्रेष्ठ शासन प्रणाली आहे. व्यक्ती विकासासाठी अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा संसदीय शासन पद्धती योग्य असते. संसदिय पद्धतीतील सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वामुळे मंत्रिमंडळ योग्य रीतीने राज्यकारभार करीत असते. जनता जागृत असल्यास शासन विभागात केव्हाही परिवर्तन घडवून आणता येते. जनजागृती आणि सत्तांतर हे परस्पर पूरक आहेत.

लोकशाहीचा सर्वात मोठा शत्रू भांडवलशाही अर्थव्यवस्था असतो. ह्या अर्थव्यवस्थेत भांडवलदार लोकशाही पुरस्कार करत असला तरी लोकशाही विरोधी विचारांचा आधार घेऊन आपली वर्चस्व निर्माण करतो. लोकशाहीत भांडवलदार संपूर्ण शासकीय आणि प्रशासकीय व्यवस्था आपल्या हितासाठी राबवितात. भांडवलशाही लोकशाही ही खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या नावावर दिशाभूल करण्याचा एक प्रयास आहे. या लोकशाहीत व्यक्ति स्वातंत्र्य नसते. आवश्यक वस्तूंचा सतत अभाव, गरिबांची पिळवणूक ही सतत वाढत असतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत लोकशाहीचा खऱ्या अर्थाने अपमान असतो. कारण लोकशाहीत समाजातील प्रत्येक व्यक्ती सुखप्राप्तीच्या सारख्याच अधिकारी असतात. त्यासाठी व्यक्ती व्यक्ती आर्थिक विषमता कमी प्रमाणात असली पाहिजे. म्हणून वास्तविक लोकशाही निर्माण करण्यासाठी भांडवलशाही नष्ट करून समताधिष्ठीत लोकशाहीसाठी प्रयत्न झाले पाहिजेत. भरभराटीच्या काळात भांडवलदार लोकशाहीला सहकार्य करतात मात्र मंदी असतांना लोकशाही नष्ट करावयाला मागेपुढे पाहत नाही. आदर्श स्वरूपाची लोकशाही समाजवादी तत्त्वाने शक्य आहे. या प्रकारात राज्याचे धोरण ठरविण्यात जनतेच्या मताला किंमत असते. म्हणून ती पद्धत आदर्श असते. भांडवलशाहीच्या नाशातून वर्गरचना नष्ट होईल आणि लोकशाहीविरोध देखील नष्ट होईल.

लास्कीवर रशियातील साम्यवादी विचाराचा काही काळ प्रभाव होता. पण इंग्लंड, अमेरिकामधील लोकशाही व स्वातंत्र्यामुळे त्या दोहांत समन्वय साधण्याचा त्यानी प्रयत्न केलेला दिसतो. मार्क्सचा आर्थिक विश्लेषण, वर्गसंघर्ष, भांडवलशाहीचा नाश सिद्धांताना मान्य करून मार्क्सप्रणीत साम्यवाद प्रत्येक देशात स्थापन होऊ शकत नाही हे वास्तव लक्षात घेऊन लोकशाही समाजवादी मार्गाचा अवलंब करावा. रशियाबद्दल आकर्षण असले तरी इंग्लंडमध्ये मजूर पक्षाते साम्यवादाला स्थान दिले नाही. भांडवलवाद, साम्यवाद व लोकशाहीतील गुण समन्वय करून त्या विविध विचारप्रणालीतील गुंता सोडविण्याचा प्रयत्न करून लोकशाही समाजवादी विचारांना एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. प्रा. लास्कीने लिहिलेले दोन ग्रंथाची नावे लिहा.
   उत्तर- प्रा. लास्कीने Studies in the Problem Sovereignty, A Grammar of Politics, Communism, An Introdution to Politics, Socialism and Freedom इ.ग्रंथ लिहीले.

२. ऑस्टीनच्या सार्वभौमत्व तत्वातील कोणत्या तीन तत्त्वाचे प्रा. लास्कीने खंडन केलेले आहे ते सांगा.
   उत्तर- लास्कीने राज्य सर्व सत्तांचे उगमस्थान असून सार्वभौमत्व एका निश्चित मानव श्रेष्ठांच्या हातात असते, सार्वभौमत्व अमर्याद असते आणि सार्वभौम व्यक्तीच्या आज्ञा म्हणजे कायदा या तत्त्वाचे खंडन केले आहे.

३. प्रा. लास्कीने सांगितलेल्या अधिकार स्वरूपातील दोन तत्त्वे सांगा.
   उत्तर- सामाजिकता, परिवर्तनशीलता, उपयोगिता, ऐतिहासिकता आणि कार्यानुरूपता हे अधिकार स्वरूपातील तत्त्वे विशद केलेली आहेत.

४. प्रा. लास्कीने वर्णन केलेले दोन आवश्यक अधिकार कोणते?
   उत्तर- काम करण्याचा अधिकार, योग्य वेतन, शिक्षणाचा अधिकार आणि निश्चित वेळ काम हे आवश्यक अधिकाराचे वर्णन केलेले आहे.

५. अधिकार संरक्षणासाठी लास्कीने कोणत्या तरतूदी सांगितलेल्या आहेत.
   उत्तर- लास्कीने सत्तेचे विकेंद्रीकरण, सल्लागार समित्या आणि राज्याची अहस्तक्षेपाची भूमिका या तरतूदी सांगितलेल्या दिसतात.

६. लास्कीने स्वातंत्र्याचे वर्गीकरण स्पष्ट करा.
   उत्तर- वैयक्तिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वातंत्र्य असे स्वातंत्र्याचे वर्गीकरण केलेले आहे.

७. प्रा. लास्कीनी केलेली स्वातंत्र्याची व्याख्या लिहा.
   उत्तर- लास्कीच्या मते " स्वातंत्र्य म्हणजे ज्यात प्रत्येक व्यक्तीला आपला संपूर्ण विकास करून घेण्याची योग्य संधी मिळते " ही व्याख्या केली आहे.

८. अधिकार म्हणजे काय?
   उत्तर-"अधिकार म्हणजे समाज जीवनाची अशी परिस्थिती होय कि ज्याच्या शिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्वाचा योग्य तऱ्हेने विकास करू शकत नाही व्यक्ती विकासावी उचित संधी प्राप्त करून देण्याचा अधिकाराचा उद्देश असतो "

९. प्रा. लास्कीचे खाजगी मालमत्तबाबतचे विचार थोडक्यात लिहा.
   उत्तर- प्रत्येकाला आपल्या व्यक्तीमत्वाच्या विकास घडविण्याइतकी मालमत्ता असली पाहिजे. मालमत्ता आवश्यक असली तर ती स्वकष्टार्जित असावी. राज्यात निश्चित संपत्ती ठरवावी व अधिक संपत्ती नियंत्रणास घ्यावी. परंतु त्यासाठी आवश्यक मोबदला दिला पाहिजे.

१०. प्रा. लास्की लोकशाहीचा सर्वात मोठा शत्रू कोणता असतो.
   उत्तर- लोकशाहीचा सर्वात मोठा शत्रू भांडवलशाही अर्थव्यवस्था असतो. ह्या अर्थव्यवस्थेत भांडवलदार लोकशाही पुरस्कार करत असला तरी लोकशाही विरोधी विचारांचा आधार घेऊन आपली वर्चस्व निर्माण करतो. लोकशाहीत भांडवलदार संपूर्ण शासकीय आणि प्रशासकीय व्यवस्था आपल्या हितासाठी राबवितात. भांडवलशाही लोकशाही ही खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या नावावर दिशाभूल करण्याचा एक प्रयास आहे.